**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**शिक्षण सेवक योजनेच्या दिनांक १० जून, २००५ च्या शासन निर्णयातील विसंगत अट रद्द करणे बाबत**

**(१) * १२८४२ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांसाठी दिनांक १३ ऑक्टोबर, २००० च्या शासन निर्णयाचे विसंगत दिनांक १० जून, २००५ मधील मुद्दा क्रमांक-१ असल्यामुळे तो मुद्दा निर्णयातून वगळावा असे एक निवेदन दिनांक २१ डिसेंबर, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान सरचिटणीस मराठवाडा शिक्षक संघ यांनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविले आहे हे खरे आहे काय,

(२) दिनांक १० जून, २००५ चे शासन निर्णयाप्रमाणे बिना अनुदान तत्वावरील शाळेतील शिक्षक पदास शिक्षक म्हणून मान्यता मिळाल्यानंतर शाळा अनुदानावर आल्यास पुन: त्या शिक्षकाला शिक्षण सेवक म्हणून मान्यता घ्यावी लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे.

(४) अद्यापही कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : राज्यातील सर्व मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळांना शिक्षणसेवक ही योजना 13 ऑक्टोबर 2000 पासून सुरु करण्यात आली. ही योजना संपूर्ण महाराष्ट्राला लागू आहे. महाराष्ट्र शासनाने 10 जून 2005ला शासन निर्णय काढला. त्या शासन निर्णयाप्रमाणे शाळा ज्या शैक्षणिक वर्षी अनुदानाच्या ज्या टप्प्यावर पात्र ठरते त्या शैक्षणिक वर्षापासून त्या शाळेस शिक्षणसेवक योजना लागू होईल. विना अनुदान तत्वावरील शाळेत करण्यात आलेली सेवा शिक्षणसेवक म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**सभापती** : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 12842...)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हे शासनाला समजले असते तर शासनाने अशा प्रकारचा जी.आर. काढला नसता. शाळेत शिक्षक म्हणून लागल्यानंतर त्या शिक्षकाला मान्यता मिळून त्याला बँकेतून पगार देखील मिळतो. परंतु जेव्हा ती शाळा अनुदानावर येते त्यावेळी त्या शिक्षकाला पुन्हा शिक्षणसेवक म्हणून मान्यता घ्यावी लागते. अशा प्रकारचे मोठे काम या शासनाने केलेले आहे. यामुळे या शिक्षकाला त्याच्या पगारामध्ये महिना दीड ते तीन हजार रुपयांपर्यन्त लॉस होणार आहे. त्याला वेतनवाढ आणि सुट्टया यापासून वंचित राहावे लागणार आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हा जो 10 जून 2005चा काळा आणि नियमबाह्य कायदा शासनाने केलेला आहे तो शासन रद्द करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : हा निर्णय रद्द करुन दोन दिवसात फेर आदेश निर्गमित करण्यात येतील.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेतंर्गत जिल्हा परिषदेचा अनागोंदी कारभार सुरु असल्याबाबत**

**(२) * १६६५८ श्री. सुरेश जेथलिया , श्री. विलास अवचट , श्री. गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेतंर्गत जिल्हा परिषदेचा अनागोंदी कारभार सुरु असल्याचा आरोप मराठवाडा शालेय पोषण आहार कामगार संघटनेने माहे जानेवारी, २००६ मध्ये वा त्या सुमारास केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात संघटनेने दिनांक ९ जानेवारी, २००६ रोजी जिल्हापरिषदेसमोर निदर्शने केली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) व (२) संघटनेने दिनांक ३१ डिसेंबर, २००५ रोजी काही मागण्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांना निवेदन दिले असून, त्यासंदर्भात संघटनेने दि. ९ जानेवारी, २००६ रोजी जिल्हा परिषदेसमोर निदर्शने केली.
(३) व (४) शासनाच्या वतीने जिल्हापरिषदेने गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन चौकशी केली त्यामध्ये तथ्य आढळून आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विलास अवचट : छापील उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "संघटनेने दिनांक 31 डिसेंबर 2005 रोजी काही मागण्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांना निवेदन दिले." पुढे असेही म्हटलेले आहे की, "शासनाच्यावतीने जिल्हापरिषदेने गट शिक्षणाधिका-यांकडून माहिती घेऊन चौकशी केली त्यामध्ये तथ्य आढळून आलेले नाही." माझा प्रश्न असा आहे की, गट शिक्षणाधिका-यांनी अशी कोणती माहिती घेतली की जेणेकरुन संघटनेने केलेल्या मागण्यांमध्ये त्यांना तथ्य आढळून आले नाही. ?

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 14:05

ता.प्र.क्र. 16658 पुढे सुरु ....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मराठवाडा शालेय पोषण आहार संघटनेने जानेवारी,2006 मध्ये शासनाला निवेदन दिले होते. त्याची प्रत माझ्याकडे आहे. या निवेदनामध्ये ग्राम शिक्षण समितीला जे अधिकार दिलेले आहेत ते आम्हांला द्यावेत अशी एक मागणी होती. त्याचप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेतील कर्मचाऱ्यांना हजेरीपट असावा अशी एक मागणी होती. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन शाळेच्या मुख्याध्यापकांकडे न देता चेकने द्यावे अशा प्रकारच्या जवळ जवळ 5-6 प्रमुख मागण्या त्यांनी केल्या होत्या. निवेदनातील सर्व मुद्यांबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी चौकशी केली आणि त्यामध्ये गैरप्रकार आढळून आले नाहीत. गट शिक्षणाधिकारी यांनी चौकशीचा रिपोर्ट सादर केला आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शासनाने शालेय पोषण आहार योजना सुरु केली आहे परंतु ही योजना राबविताना त्यामध्ये भेदभाव केलेला आहे. महाराष्ट्रातील फक्त अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळतो. विना अनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळातील विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळत नाही. राज्यातील सर्वच मुलांना मग ती मुले विना अनुदानित अथवा कायम विनाअनुदानित शाळातील असोत शालेय पोषण आहार योजनेचा फायदा मिळण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार शाळांतील मुले कुपोषित राहू नयेत म्हणून शालेय पोषण आहार ही योजना शासनाने राबविली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या मुलांना हजेरीपट ठेवण्यात आलेला आहे. या योजनेमध्ये 1.50 रु. केंद्र शासनाकडून आणि 50 पै. राज्य शासनाकडून अनुदान मिळते. राज्यातील खाजगी शाळा असतील किंवा जिल्हा परिषदांच्या शाळा असतील सर्वच शाळातील मुलांना ही योजना लागू करण्याबाबत शासन निश्चितपणाने विचार करील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, बीड जिल्हयातील शालेय पोषण आहार योजनेच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. जी तक्रार मराठवाडा शालेय पोषण आहार कामगार संघटनेने केली होती त्या तक्रारीची चौकशी करण्यात आली असे उत्तरात म्हटले आहे. याबाबतीत माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. कामगार संघटनेने जी तक्रार केली होती त्या तक्रारीचे स्वरुप काय ? तक्रारीमध्ये कोणकोणते मुद्दे नमूद करण्यात आले होते ? गटशिक्षणाधिकारी,बीड यांनी तक्रारीची

.....2

ता.प्र.क्र. 16658 पुढे सुरु...

श्री. रामनाथ मोते ...

चौकशी केली असे उत्तरात म्हटले आहे. गटशिक्षणाधिकारी हे तालुका स्तरावर असतात. त्यामुळे जिल्हा स्तरावरील तक्रारींची चौकशी त्यांनी कशा प्रकारे केली ? जिल्हा स्तरावर तक्रार असल्यामुळे ही संपूर्ण चौकशी कोणी केली ? तक्रारीमधील कोणत्या मुद्यांबाबत चौकशी केल्यानंतर शासनाला तथ्य आढळून आले नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मराठवाडा शालेय पोषण आहार कामगार संघटनेने जे निवेदन केले होते त्यामध्ये कोणते मुद्दे उपस्थित करण्यात आले होते हे मी यापूर्वीच सांगितले आहे. निवेदनातील मुद्यांच्या संदर्भात गटशिक्षणाधिकारी,बीड यांनी चौकशी केली आहे. तक्रारीमधील सर्व मुद्दे धोरणात्मक होते.

**सभापती** : माननीय सदस्यांचे असे मत आहे की,जिल्हा स्तरावर चौकशी करावयाची असल्याने व गटशिक्षणाधिकारी हे तालुका स्तरावरील अधिकारी असल्याने ते जिल्हा स्तरावरील चौकशी कशी काय करु शकतील ? जिल्हा स्तरावर प्रोजेक्ट ऑफीसरने चौकशी करणे आवश्यक आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, धोरणात्मक निर्णयांबाबत चौकशी करावयाची होती. कामगारांना काढून टाकले आहे किंवा नाही हे पहावयाचे होते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाने जे लेखी उत्तर दिले आहे त्यामध्ये पाचव्या प्रश्नाला "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर दिले आहे. संघटनेने धोरणात्मक बाबींकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. शासनाने धोरणात्मक निर्णय कोणते घेतले होते ? तसे निर्णय घेतले नसतील तर त्यामध्ये काय अडचणी आहेत ? कोणते निर्णय सकारात्मक घेण्यात आले ? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर निवेदनातील किती मुद्यांबाबत न्याय मिळाला हे स्पष्ट होईल्.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, खिचडी बनवून देण्याबाबत ग्राम शिक्षण समितीला अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये महिला बचत गटांना प्राधान्य दिले पाहिजे. ग्राम शिक्षण समितीला पूर्णपणे अधिकार दिलेले आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 16658....... श्री. हसन मुश्रीफ ........

दुसरे जे निवेदन आहे त्यामध्ये आपल्याला केंद्रशासनाकडून दीड रुपया आणि राज्यशासनाचे पन्नास पैसे प्रत्येक मुलामागे मिळतात व त्या रकमेतून गॅस, शेगडी आणि आठवडयाला एक वेळ केळी तसेच मांसाहारी मुले असतील तर अंडी अशा प्रकारचे साहित्य घेण्यासाठी तरतूद आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : महोदय, देशात सर्व शिक्षा अभियान योजना आपण राबवित आहोत. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी प्रश्न विचारला की, अनुदानित शाळातील विद्यार्थी कुपोषित राहू नयेत म्हणून शासन त्यांना पोषण आहार योजनेअंतर्गत पोषण आहाराचा पुरवठा करते. पण विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळातील मुलांना असा पोषण आहार पुरविला जात नाहीत. ही मुले कुपोषित व्हावीत असे शासनाला वाटते काय ? नसेल तर शासन यासंदर्भातील धोरण म्हणून या विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळातील विद्यार्थ्यांना देखील या योजनेअंतर्गत आहार पुरवठा करण्याबाबतचा निर्णय याच सत्रापासून घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंबंधीच्या भावना मी अगोदरच व्यक्त केलेल्या आहेत. त्यानुसार निश्चितपणे विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळातील विद्यार्थ्यांसाठी देखील ही योजना या सत्रापासून लागू करण्याचा शासन विचार करील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न चौकशीच्या संदर्भातील असून जिल्हा परिषदेच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन ही चौकशी केल्याचे सांगण्यात आले, परंतु गट शिक्षणाधिकाऱ्याकडून संपूर्ण जिल्हयाची माहिती मिळू शकत नाही. ही चौकशी जिल्हा पातळीवरील असल्यामुळे एखादया वरिष्ठ दर्जाच्या व सक्षम अधिकाऱ्यामार्फत ही चौकशी करुन या मागण्यांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार शासन करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रत्येक तालुक्याला गट शिक्षणाधिकारी असतात त्यांच्याकडून त्यांच्या त्यांच्या भागातील माहिती घेऊनच ही चौकशी केलेली आहे. केवळ एकाच गट शिक्षणाधिकाऱ्याकडून माहिती घेऊन सर्व जिल्हयाची चौकशी केलेली नाही.

--------------

...........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौ. सणसवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील किस्पात प्रोफाईल्स कंपनी सुरु करणेबाबत**

**(3) * 12972 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौ. सणसवाडी (ता.शिरुर, जि.ठाणे) येथील किस्पात प्रोफाईल्स ही पोलाद निर्मिती करणारी कंपनी गेली 2 वर्ष बंद असल्यामुळे तेथे काम करणारे 2000 कामगार बेकार झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर कंपनी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबा सिध्दीकी, श्री. गणेश नाईक यांच्याकरिता** : (1) कंपनीच्या व्यवस्थापनाने दिनांक 22.10.2000 च्या नोटीशीद्वारे त्याच दिवसाच्या दुसऱ्या पाळीपासून काम स्थगिती व दिनांक 6.11.2000 पासून टाळेबंदी लागू केली. त्यामुळे या आस्थापनेतील 868 कामगार परिणामीत झालेले आहेत हे खरे आहे.

(2) व (3) सदर आस्थापना सुरु करणेसाठी शासनस्तरावर अनेक बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या तथापि उभयपक्षांना मान्य अशी तडजोड होऊ शकली नाही.

या आस्थापनेतील टाळेबंदीबाबतचा विवाद औद्योगिक न्यायाधिकरणाकडे सुपुर्द करुन कामगार आयुक्त यांनी दिनांक 29.11.2001 रोजी टाळेबंदीस प्रतिबंध करणे बाबतचे आदेश जारी केले. व्यवस्थापनाने या आदेशांचे अनुपालन न केल्याने व्यवस्थापनाविरुध्द खटला दाखल करण्यात आला. या सर्व कार्यवाहीला व्यवस्थापनाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असता सर्वोच्च न्यायालयाने कामगार आयुक्तालयाने केलेल्या कार्यवाहीस स्थगिती दिली आणि सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये हेडलाईनलाच "किस्पात" अशी चूक झालेली आहे त्याऐवजी "इस्पात" असा शब्दप्रयोग पाहिजे. तसेच प्रश्न क्र. 1 मध्ये "मौ. सणसावाडी (ता. शिरुर, जि.ठाणे)" असे म्हटले आहे. त्याऐवजी "मौ. सणसवाडी (ता. शिरुर, जि. पुणे)" असा शब्दप्रयोग पाहिजे. कारण हा पुणे जिल्हयातील प्रश्न आहे. पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील सणसवाडी या कंपनीबाबतचा हा प्रश्न असून यामध्ये कंपनीच्या वतीने एकतर्फी टाळेबंदी जाहीर केली असता त्या टाळेबंदीला कामगार आयुक्तांनी बेकायदेशीर ठरविले आणि प्रतिबंध केला. त्याविरुध्द व्यवस्थापनाने सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल केला व कामगार आयुक्तांच्या आदेशाविरुध्द स्थगिती मिळविलेली आहे. ही स्थगिती सुरु असतांना शासकीय पातळीवर कामगारांना रोजगार मिळावा म्हणून कंपनी सुरु होण्यासाठी प्रयत्न झाले. माननीय केंद्रिय कृषी मंत्री श्री. शरद पवार आणि तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या

...C3

10-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) C-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 12972, प्रा. शरद पाटील . . . .

उपस्थितीत व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, कामगारांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत एक बैठक घेण्यात आली व कंपनी सुरु करण्याबाबतचा निर्णय झाला होता, हे खरे आहे काय ? त्याचबरोबर कामगारांची जी देणी कंपनीकडून यावयाची होती ती देण्याबाबत कंपनीने मान्यता दिली हेही खरे आहे काय ? त्याशिवाय सर्वाच्च न्यायालयाने जी स्थगिती दिलेली आहे ती उठविण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, इस समस्या का हल निकालने के लिए दिनांक 29 फरबरी 2004 को माननीय शरद पवार, माननीय सुशील कुमार शिंदे, माननीय प्रफुल्ल पटेल और अन्य संबंधित लोगों की मीटिंग हुई थी. उसके बाद में यह भी कहा गया कि मेनेजमेंट ने 1250 रुपए एडवांस पेमेंट दिया है. सुप्रिम कोर्ट के स्टे के अतिरिक्त मेनेजमेंट ने बी.आई.एफ.आर. में सिक एक्ट के तहत अपील की है और जब तक यह कंपनी सिक डिक्लेयर नहीं होती है, तब तक रिवायवल स्कीम डिक्लेयर नहीं हो सकती.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, इस्पात प्रोफाईल्स कंपनी ही पोलाद निर्मितीची आहे. सदर कंपनी बंद असल्यामुळे या कंपनीतील कामगार देशोधडीला लागले आहेत. सदर कंपनी दुसरी पोलाद कंपनी ताब्यात घेऊ शकेल काय ? याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैंने पहले भी बताया है कि . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदय मराठी भाषेतून उत्तर का देत नाहीत ? या राज्याची राजभाषा ही मराठी आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह हिन्दुस्तान भी है.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शासन आता न्यायालयाचे कामसुध्दा मराठीतून सुरू करण्याच्या विचारात आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला एक गोष्ट स्पष्ट करावयाची आहे. सन्माननीय मंत्र्यांनी हे हिंदुस्थान आहे असे म्हटले आहे. महाराष्ट्राचा राज्य कारभार हा मराठीतूनच झाला पाहिजे. न्यायालयाची कामकाजाची भाषासुध्दा मराठी असली पाहिजे. मराठीचा वापर व्हावा म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. यासाठी 105 जणांनी हौतात्म्य पत्करले आहे.

श्री.दिवाकर रावते (बसून) : तू राजभाषा मराठी असलेल्या महाराष्ट्राचा मंत्री आहेस. (अडथळा)

**सभापती** : कोणत्या भाषेत उत्तर द्यावे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगेन की, त्यांना जर राजभाषा मराठीतून उत्तर देता आले तर ते त्यांनी देण्याचा जरूर प्रयत्न करावा. पण मी त्यांच्यावर मराठी भाषेतून उत्तर द्यावे अशी सक्ती करणार नाही. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्याकडे बघून उत्तर द्यावे. सन्माननीय मंत्री या देशाचे आहेत, महाराष्ट्राचे आहेत. ते महाराष्ट्र राज्याचे मंत्री आहेत. मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा असली तरी देखील हिंदी ही आपल्या देशाची राष्ट्रभाषा आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12972...

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माय मराठीचा आदर राखणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. परंतु, त्यासाठी अरे-तुरेची भाषा ही मान्य नाही.

**सभापती** : या सभागृहात अरे-तुरेची भाषा मलाही मान्य नाही. त्यामुळे ही बाब संबंधितांच्या लक्षात आले असेल.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी इस्पात प्रोफाईल्स कंपनी अन्य कुठल्या कंपनीला देणार आहात काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. सदर कंपनीची सुरूवातीची परिस्थिती चांगली होती. परंतु, मधल्या काळामध्ये मंदगतीने काम करणे, वर्क टू रुलची भूमिका कामगारांनी स्वीकारली. त्यामुळे कंपनीचे नुकसान झाल्यामुळे कंपनीने टाळेबंदी लागू केली. या कंपनीची एम.एस.इ.बी. व सीकॉमकडे अनुक्रमे रुपये 30 कोटी आणि रुपये 41 कोटींची थकबाकी आहे. या कंपनीचा कारभार बी.आय.एफ.आर.मध्ये गेलेला आहे. त्यामुळे अन्य कुठलीही कंपनी सदर कंपनी ताब्यात घेणार नाही. सदर कंपनी लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापनाशी बोलणी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12972....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कंपनीने बेकायदेशीररित्या ज्यावेळी टाळेबंदी केली त्यावेळी शासनाने कंपनीवर खटला दाखल केला होता काय ?

श्री.गणेश नाईक : महोदय, कंपनीने टाळेबंदी केल्यानंतर शासनाने कंपनीवर खटला दाखल केलेला आहे. परंतु आमच्या निर्णयाच्या विरोधात व्यवस्थापन कोर्टात गेले आहे. त्यामुळे सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तरी सुध्दा न्यायालयाच्या बाहेर शासनाकडून या प्रकरणासंदर्भात वाटाघाटी करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, या कंपनीचे मूळ मालक कोण आहेत ?

श्री.गणेश नाईक : महोदय, श्री.जे.पी.खेमका आणि श्री.हेमंत मिश्रा अशी या संचालकांची नावे आहेत.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गडचिरोली जिल्ह्यातील लेव्ही घोटाळ्यात शासनाची**
**कोट्यावधी रुपयांची झालेली फसवणुक**

**(४) * १६६०० डॉ. दिपक सावंत , श्री. गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील लेव्ही घोटाळ्यात शासनाची कोट्यावधीची फसवणुक केल्याप्रकरणी दोषी मिलमालक व जिल्हा पुरवठा विभागाच्या संबधीत अधिकाऱ्यांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी राज्य शेतमाल आयोगाचे माजी सदस्य श्री. रविंद्र देरकर यांनी दिनांक २२ ऑक्टोबर,२००५ वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन किती जणांवर व कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनील तटकरे** : (१) या प्रकरणी संबंधित दोषी मिलमालक व अधिकाऱ्यांविरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई करण्यासंबंधी राज्य शेतमाल आयोगाचे माजी सदस्य श्री.रविंद्र दरेकर यांनी दिनांक २०/१०/२००५ रोजी दैनिक तरुण भारत व दैनिक लोकमत या वृत्तपत्रांच्या माध्यमातून केली आहे.

(२) गडचिरोली जिल्हयात भारतीय अन्न महामंडळाकडे लेव्ही तांदुळ जमा करतांना केलेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील २६ राईस मिल मालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत हे प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सुपूर्द करण्यात आलेले असून या प्रकरणी तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयामध्ये झालेला लेव्ही घोटाळा हा कोटयावधी रुपयांचा घोटाळा आहे. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात जे लेखी उत्तर प्राप्त झालेले आहे ते मोघम स्वरुपाचे आहे. चार राईस मिल मालकांनी हा घोटाळा केलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, राईस मालक आणि जिल्हा पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासनाची कोटयावधी रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे हे शासनाला मान्य आहे काय ? असल्यास, या सर्वांवर शासन कोणती कडक कारवाई करणार आहे ? त्यांच्यावर मोक्का लावणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लेव्ही घोटाळयासंदर्भात शासनाकडे तक्रार प्राप्त झ ाल्यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सात-आठ मुद्यांच्या संदर्भात ही चौकशी करण्यात आली आहे. वास्तविक पाहता लेव्ही तांदूळ 30 टक्के द्यावा असे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 14:20

ता.प्र.क्र.16600....

श्री.सुनील तटकरे....

अभिप्रेत आहे. त्यानुसार तेव्ही तांदूळाचा पुरवठा करण्यात आला आहे की नाही, याबाबत सुध्दा चौकशी करण्यात आली आहे. तसेच भरडाईसाठी जी वीज वापरली जाते, त्या बाबतीत ताळमेळ जुळतो की नाही हा मुद्दा देखील चौकशीमध्ये समाविष्ट होता. आंध्रप्रदेश राज्यातून तांदूळ आणून एफसीआय च्या किंमतीतून तो दिल्याचे तक्रारीत नमूद केले होते. हिशेब विहित नमुन्यात ठेवले की नाही, याबाबत सुध्दा चौकशी करण्यात आली. जी लेव्ही देण्यात आली तिचा आणि वापरलेल्या वीज युनिटचा ताळमेळ बसत नसल्याचे चौकशीमध्ये आढळून आले. तसेच विहित नमून्यात हिशेब ठेवल्याचे आढळून आले नाही. दर्शनी भागावर लेव्हीच्या ज्या किंमती लावावयास हव्या होत्या त्या लावण्यात आल्या नसल्याचे चौकशीमध्ये आढळून आले आहे.. एकंदरीत या सर्व गोष्टी आढळून आल्यानंतर, देसाईगंज येथील 18 मिल मालकांविरुध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम अन्वये तक्रार दाखल करण्यात आली. भारतीय दंड विधान 199, 200, 193 (2) व 420 या कलमांखाली आरमोरी, चामोर्शी व गडचिरोली येथील 26 राईस मिल मालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांना जिल्हा न्यायालयाने अटकपूर्व जामीन दिला आहे. काहींना अटक न करण्याच्या बाबतीत उच्च न्यायालयाकडून आदेश पारित झालेले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सुरु आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, अप्पर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी या घोटाळयाची चौकशी केली आहे. त्या चौकशीमध्ये या प्रकरणी अनियमितता झाल्याचे सिध्द झालेले आहे. या चौकशीमध्ये अनियमिततेबाबत अनेक बाबी निदर्शनास आल्या आणि त्यामुळे नंतर हा तपास राज्य गुन्हे अन्वेष विभागाकडे सुपूर्द करण्यात आल्याचे उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे. माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, हे प्रकरण गुन्हे अन्वेषण विभागाकडे केव्हा सुपूर्द करण्यात आले आहे ? तसेच हा तपास पूर्ण करण्यासाठी काही कालमर्यादा घालून दिली आहे काय ?

नंतर श्री.कांबळे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.16600 ....**

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकरणासंदर्भातील चौकशी दिनांक 21.7.2005 पासून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुरु करण्यात आली आहे. त्यानंतर ऑक्टोबर, 2005 मध्ये सदर प्रकरणासंदर्भात तपासणी सुरु झाली. सभापती महोदय, गुन्हा दाखल झाल्यानंतर हे प्रकरण ताबडतोब दिनांक 22.11.2005 रोजी सी.आय.डी.कडे तपासासाठी सुपूर्द करण्यात आले. या प्रकरणाचा तपास लवकरात लवकर पूर्ण करण्यासंर्भात गृह विभागाला लिहिण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, गडचिरोली हा नक्षलग्रस्त जिल्हा आहे. या नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये लेव्हीचा कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाला आहे, हे शासनाने मान्य केले आहे. त्याचप्रमाणे सभापती महोदय, उत्तरामध्ये असेही सांगण्यात आले आहे की, " या प्रकरणी दोषी मिलमालक व अधिकाऱ्यांविरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई करण्यासंबंधी राज्य शेतमाल आयोगाचे माजी सदस्य श्री. रविंद्र दरेकर यांनी दिनांक 20.10.2005 रोजी दैनिक तरुण भारत व दैनिक लोकमत या वृत्तपत्रांच्या माध्यमातून मागणी केली आहे. " सभापती महोदय, या प्रकरणात संबंधितांनी अटकपूर्व जामीन देखील घेतला आहे. तरी, माझा माननीय मंत्री महोदयांना पहिला प्रश्न आहे की, संबंधितांनी घेतलेला अटकपूर्व जामीन रद्द करण्यासंदर्भात शासन काही करणार आहे का ? सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील 26 राईस मिल्समध्ये लेव्ही घोटाळा झाला असल्याचे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. तरी, माझा माननीय मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न असा आहे की, ते 26 राईस मिल्सवाले कोणकोण आहेत ? ती राईस मिल्स कोणत्या लोकांच्या मालकीची आहेत व त्यामध्ये राजकीय पक्षांचा काही संबंध आहे का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, संबंधित दोषींना न्यायालयाने जामीन दिलेला आहे. तरी, या प्रकरणी वरिष्ठ न्यायालयामध्ये जाऊन जामीन रद्द करण्यासाठी शासन प्रयत्न करील. सभापती महोदय, त्या 26 राईस मिल्सची नावे मी आपल्याला वाचून दाखवितो अन्यथा पटलावर ठेवतो. सभापती महोदय, त्या 26 राईस मिल्सची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

**देसाईगंज - वडसा**

1. श्री सतपाल अवसरमल नागदेवे, अवतार राईस मिल, आमगांव, देसाईगंज
2. श्री. गुरुमुखदास सिताराम नागदेवे, निरंकारी राईस मिल, देसाईगंज
3. श्री. भास्कर किसनजी डांगे, प्रोपा. अजय राईस मिल, देसाईगंज
4. श्री. प्रभाकर किसनजी डांगे, प्रोपा. डांगे राईस मिल, देसाईगंज
5. श्री. कैलास फुलचंद अग्रवाल, तिरुपती राईस मिल, देसाईगंज
6. श्री. विजय गोविंदराव घुले, न्यु. शिवाजी राईस मिल, देसाईगंज
7. श्री. मोहनदास परिमल डेंगाणी, प्रोपा. राजमाता राईस मिल, देसाईगंज
8. श्री. हरिदास संजुमल मोटवाणी, प्रोपा. गुरुदेव राईस मिल, देसाईगंज
9. श्री. प्रदिपकुमार गोंविदराव केजडीवाल, हनुमान राईस मिल, देसाईगंज
10. सौ. लता मधुकर डांगे, प्रोपा. कल्याणी राईस मिल देसाईगंज
11. सौ. कमलाबाई देविदत्त जेजाणी, प्रोपा. जेजाणी राईस मिल, देसाईगंज
12. श्री. राजेंद्र धुनेजा अग्रवाल, मिना राईस मिल, देसाईगंज
13. श्री. सुलतान अली गुलाम अली लाखाणी, लाखाणी राईस मिल, देसाईगंज
14. श्री. दिलीप धुनिलाल अग्रवाल, दिलीप राईस मिल, देसाईगंज
15. श्री. संदिप विजय इंगळे, सरस्वती राईस मिल, देसाईगंज
16. सौ. पुजा योगराज कुथे, कुथेपाटील राईस मिल, देसाईगंज
17. श्री. यादव ऋषीजी गायकवाड, दत्त राईस मिल, कोरेगांव, देसाईगंज
18. श्री. मनोज सुरेश भर्रे, कालीमाता राईस मिल, कुरुड, देसाईगंज

**आरमोरी**

19. अमीनगुलाम हुसेनभाई जिवानी, जिवानी राईस मिल, आरमोरी
20. श्री.हैदरभाई एच. पंजवाणी, जनता राईस मिल, आरमोरी
21. श्री. राकेश श्रीहरी भोयर, भोयर राईस मिल, लोहारा, आरमोरी
22. श्री. सुधीरकुमार पुरणदास डेंगाणी, जवाहर राईस मिल, आरमोरी, ..3



**ता.प्र.क्र.16600 ....**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

23. श्री. दिलीप रामचंद्र समर्थ, दिलीप राईस मिल, मौशिखांब, गडचिरोली

**गडचिरोली**

24. श्री. अमिन कमुरुद्दिन जिवानी, वैभव राईस मिल, गडचिरोली

**चार्मोशी**

25. श्री. राजाराम देवकरन काबरा, बालाजी राईस मिल, कुनघाडा

26. श्री. जुगलकिशोर राजारामजी काबरा, हनुमान राईस मिल, कुनघाडा

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सदर राईल्स मिल्सवर गुन्हा दाखल झाल्यानंतर देखील त्या ठिकाणी आता देखील मार्केटिंग फेडरेशनकडून हमी भावाने घेतलेला तांदूळ अथवा धान्य भरडले जात आहे हे खरे आहे का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती माझ्याकडे नाही. परंतु सध्या त्या राईस मिल्स सुरु आहेत हे निश्चित आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी देखील मार्केटिंग फेडरेशनचा संचालक आहे. सभापती महोदय, या ठिकाणी गुन्हा दाखल झाला असतानाही हमी भावाने धान्य घेऊन दळले जात आहे. तरी, संबंधित राईस मिल्सवर व अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करणार आहात का ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.16600...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राईस मिल मालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, त्यांच्यावर कारवाई सुरु झालेली आहे, राईस मिल मालकांना अन्न महामंडळाकडून राईस देण्यात आला असेल व त्या मिल चालू करण्यात आल्या असतील तर त्या ताबडतोब बंद करण्यात येतील.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सदर गुन्हयांचा तपास गुन्हा अन्वेषण विभागाकडे 22.11.2004 रोजी सोपविण्यात आलेला आहे. मी या सभागृहामध्ये गेल्या 5 वर्षापासून सभासद आहे, अनेक गुन्हयांच्या संदर्भात विधिमंडळाच्या माध्यमातून, सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून सीआयडी चौकशीची मागणी करण्यात येते, त्याप्रमाणे राज्य शासनाकडून सदर गुन्हयांच्या तपासाचे काम राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात येते. परंतु सदर गुन्हयांच्या तपासासाठी ठराविक कालावधी म्हणजे 3 महिने, 6 महिने किंवा 1 वर्षे असा ठरवून देण्यात येत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, राईस मिल मालकांच्या संदर्भातील प्रकरण गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आलेले आहे, या प्रकरणाचा तपास किती दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे ? आपल्या खात्याचा हा विषय नसला तरी याबाबत गृह विभागास कळवून सदर गुन्हयाचा तपास लवकरात लवकर करण्यात येणार आहे काय ?

श्री. सनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, ती वस्तुस्थिती खरी आहे. गडचिरोली जिल्हयातील अनेक राईस मिल मालकांनी तांदूळ जमा करतांना अनियमितता केलेली आहे असे चौकशीत आढळून आलेले आहे, शेजारील राज्यातून सदर राईस मिल मालकांनी स्वस्थ धान्य आणून येथे अतिरिक्त दराने त्यांची विक्री केलेली आहे. म्हणूनच या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभगाकडे सोपविण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा तपास येत्या 3 महिन्यांत पूर्ण करण्यात यावा, याबाबत गृह विभागास विनंती करण्यात येईल.

------------------------

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई शहर व उपनगरात दिनांक २६ जुलै, २००५ रोजी अतिवृष्टीचा फटका बसलेल्या पुरग्रस्तांना वाटप करण्यात आलेले सदोष धान्य वाटप**

**(५) * १३२९१ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक १०७०४ ला दिनांक १६ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २६ जुलै, २००५ रोजी वा त्यानंतर मुंबई उपनगरामध्ये झालेल्या अतिवृष्टीचा पुरग्रस्तांना धान्य वाटपाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार चौकशीची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच पुरग्रस्तांना धान्य वाटप करणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व ती कधी पर्यंत पुर्ण होणे अपेक्षीत आहे ?

**श्री. बाबा सिद्दिकी, श्री. सुनील तटकरे यांच्याकरिता**: (१), (२) व (३) पूरग्रस्ताना अन्नधान्य न मिळाल्याबाबतच्या बहुतांशी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी पूर्ण करुन अन्नधान्याचे वाटप झाले असल्याची खातरजमा करण्यात आली आहे. उर्वरीत तक्रारींची चौकशी सुरु असून ती लवकरच पूर्ण करण्यात येत आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईमध्ये आणि उपनगरांमध्ये पूरग्रस्तांना अन्नधान्य न मिळाल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच अनेक पूरग्रस्तांना अन्नधान्यांचे वाटप निकषाप्रमाणे करण्यात आलेले नाही. याबाबत झालेल्या चौकशीमध्ये प्रत्यक्षात जे पुरग्रस्त होते त्यांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले नाही. परंतु त्यांच्या नावे अन्नधान्याचे वाटप दाखविले गेले आहे अशी किती प्रकरणे उघडकीस आलेली आहेत ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, हमारे पास कुल 99 शिकायतें आईं थी. इसमें से 40 शिकायतें सही पायी गयीं. 34 लोगों को धान्य दिया जा चुका है और 6 लोग धान्य लेने के लिए नहीं आए. हमारे पास ऐसी कोई भी शिकायत नहीं आई है कि दूसरे के नाम पर धान्य लिया गया है.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, धान्य वाटपात जो गैरव्यवहार झालेला आहे त्या संदर्भात मी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी माननीय श्री. नारायण राणे, महसूल मंत्री यांनी असे आश्वासन दिले होते की, ज्या मतदार संघामध्ये अशा प्रकारे अन्नधान्याचे वाटप झाले त्याबाबत शासन चौकशी करुन कारवाई करेल, माननीय मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत सदर ठिकाणी धान्य वाटप झाले होते, धान्य वाटपात जो गैरव्यवहार झालेला आहे त्याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे ?

....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मा. सदस्य गडकरी जी जो कह रहे हैं, उस प्रकार का एक उल्लेख एक समाचार पत्र में आया था. गडकरी जी जिस जगह की बात कर रहे हैं, वह खेरवाडी तालुका है और यह मीठी नदी के नजदीक है. इस तरह की तक्रार किसी ने हमारे पास नहीं दी है. सब लोगों को मालूम है कि मीठी नदी के पास क्या हालात थे.

श्री. नितीन गडकरी : ऐसी जानकारी लोगों ने दी है.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, ऐसी कोई शिकायत हमारे पास नहीं आई है. किसी स्पेसीफिक व्यक्ति की शिकायत आई तो शासन जांच करके कार्रवाई करेगा.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ..... 14:35

ता.प्र.क्र.13291 ....

श्री.पांडुरंग फुंडकर : या ठिकाणी माननीय राज्यमंत्रिमहोदय शासनाकडे याबाबत कुठल्याही प्रकारच्या तक्रारी आल्या नसल्याची माहिती सांगत आहेत. माझा माननीय राज्यमंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, दि. 26 जुलै रोजी आलेल्या महापूरामुळे पूरग्रस्तांना धान्य वाटप होत असताना त्यामध्ये जे लोक पूरग्रस्त नव्हते अशा प्रकारच्या लोकांना सुध्दा भिवंडी शहरामध्ये धान्य वाटप झाल्याच्या तक्रारी माननीय मंत्रिमहोदयांकडे आल्या होत्या काय ? यासंबंधी मी स्वत: माननीय मंत्रिमहोदय श्री.सुनील तटकरे यांच्याशी फोनवरुन बोललो होतो. यानंतर सुध्दा पूरग्रस्त नसलेल्या लोकांना धान्य वाटप करण्यात आले हे खरे आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माझ्याकडे तक्रार केली होती ही बाब खरी आहे. या प्रकरणी मी सर्व संबंधित अधिका-यांना बोलावून ज्या ठिकाणी असे वाटप होत असेल ते ताबडतोबीने थांबवण्याच्या सूचना केल्या व यानंतर ताबडतोब माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या कार्यालयात फोन करुन त्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे कळवले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : ज्यावेळी आम्ही माननीय मंत्रिमहोदयांना ही बाब कळवली त्यावेळी धान्य वाटप थांबवण्यात आले याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. परंतु त्यापूर्वी जे बोगस पध्दतीने धान्य वाटप करण्यात आले त्यामध्ये कोणी सापडले काय ? कोणाच्या सूचनेवरुन धान्य वाटप करण्यात आले ? याबाबतची आम्हाला माहिती मिळालेली नाही. अशा परिस्थितीत माननीय राज्यमंत्रिमहोदय, या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या तक्रारी आल्या नसल्याची चुकीची माहिती देत आहेत. भिवंडी, अंबरनाथ व बदलापूर या ठिकाणी बोगस धान्य वाटपाबाबतच्या अनेक तक्रारी आल्या होत्या.

श्री.सुनील तटकरे : दि. 26 जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्तांना खुलेआम धान्य वाटप करण्याबाबत राज्य शासनाकडून सूचना देण्यात आल्या होत्या. त्यावेळी अतिशय भयावह परिस्थिती होती. अशा परिस्थितीत लोकांना तातडीने धान्य वाटप होणे गरजेचे होते. म्हणून लोकांना खुलेआमपणे रस्त्यावर धान्य वाटप व रॉकेलचे वाटप करण्यात येत होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ..... 14:35

ता.प्र.क्र.13291 ....

श्री.पांडुरंग फुंडकर : अंबरनाथ तसेच बदलापूर येथील राष्ट्रवादी काँगेसच्या कार्यालयातून लोकांना धान्य वाटप करण्यात आले होते. असे असतांना सुध्दा माननीय राज्यमंत्रिमहोदय सभागृहाला चुकीचे उत्तर देत आहेत.........

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, सम्माननीय विरोधी पक्ष के नेता ने कहा है कि राष्ट्रवादी कांग्रेस के आफिस से धान्य बांटा गया है. मैं आपको बताना चाहता हूँ कि मुंबई शहर के जो हालात थे, उसको देखते हुए राज्य सरकार ने तुरंत मदद की है. मेरे पास ऐसी 50 शिकायतें आई हैं कि शिवसेना की शाखाओं में भी धान्य बांटा गया है......गोंधळ .....सभापति महोदय, मेरा उत्तर अभी खत्म नहीं हुआ है......

( यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13291 .....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मुंबईत झालेल्या अतिवृष्टीच्या काळात निर्माण झालेल्या अत्यंत भयावह परिस्थितीमध्ये लोकांना जीवनावश्यक वस्तुंचे शासनाकडून जे वाटप झाले त्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे आणि या संबंधात येथे उपप्रश्न विचारीत असताना हे वाटप योग्य पद्धतीने झाले आहे की अयोग्य पद्धतीने झाले आहे या दृष्टीनेच यावर चर्चा करणे आवश्यक आहे. म्हणून मी सत्ताधारी पक्षाच्या बाजूकडील मंत्र्यांना सांगेन की, आपण सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना एका मर्यादेमध्ये उत्तरे द्यावीत तसेच सदस्यांनी देखील प्रश्न विचारताना पक्षीय दृष्टीकोन टाळण्याचा प्रयत्न केला तर प्रश्नाला न्याय मिळेल. तेव्हा मी आता सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांना प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर असा प्रश्न आहे. या ठिकाणी आमच्या उपप्रश्नांना उत्तरे देत असताना माननीय राज्यमंत्री ज्या पद्धतीने उत्तरे देत आहेत ती त्यांची पद्धत आक्षेप घेण्यासारखी आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, हा प्रकार जेव्हा घडला तत्पूर्वी सह्याद्रीवर माननीय मुख्यमंत्र्यांनी 29 जुलैला एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीमध्ये मी सूचना केली होती की, हे जे वाटप केले जाईल तेव्हा ते काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हातामध्ये न देता रेशनिंग दुकानांतून करावे. असे असताना देखील माननीय राज्यमंत्री त्यावेळेस कंट्रोलर ऑफ रेशनिंग यांच्या कार्यालयात बसून होते आणि त्या ठिकाणी त्यांनी केरोसीनचे टँकर, धान्याचे वाटप काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हातून करून घेतले. .... सभापती महोदय, मी माझा प्रश्न विचारतोच आहे, पण ही अगोदरची माहिती दिल्याशिवाय मंत्र्यांकडून उत्तर येऊ शकणार नाही म्हणून ती माहिती मी येथे देत आहे. तेव्हा आता मी जे सांगितले ते सत्य आहे काय ? माननीय राज्यमंत्र्यांनी केरोसिनचे टँकर कोणाबरोबर दिले ? धान्याचे वाटप कोणत्या कार्यकर्त्यांकडून केले, पैसे वाटप करतानाही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्येच केले गेले आहे, ही वस्तुस्थिती आहे की नाही ? या संबंधीचे फोटो तसेच पत्रके देखील त्यावेळी छापली गेली होती. हे सर्व धंदे करून प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याचा जो प्रकार केला आहे तो योग्य नाही. तेव्हा त्या सर्व कार्यकर्त्यांची आपण येथे नावे सांगता की मी ती नावे येथे जाहीर करू ? .... सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर संबंधित आरोप ज्यांच्यावर आहे त्या राज्यमंत्र्यांकडून आम्हाला अपेक्षित नाही तर माननीय मंत्र्यांनी याचे उत्तर द्यावे अशी आमची आग्रही मागणी आहे.

....... आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला आरोपी राज्यमंत्र्यांकडून उत्तर नको, मंत्री महोदयांनी याचे उत्तर द्यावे. ....

( विरोधी सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा .... )

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मुझे संरक्षण चाहिए. सभापति महोदय, मुंबई शहर पर जब यह आपत्ति आई तो सहायता करते समय न हमने जात देखी, न हमने पात देखी और न हमने पार्टी देखी. सरकारी मशीनरी के साथ में सभी पार्टी के लोग थे. मैं आपको विधायकों और बी.जे.पी. के नगरसेवकों के नाम बता सकता हूँ. बी.जे.पी. के नगरसेवक राजेश शर्मा और गजानन कीर्तिकर रेशनिंग अधिकारी के साथ जाते थे और धान्य का वितरण किया गया है. मुंबई और ठाणे शहर में 8617 मैट्रिक टन गेहूँ, 11655 मैट्रिक टन चावल और 9023 किलो लीटर केरोसिन का वितरण किया गया है.

( विरोधी पक्ष सदस्य एकदम बोलत असतात ... घोषणा देतात .... गोंधळ .. )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी शांत व्हावे ..... आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे. ..

( गोंधळ )

..... आय 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात अस्तित्वात नसलेल्या 20 आश्रमशाळांना अनुदान दिल्याबाबत**

**(6) * 16144 श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. संजय दत्त** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात सुमारे 20 आश्रमशाळा अस्तित्वात नसतानादेखील या संस्थांचे अनुदान शासनाकडून घेतले जाते असे राज्य शासनाने नेमलेल्या राज्य लेखा समितीला दिनांक 23 डिसेंबर, 2005 चे दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप या प्रकरणाची चौकशी करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित** : (1) नाही.
(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही. राज्य लेखा समितीचा अहवाल प्राप्त झालेला नसल्याने चौकशी करण्यात आलेली नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आश्रमशाळांची तपासणी करण्यासाठी राज्य शासनाने विधीमंडळ सदस्यांची समिती नेमली आहे हे खरे आहे काय ? तसेच सदर समितीने राज्यातील आश्रमशाळांची तपासणी करण्यासाठी डिसेंबर 2005 च्या सुमारास दौऱ्याचे आयोजन केले होते हे खरे आहे काय ?

( यानंतर श्री. सरफरे ..... जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 16144..

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आश्रमशाळांच्या तपासणीसाठी आमदारांची समिती नेमलेली नाही.

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याचा प्रकार राज्य शासनामार्फत करण्यात आला आहे त्याचा आम्ही निषेध करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाकडील सर्व माननीय सदस्य सभात्याग करतात.)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय देत असलेली माहिती वस्तुस्थितीला धरुन नाही. पहिल्या प्रश्नामध्ये "राज्यात सुमारे 20 आश्रमशाळा अस्तित्वात नसताना देखील या संस्थांचे अनुदान शासनाकडून घेतले जाते असे राज्य शासनाने नेमलेल्या राज्य लेखा समितीला दिनांक 23 डिसेंबर, 2005 चे दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय?" असे विचारले असता त्याला उत्तर देतांना "अशी समिती नेमली नव्हती" असे माननीय मंत्र्यांनी सांगितले. सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री. जगन्नाथ शेवाळे, गिरीष बापट, राजेंद्र पाटणी, गोपालदास अग्रवाल या सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. आणि ज्या आश्रमशाळांमध्ये गैरव्यवहार चालू आहे त्यांची तपासणी करणे अशाप्रकारची या समितीची कार्यकक्षा ठरविण्यात आली होती. समितीने केलेल्या तपासणीमध्ये 20 आश्रमशाळा बोगस असल्याचे आढळून आले. या आश्रमशाळा शासनाची मदत लाटत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी अशाप्रकारची शिफारस समितीने केली. तेव्हा लेखा समितीच्या माध्यमातून अशाप्रकारची समिती नेमण्यात आली होती काय? तसेच, या समितीने 20 बोगस आश्रमशाळांवर कारवाई करावी अशाप्रकारची शिफारस केली होती काय? असल्यास, आपण त्या आश्रमशाळांवर कारवाई केली आहे काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आमदारांची लेखा समिती नेमण्यात आली होती काय? असा प्रश्न विचारला असून अशापध्दतीची कोणतीही समिती नेमण्यात आली नव्हती. तसेच, त्या समितीने शासनाकडे कोणताही रिपोर्ट दिल्याची माहिती नाही. माननीय सदस्यांकडे त्या संदर्भात माहिती असल्यास व त्यांनी ती शासनाकडे दिल्यास त्यासंबंधी संपूर्ण चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ज्या ठिकाणी आश्रमशाळा आहेत त्या ठिकाणी शासनाची मदत पोहोचत नाही, आणि ज्या ठिकाणी आश्रमशाळा अस्तित्वात नाहीत त्या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 16144..

शासनाचे अनुदान दिले जाते. ज्या आश्रमशाळा अस्तित्वात आहेत त्यांची नावे काय आहेत? त्या संस्थांची नावे काय आहेत ते आपण सांगा?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ज्या आश्रमशाळा सुरु नाहीत अशा कोणत्याही आश्रमशाळेला अनुदान दिले गेले नाही. माननीय सदस्यांकडे त्या आश्रमशाळांची यादी असेल तर त्यांनी ती माझ्याकडे दिल्यास त्या आश्रमशाळांची चौकशी करुन कारवाई केली जाईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, श्रीमती सुप्रिया सुळे व श्री. लक्ष्मण माने यांनी यापूर्वी सुध्दा शेकडो बोगस आश्रमशाळांची यादी शासनाकडे दिलेली आहे. त्या आश्रमशाळांमध्ये बोगसगिरी चालू आहे. शासनाच्या अनुदानाच्या रकमेची लूटमार करण्याचे काम चालू आहे. ही वस्तुस्थिती असतांना, त्या ठिकाणी लेखा समिती नेमलेली असतांना मंत्रिमहोदय सांगतात की अशी कोणतीही समिती नाही. मंत्रिमहोदय अशाप्रकारचे बेजबाबदारपणाचे उत्तर देत आहेत. तेव्हा या समितीची चौकशी करुन आपण तिने सादर केलेला अहवाल मागवून घेणार काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, माननीय सदस्य ज्या गोष्टींचा उल्लेख करीत आहेत ती प्रामुख्याने व्ही.जे.एन.टी. च्या आश्रमशाळांकरीता समिती नेमली गेली होती असे मला वाटते. तरीसुध्दा त्यांनी वारंवार मागणी केल्याप्रमाणे तशाप्रकारची समिती नेमली गेली असेल आणि त्या समितीने अहवाल सादर केला असेल तर त्यासंबंधी निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

**सभापती** : माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला आहे. त्या अनुषंगाने आपण सखोल चौकशी करावी. आणि आश्रमशाळांना अनुदान देण्यासंबंधी जर गैरप्रकार होत असेल तर आपण ते माननीय सदस्यांच्या मदतीने हुडकून काढून योग्य ती कारवाई करावी.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माननीय मंत्री ठाणे जिल्हयातील एका आदिवासी आश्रमशाळेच्या उद्‌घाटनाकरिता आले होते. त्यावेळी त्यांनी दीड कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. त्या घोषणेचे पुढे काय झाले हे आम्हाला कळेल कां?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आश्रमशाळांच्या दुरुस्तीसाठी जेवढया निधीची आवश्यकता असेल तेवढा निधी पुरविला जातो. त्यासाठी दीड कोटीच काय, दोन कोटी रुपये लागले तरी आम्ही देत असतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 16144..

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी घोषणा करुन सहा महिने झाले तरी पुढे काहीच कारवाई झालेली नाही?

( उत्तर देण्यात आले नाही )

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शहापूर (जि. ठाणे) येथील आदिवासींना भात, वरई, नागली व कडधान्य एकाधिकार भावापेक्षा जास्त भावाने खरेदी करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(7) * 13495 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , मेजर सुधीर सावंत** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शहापूर (जि. ठाणे) येथील आदिवासींना भात, वरई, नागली व कडधान्य एकाधिकार भावापेक्षा जास्त भावाने खरेदी करण्यासाठी परवानगी देण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींनी यांनी मा. आदिवासी विकास मंत्री यांना माहे डिसेंबर, 2005 रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निवेदनाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, आदिवासींना जादा दराने धान्य खरेदीची परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत** : (1) मा.लोकप्रतिनिधींनी या विषयीचे निवेदन 8-11-2005 रोजी दिलेले आहे.

(2), (3) व (4) महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा 1976 अन्वये कृषि उत्पन्न बाजार समितीतील बाजार भावानुसार जिल्हाधिकारी यांच्या समितीने निश्चित केलेल्या दराने आदिवासी कास्तकारांना उचित भाव देण्यात आलेले आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, धान्य एकाधिकार खरेदी केंद्रावर आदिवासी धान्य विकत असतात. परंतु केंद्रावर त्यांना वेळेवर पैसे मिळत नसल्यामुळे, त्याचे हाल होतात. परिणामी आदिवासी व्यापाऱ्यांना धान्य विकतो. महामंडळाच्या केंद्रावर माल विकला जात नाही, चोरट्या मार्गाचे माल विकला जातो,म्हणून माझा प्रश्न असा आहे की, आदिवासींवर पोलीस केसे केलेल्या आहेत, हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचा माल विकण्याची व्यवस्था केली जाईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या मालाचे वेळेवर पैसे दिले जात असतात. ही रक्कम मोठी असेल तर दोन-तीन दिवसामध्ये चेक दिला जातो. सन्माननीय सदस्यांनी कास्तकारांवर पोलीस केस दाखल केल्या जातात काय असा प्रश्न विचारलेला आहे.परंतू आता पर्यन्त अशा पध्दतीने कोणत्याच कास्तकारावर पोलीस केस दाखल केली नाही. अशा पध्दतीने कोणत्याच कास्तकारांवर पोलीस केस दाखल करण्यात आलेली नाही.

SKK/ MAP/ KGS/

**पुणे (हवेली) शहरातील दुय्यम निबंधकाला लाच घेताना पकडल्याबाबत**

**(8) * 17145 श्री. शांताराम करमळकर , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. श्रीकांत जोशी , श्रीमती संजीवनी रायकर** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरातील हवेलीच्या दुय्यम निबंधकाला प्लॅटचे मूळ दस्तऐवज देण्यासाठी 500 रुपये लाच घेताना दिनांक 19 फेब्रुवारी, 2006 रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने रंगेहात पकडले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय,

(3) असल्यास, तपासात काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार दोषी व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे,श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) होय. सदरची घटना दिनांक 18 फेब्रुवारी 2006 रोजी घडलेली आहे.

(2), (3) व (4) प्राथमिक तपासणीमध्ये श्री.बबन मारुती काळे, प्रभारी दुय्यम निबंधक यांनी लाच घेतल्याचे दिसून आले आहे. दि.6-3-2006 रोजी त्यांना शासकिय सेवेतून निलंबित करण्यात आले असून सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, दिनांक 18 फेब्रुवारी 2006 रोजी घटना धडली, त्यानंतर 15 दिवसामध्ये प्रभारी दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्याची कारवाई केली. तत्परतेने कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. अशाच प्रकारे पोलीस तपास त्वरित पूर्ण करुन पुढील कार्यवाही किती दिवसामध्ये पूर्ण करण्यात येईल ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : संबंधित प्रकरणामध्ये पोलीस तपास सुरु आहे. पोलिसांनी तक्रार आल्यानंतर ताबडतोबीने तपास सुरु केला. संबंधितांना पैसे घेतांना पकडले, त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. पुढील पोलीस तपास लवकरात लवकर पूर्ण करुन संबंधितांवर खटला दाखल करण्यात येईल .

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**राज्यातील शालेय पोषण आहारात केळी, बिस्कीटे व अंडी देण्याचा निर्णय**

**(9) * 13920 श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक 11220 ला दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात शालेय पोषण आहारात प्रति विद्यार्थी प्रति दिन 100 ग्रॅम तांदळाच्या खिचडी व्यतिरिक्त शाकाहारी विद्यार्थ्यांना आठवड्यातून किमान एकदा केळी किंवा बिस्कीटे व इतर विद्यार्थ्यांना अंडी देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(2) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीची व शाळांना निधी उपलब्ध करुन देण्याची सद्य:स्थिती काय आहे,

(3) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (1) शालेय पोषण आहारात प्रति विद्यार्थी प्रतिदिन 100 ग्रॅम तांदुळाच्या खिचडी व्यतिरिक्त, शाकाहारी विद्यार्थ्यांना आठवड्यातून किमान एकदा केळी किंवा बिस्कीटे व इतर विद्यार्थ्यांना अंडी देण्याचा शासनाने मार्च, 2005 मध्ये निर्णय घेतला आहे.

(2) राज्यात सर्वत्र या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत आहे. योजनेच्या अंमलबजावणीस्तव राज्यशासनाने 2005-2006 या वर्षासाठी राज्यशासनाचा हिस्सा म्हणून रु. 90.44 कोटी व केंद्रशासनाच्या हिश्श्यापोटी रु. 113.52 कोटी वितरित केले असून, शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांच्याकडून सर्व निधीचे वाटप संबंधितांना करण्यात आलेले आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शालेय पोषण आहारामध्ये तांदळाच्या खिचडी व्यक्तिरिक्त आठवड्यातून एकदा शाकाहारी विद्यार्थ्यांना केळी किंवा बिस्कीटे आणि मांसाहारी विद्यार्थ्यांना अंडी देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु तो आहार दिला जात नाही, याची आपण चौकशी केलेली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, सध्या बर्ड ब्ल्यूचा रोग असल्यामुळे मुलांना अंडी देण्याऐवजी त्याला पर्याय म्हणून ड्रायफ्रूट दिले जाणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : आपण मुलांना खिचडी रोज देत आहोत. आठवड्यातून एकदा केळी, बिस्कीटे किंवा अंडे दिले जात असते. परंतु बर्ड फ्ल्यूमुळे अंडे देण्याचे बंद केलेले आहे. आठवड्यातून एकदा त्यांना बिस्कीटे किंवा केळी देण्यात येतात.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

ता.प्र.क्र.13920 (पुढे सुरु...

श्री.नानसाहेब बोरस्ते : बर्ड फ्ल्यूमुळे अंडी देण्याचे बंद केलेले आहे. या अंड्याच्या ऐवजी पर्यायी कोणता पदार्थ देण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : आपण केळी किंवा बिस्कीटे आठवड्यातून मुलांना देतोच. यासाठी राज्य सरकारचे 50 पैसे आणि केंद्र सरकारचे 1 रुपये 50 पैसे आहेत. असे मिळून 2 रुपयामध्ये या वस्तू देण्यात येतात.

श्री. नानासाहेब बोरस्ते : मुलांना बिस्कीटे, केळी दिली जात नाहीत, हे तपासून पाहिलेले आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : शिक्षण संचालक, प्राथमिक यांना संपूर्ण राज्यामध्ये दौरा करण्यास सांगितलेले होते. त्याप्रमाणे त्यांनी दौरा करुन अहवाल दिलेला आहे की, प्रत्येक आठवडयामध्ये हा आहार दिला जात असल्याचे आढळून आलेले आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13920 ......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. हे जे वाटप होते त्यामध्ये अनेक शाळांमध्ये केळी, बिस्किटे किंवा अंडी यांचे वाटप होत नाही. आता अंड्यांचा विषय संपलेला आहे परंतु केळी, बिस्किटे यांचे अनेक शाळांमध्ये वाटप होत नाही. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, आमच्या संचालकांनी रिपोर्ट दिला आहे. या ठिकाणी आम्ही आमची माहिती देत आहोत. अनेक शाळांमध्ये अशा प्रकारे केळी आणि बिस्किटांचे वाटप केले जात नाही. शासन याची चौकशी करणार काय ? हे वाटप झाले नसेल तर त्याला जबाबदार कोण ? त्याची कारणे काय ? याची माहिती पटलावर ठेवली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आता ती भूतकाळातील गोष्ट झाली आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी वाटप केले नाही आणि ते म्हणतील की, आम्ही वाटप केले. माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या नेतृत्वाखाली कोठेही पाहणी करावी. जर त्या ठिकाणी अंडी आणि केळी देण्यात येत नसतील तर ते काम त्यांच्याकडून काढून घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय ही बाब फार लाईटली घेत आहेत. शासनाने यासाठी सुमारे 200 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर, चिपळूण तालुक्यात गेल्यावर्षी एकाही शाळेत अंडी, केळी दिली गेली नाहीत. मी एका शाळेचा चेअरमन आहे. माननीय मंत्रिमहोदय लाईटली सभागृहाला सांगत आहेत की, ती बाब भूतकाळात गेलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये कोणत्याही शाळेत अंडी दिली गेलेली नाहीत. याची शासन चौकशी करणार काय ? त्यातून जे निष्पन्न होईल त्यासंदर्भात एक महिन्याच्या आत कठोर कारवाई करणार काय ? पैसे रिकव्हर करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही ही बाब गांभीर्याने घेतलेली आहे. लहान मुलांशी, ग्रामीण भागातील मुलांशी आमची नाळ जुळलेली आहे. मी निश्चितपणे सांगेन की, सन्माननीय सदस्य जी माहिती सांगत आहेत ती माहिती तपासून पाहिली जाईल. त्याबाबत चौकशी केली जाईल. कठोर कारवाई केली जाईल आणि पैसे रिकव्हर केले जातील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ MAP/ KGS/ SBT

ता. प्र. क्र. 13920 ......

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देत असताना "मांसाहारी मुले" असा उल्लेख केलेला आहे. त्याऐवजी "मांसाहार करणारी मुले" असे उत्तर दुरुस्त करावयास पाहिजे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने 90.44 कोटी रुपये दिले आणि केंद्र शासनाने 113.52 कोटी रुपये दिलेले आहेत. माझ्याजवळ नागपूर विभागाच्या उपसंचालकांची माहिती आहे....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मी या ठिकाणी पुरावा देत आहे. त्या ठिकाणी कार्यवाही झालेली नाही. उपसंचालकांचे 24 मार्चचे पत्र आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, सर्वशिक्षा अभियानांतर्गत काही ठिकाणी मुलांना बिस्किटे, केळी दिली जात नाहीत. तेव्हा एक दिवस बिस्किटे, एक दिवस अंडी, एक दिवस केळी द्यावी आणि त्याचा चार्ट लावावा असे पत्र सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना देतो. नागपूर विभागात हे दिले गेलेले नाही. मात्र सर्व पैसे घेतलेले आहेत. ज्या जिल्ह्यामध्ये याचे वाटप झालेले नाही त्यांच्यावर कारवाई करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, खरेदी करण्यासाठी ॲडव्हान्स पैसे देण्याची तरतूद आहे. परंतु तीन तीन महिने पैसे देत नाहीत. त्यामुळे शाळा अंडी, केळी कोठून घेणार ? आपल्याकडे केंद्र शासनाकडून ॲडव्हान्स येतो तसेच राज्य शासन सुध्दा शाळांना ॲडव्हान्स देत असते...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचा नसेल तर मी आपला प्रश्न थांबवितो.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, ज्यांनी अंडी, केळी दिली नाही त्या अधिकाऱ्यांवर एक महिन्याच्या आत कारवाई करणार काय ? ॲडव्हान्स पैसे दिल्याशिवाय शाळा अंडी, केळी देऊ शकत नाहीत. शाळांना शासन ॲडव्हान्समध्ये पैसे देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 31 मार्चपर्यंतची सगळी बिले दिलेली आहेत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, एका प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.. यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे प्रश्न विचारतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ MAP/ KGS/ SBT

ता. प्र. क्र. 13920 ...... .

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. त्यामुळे मी बहिर्गमन करतो.

( सन्माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे बहिर्गमन करतात )

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण या भागातील काही शाळांना मी भेटी दिलेल्या आहेत.. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आठवड्यातून एकदा केळी, बिस्किटे, अंडी दिली जातात. अनेक शाळांमध्ये या गोष्टी दिल्याचे आढळून आले नाही. खिचडी व्यतिरिक्त आठवड्यातून एक दिवस हा पोषण आहार देतो. जी खिचडी दिली जाते त्यामध्ये मुगाची डाळ नसते. केवळ हळद घालून पिवळा भात दिला जातो. ही गोष्ट माननीय मंत्रिमहोदयांनी लक्षात घेतली पाहिजे. महाराष्ट्रातील 75 टक्के भागांमध्ये, अनेक शाळांमध्ये आम्ही फिरलो. त्या ठिकाणी या वस्तूंचे वाटप होत नाही. शासन याची पुन्हा चौकशी करणार काय ? ज्या अधिकाऱ्यांनी वाटप केले नसेल त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. मी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी कधीही, कोठेही भेट द्यावी आणि त्या ठिकाणाहून आम्हाला कळवावे. त्यासंदर्भात कारवाई करण्यात येईल. त्यांना काढून टाकण्यात येईल आणि पैसे रिकव्हर करण्यात येतील असे मी सांगितले आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 13920....)

श्री. रामनाथ मोते : शालेय पोषण आहाराच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. शालेय पोषण आहारात केळी, बिस्किटे व अंडी देण्यात येतात असे शासनाचे म्हणणे आहे आणि ती दिली जात नाहीत अशा तक्रारी आहेत. ज्या शाळांमध्ये केळी, बिस्किटे व अंडी दिली जात नाहीत अशा शाळांची यादी माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांकडे दिली तर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : यासंदर्भात काही तक्रारी असतील तर त्या माननीय सदस्यांनी आमच्याकडे द्याव्यात. त्याबाबतीत एक महिन्याच्या आत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री. सागर मेघे : माननीय राज्यमंत्री महोदयांकडे शालेय शिक्षण तसेच पशुसंवर्धन ही खाती आहेत. आता बर्ड फ्लू असल्यामुळे शाळेतील मुलांना अंडी देण्याचे बंद करण्यात आलेले आहे. तसेच एका कोंबडीमागे 20 रु. नुकसान भरपाई देण्याचेही शासनाने जाहीर केलेले आहे. शासन अंडी विकत घेईल असेही सांगण्यात येते. दुस-या बाजूला मुलांना अंडी देण्याचे बंद केलेले आहे असे शासन सांगते. शासनाचे असे दुहेरी पध्दतीचे धोरण का आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : माननीय सदस्यांना माहीतच आहे की, आपल्या राज्यातील दोन जिल्ह्यांमध्ये बर्ड फ्लूची लागण झालेली असल्यामुळे लहान मुलांना अंडी देण्याचे बंद केलेले आहे. अंडी किंवा कोंबडी जर 70 डिग्री सेल्सियच्या तापमानाला व्यवस्थितरित्या शिजवली तर बर्ड फ्लू होत नाही असे पशुसर्वर्धन विभागामार्फत सातत्याने सांगितलेले आहे. तरी देखील मुले लहान असल्यामुळे जोपर्यन्त बर्ड फ्लू आहे तोपर्यन्त त्यांना अंडी देण्याचे थांबविलेले आहे.

कर्नल सुधीर सावंत : शालेय पोषण आहाराच्या संदर्भात ज्या ज्या तक्रारी प्राप्त होतील त्यासंदर्भात कारवाई केली जाईल असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. परंतु राज्यातील प्रत्येक गावामधील शाळांची तपासणी करणे माननीय सदस्यांना शक्य होणार नाही. परंतु शालेय पोषण आहाराच्या बाबतीत गैरप्रकार होतच असतात. केळी, बिस्किटे, अंडी पुरविण्याचे काम महिला बचत गटाना दिले जावे असे माझे मत आहे. माझा प्रश्न असा आहे की, शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी पारदर्शकपणे होण्याच्या दृष्टीने शासन कोणती यंत्रणा निर्माण करणार आहे?

..2..

(ता.प्र.क्र. 13920...)

श्री. हसन मुश्रीफ : आदेशामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. ग्राम शिक्षण समितीला हे अधिकार दिलेले आहेत. महिला बचत गटांना याबाबतीत प्राधान्य द्यावे असे त्यांना सांगितले जाईल. यामध्ये शेगडी, किचन ओटा इत्यादी बाबी असणे अभिप्रेत आहे. ही योजना पारदर्शक केलेली आहे. या योजनेमध्ये जर कोठे गैरप्रकार होत असतील तर ते शासनाच्या निदर्शनास आणून द्यावेत अशी मी माननीय सदस्यांना विनंती केलेली आहे. राज्यामध्ये 75353 शाळा असून 89 लाख 93 हजार मुले त्या योजनेचा लाभ घेत आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीच्या बाबतीत कोठे ना कोठे गैरप्रकार होत असतील तर त्याबाबतीत कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मघाशी आपण माननीय मंत्रीमहोदयांना निदेश दिल्यानंतर माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी सभात्याग करुन आपला अवमान केलेला आहे असे मला वाटते. तेव्हा आपण त्यांना याबाबत दिलगिरी व्यक्त करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : अशा पध्दतीने बहिर्गमन करणे टाळाता आले तर ते टाळावे अशी माननीय सदस्यांना माझी विनंती आहे. माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी त्याबाबतीत दिलगिरी व्यक्त करावी असे त्यांना सांगणे योग्य वाटत नाही. ते सूज्ञ सदस्य आहे.

डॉ. वसंत पवार : सन्माननीय सदस्यांना माननीय सभापतींचा अवमान करण्याचा हेतू होता का हे तरी त्यांनी स्पष्ट करावे ?

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही म्हणून मी नाराज झालो. माननीय सभापतींचा अवमान करण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता. तेव्हा माझ्या बाबतीत असे म्हणणे योग्य नाही.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 15:05

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. वसंतराव पवार यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे तो बरोबर आहे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांना मी सांगत होतो की माझ्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करा. या सभागृहामध्ये पीठासीन अधिकाऱ्याचे जे पद आहे त्या पदाची योग्य ती प्रतिष्ठा राखण्याचे काम सर्वच माननीय सदस्य सातत्याने करीत असतात. माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी सांगितले की, सभापतींचा अवमान करण्याचा माझा उद्देश नव्हता. माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी बहिर्गमन केल्यानंतर मी सांगितले की, माननीय सदस्यांनी शक्यतो असे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करावा. माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी दिलगिरी व्यक्त करावी असे मी म्हणणार नाही.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यामध्ये गेल्या काही दिवसात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नांवे मी वाचून दाखवीत आहे. 1)संजू नथूजी तागडे, रा. खंडाळा, ता.नरखेड,जि.नागपूर,2)श्री हरिश्चंद्र जयराम पुरी,रा.बोरगांव,ता.पवनी,जि.भंडारा 3) श्री. देवराव केशवराव राऊत, रा. आष्टा, ता. धामणगांव, जि. अमरावती 4) प्रकाश नथुजी तानवडे, रा.निंभारा,ता.बार्शिटाकळी,जि.अकोला 5)जयवंत विठ्ठल शेटे,रा.मंगी,ता.राळेगांव,जि.यवतमाळ 6) तेजराव दयाराम राभोरते, रा.चातारा.,ता.लाखनी,जि.नागपूर 7) अनिल केदार, रा.शेगांव, ता. वरोरा, जि.चंद्रपूर 8) मुजफ्फर खाँ करिम खाँ रा.खिडकीपुरा, ता.बार्शिटाकळी,जि.अकोला 9) मोहन रामचंद्र गोरडे,रा.घाट,ता.वरुड,जि.अमरावती 10) श्रीनिवास मधुकर वेरुळकर, रा.वैसदा, ता. जि.अमरावती 11) अर्जुन सदाशिव पाल, रा. मुरपाड, ता. हिंगणघाट, जि.वर्धा 12) गजानन उत्तमराव टाले, रा. दहेगाव, ता. अंजनसुर्जी, जि. अमरावती 13) कैलास धनराज झ ाडे, रा. लिंगा, ता. कळमेश्वर, जि. नागपूर 14) आसरु जानजी बाजड, रा. नेतनसा ता. जि. वाशिम, 15) देवराव शेटे, रा. मंगी, जि.यवतमाळ, 16) विठ्ठलराव श्रीपती गुळगुळे, रा. राजवडी, ता.जि.हिंगोली

सभापती महोदय, आतापर्यंत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 439 इतकी झालेली आहे हे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यामध्ये झालेल्या कुपोषणामुळे झालेल्या बालमृत्यूंबाबत मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. मोखाडा तालुक्यात एप्रिल 2006 मध्ये आतापर्यंत 5 बालके कुपोषणामुळे दगावली आहेत. या तालुक्यातील लहान बालके आणि माता यांना वेळीच पोषण आहार न मिळाल्यामुळे कुपोषणाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते प्रयत्न केले याची माहिती सभागृहामध्ये देण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खर्चे पी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 16 मार्च रोजी आम्ही या सदनामध्ये एक विषय उपस्थित केला होता की, अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजन् आणि त्याचा साथीदार श्री. डी.के.राव यांच्यामधील संभाषण पोलिसांनी रेकॉर्ड केलेले आहे. या संभाषणामध्ये राज्याच्या गृह राज्यमंत्र्यांचा उल्लेख असल्याची धक्कादायक बातमी त्यातून उजेडात आली होती. ही 16 मार्चची घटना उजेडात आल्यानंतर सभागृहात प्रश्न उपस्थित केला असता त्यावेळी आपण शासनाला निवेदन करण्याबाबतचे निदेश दिले होते. मागच्या घटनेनंतर आज 10 एप्रिल म्हणजेच जवळपास एक महिना होत आहे, अजूनही शासनाने त्याबाबतीतील निवेदन केलेले नाही. पण पुन्हा एक प्रकरण गेल्या आठ-दहा दिवसांमध्ये बाहेर आले व राज्याच्या गृह राज्यमंत्र्यांबरोबरच आपले सामाजिक न्याय मंत्री आणि वन मंत्री यांच्यावरही अशाच प्रकारचे आरोप वर्तमानपत्राच्या माध्यमातून झालेले आहेत. तसेच माननीय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे यांच्यासंबंधीचाही उल्लेख झालेला आहे. गेल्या दोनच दिवसात या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहाच्या बाहेर स्टेटमेंट करुन सदर मंत्र्यांना क्लिन चीट दिलेले आहे. खरे तर सभागृहात हा विषय उपस्थित केलेला असतांना व त्यावर निवेदन करण्याचे निदेश दिलेले असतांना राज्याचे माननीय मुख्यमंत्री बाहेरच्या एका कार्यक्रमात या तीन मंत्र्यांना क्लिन चीट देऊन टाकतात. हे क्लिन चीट माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणत्या आधारे दिले ? त्यांनी कोणाच्या मार्फत ही चौकशी केली आणि कोणाकडून माहिती मागविली ? याचा खुलासा झाला पाहिजे. राज्याच्या जबाबदार मंत्र्यांवर अशा प्रकारचे आरोप होतात आणि तयांना लगेच क्लिन चीट दिले जाते. साधा एखादा विषय असला तरी त्यासंबंधी सखोल चौकशी होते, एवढेच नव्हे तर सी.आय.डी. अथवा गरज पडल्यास सी.बी.आय. मार्फत चौकशी केली जाते आणि या ठिकाणी राज्यशासनाच्या मंत्र्यांवर आरोप झाले, अंडरवर्ल्ड डॉन आणि त्याचा साथीदार यांच्या आपसातील संभाषणामध्ये चार मंत्र्यांचा उल्लेख होतो त्यात माननीय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे, माननीय मंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे, माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते आणि माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्यासंबंधीची बातमी मिड-डे या दैनिकामध्ये छापून आली. अशा प्रकारचे या शासनाचे धिंडवे निघत आहेत. या संभाषणात "Hallo Don calling" अशा मथळयाखाली बातम्या येतात आणि या राज्याची अब्रू वेशीवर टांगली जात आहे व दुसरीकडे मात्र राज्याचे मुख्यमंत्री त्यांना क्लिन चीट देत आहेत. याबाबत सभागृहात निवेदन तर झालेच पाहिजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

पण माननीय मुख्यमंत्र्यांनी या मंत्र्यांना कशाच्या आधारे क्लिन चीट दिले याचाही खुलासा झाला पाहिजे. एखादया दोन माफियांच्या आपसातील बोलण्यामध्ये ज्याअर्थी मंत्र्यांच्या नावाचा उल्लेख होतो, त्या ठिकाणी जरी मंत्री प्रत्यक्षात उपस्थित नसले तरी त्यांच्या नावाचा उल्लेख होऊन "मंत्र्यांमुळे हे काम झालेले आहे" मंत्र्यांमुळे हे काम सुकर होणार आहे" "मंत्र्यांमुळे यामध्ये कसा फायदा झाला" अशा प्रकारे आपापसात चर्चा झाली, ही अतिशय गंभीर बाब आहे. आम्ही मांडलेल्या मुद्दयाच्या संदर्भात मागणी करुनही गेल्या महिन्याभरापासून शासन निवेदन करीत नाही आणि दुसरीकडे मात्र सभागृह सुरु असतांना मुख्यमंत्री या मंत्र्यांना क्लिन चीट देत आहेत. मागील अधिवेशनात अशाच प्रकारचे एक प्रकरण खालच्या सभागृहात उपस्थित करण्यात आले होते ते म्हणजे सिनेतारका ऐश्वर्या रॉय आणि सलमान खान यांच्या आपसातील संभाषणाची टेप, माननीय अध्यक्षांच्या माध्यमातून मंत्री महोदयांना सादर करण्यात आली होती. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. काय चौकशी केली तर बनावट कॅसेट म्हणून त्यांनाही क्लिन चीट दिले गेले. आमची माहिती अशी आहे की, यासंबंधीची मूळ कॅसेट चंदिगडला न पाठविता बनावट कॅसेट पाठविण्यात आली. परंतु ती कॅसेट जर खरी असेल तर अशा प्रकारे बदनाम करणाऱ्यांविरुध्द शासन कारवाई का करीत नाही ? केवळ कॅसेट बोगस आहे म्हणून अशा लोकांना विषय सोडून देण्याचे कारण काय ? अशा प्रकारे ज्या पध्दतीने मंत्र्यांच्या बाबतीत या ठिकाणी होत आहे आणि मुख्यमंत्री त्याला क्लिन चीट देत आहेत. दोन अंडरवर्ल्ड डॉन आपापसात मंत्र्यांचा उल्लेख करतात व त्या मंत्र्यांना क्लिन चीट मुख्यमंत्री देत असतील तर हा विषय गंभीर आहे. म्हणून या प्रकरणाची सी.बी.आय. मार्फत चौकशी झाली पाहिजे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी कशाच्या आधारे क्लिन चीट दिले त्यासंदर्भातील निवेदन सभागृहात करावे, बाहेर करता कामा नये अशा प्रकारचे निदेश शासनाला द्यावेत, अशी विनंती या औचित्याच्या माध्यमातून मी करीत आहे.

-----------

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकरजी यांनी औचित्याचा जो मुद्दा मांडला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. अधिवेशन सुरू झाल्यानंतर दोन दिवसांनी सदर विषय सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता. या विषयामुळे सन्माननीय मंत्रिमहोदयां विषयी आमच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होत आहे त्यामुळे त्यांच्याकडून उत्तराची अपेक्षा कशी करायची असा मुद्दा त्यावेळी उपस्थित करण्यात आला होता. तेव्हा, ताबडतोब निवेदन करण्यासंबंधीचे निदेश देण्यात आले होते. त्यामुळे हा विषय नंतर उपस्थित करण्यात आला नाही. परंतु, आता दोन गुंडांमध्ये झालेल्या संभाषणामध्ये महत्त्वाच्या व्यक्तींच्या नावांची संख्या वाढली आहे. सुरूवातीला सन्माननीय मंत्री श्री.सिद्धाराम म्हेत्रे यांचे नाव होते. त्यानंतर सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांचे नाव आले. आता तर सन्माननीय मंत्री सर्वश्री भुजबळ व पाचपुते यांची देखील नावे आली आहेत. त्यामुळे या बातमीस वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळायला लागली आहे. सभागृहामध्ये निवेदन करण्यात येईल असे सांगून सुध्दा सभागृहाच्या कामकाजाकडे दुर्लक्ष करून माननीय मुख्यमंत्र्यांनी अत्यंत बेजबाबदारपणे यासंबंधीचे निवेदन सभागृहाच्या बाहेर केलेले आहे. त्यांनी सदनाला डावलून जाहीर केले की, संबंधित मंत्री दोषी नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांना क्लीन चीटसुध्दा दिली आहे. याचा अर्थ माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनाचा अवमान केला असा होतो. ज्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा झाली, त्या विषयावर निवेदन करावे असे माननीय सभापतींनी निदेश देऊनसुध्दा माननीय मुख्यमंत्री सभागृहाच्या बाहेर निवेदन करीत असतील तर तो हया सदनाचा हक्कभंग आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, या विषयासंबंधी फैसला होण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी आज माननीय सभापतींची भेट घेतली होती. त्यांच्याकडे हा विषय उपस्थित केला होता. शासनाने निवेदन करावे असे माननीय सभापतींनी निदेश दिले होते. आज निवेदन करण्यात येईल, उद्या निवेदन करण्यात येईल असे शासनातर्फे सांगितले जाते. परंतु, प्रत्यक्षात निवेदन हे सभागृहाच्या बाहेर केले जाते हे कितपत योग्य आहे ? हे संसदीय कामकाज पद्धतीला काळिमा लावणारे आहे. सभागृहामध्ये संसदीय कार्यमंत्री बसले आहेत. त्यांना सांगू इच्छितो की, भविष्यकाळामध्ये असे घडता कामा नये. संबंधित मंत्र्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी क्लीन चीट दिलेली आहे. ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

यासंबंधी त्यांनी निवेदन केले पाहिजे. तसेच, सभागृहाची दिशाभूल का करण्यात आली ? यासंबंधीचा देखील खुलासा मुख्यमंत्री महोदयांकडून घ्यावा.

**उपसभापती** : काही सन्माननीय पाहुणे आपल्या सभागृहाचे कामकाज पहायिला आलेले आहेत. तेव्हा आपल्या सभागृहाचे वातावरण प्रसन्न ठेवावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, काही सन्माननीय पाहुणे आले आहेत, असा आपण उल्लेख केलेला आहे. ते सन्माननीय पाहुणे कोण आहेत ?

**उपसभापती** : संसदीय कार्यमंत्री आपण अनेक वर्ष राजकारणात आहात. 'त' वरून 'ताक' हे आपल्याला कळले पाहिजे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपल्या सभागृहाला प्रथा परंपरा आहेत. आपल्या सभागृहात लाल कार्पेट असते, विधान सभेच्या सभागृहात हिरव्या रंगाचे कार्पेट असते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या जो मुद्दा आहे, त्याचे मी रिपीटेशन करणार नाही. कदाचित हे मंत्री दोषी नसतील. तरी पण आज त्यांच्यावर आरोप होत आहेत. सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी केली आहे. पण वृत्तपत्रात बातमी आली आहे हे खरे आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 15:20

श्री.नितीन गडकरी....

त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, "Handore is convinced that I have links with you and Seth (Chhota Rajan). That is enough; he will believe my allegation against builders about FSI and other scams." सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांची टेप अशी आहे की, "DK Rao (speaking to Chhota Rajan): Look, who became the Superintendent and some other became the senior. Others we managed to keep at home...This Sidharam Mhetre ...I worked so hard to get them these jobs." सन्माननीय वन मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांची टेप तर अतिशय भयंकर आहे. त्यात असा उल्लेख आहे की, "अप्पा ( To D.K.Rao ) - दो करोड़ नहीं, अपने को तो तीन करोड़ मिल रहे हैं . ....किसमें पाचपुते बिठाया तभी बोल रहा हूं..... तो सच है न उसमें." सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्या संदर्भातील कॅसेटमध्ये असे म्हटले आहे की,

"कोप - वो प्रापर्टी के बारे में बात करनी थी.

तेलगी - मैंने बोला था वो डिसपोज करके समीर को उसका शेयर दे दो.

कोप - उसके डिसपोज करने में थोड़ी अड़चन है.

तेलगी - तुम भुजबळ से बात करो, वो मॅनेज कर देगा. "

माननीय गृह राज्यमंत्री कैद्यांना ट्रान्सफर करु लागले आहेत. काल-परवा या सभागृहामध्ये क्रॉफर्ड मार्केट संदर्भातील विषय ज्यावेळी उपस्थित झाला होता, त्यावेळी आमच्यावर आरोप झाले. परंतु या मार्केटच्या व्यवहारासंदर्भातील जी टेप मिळाली आहे त्यामध्ये असा उल्लेख आहे की, "वो कॉंगेस को 25 करोड़ रुपये देने की बात हो गई है." सन्माननीय श्री.विनायकराव मेटेसाहेब कॉंग्रेसला 25 कोटी, मग राष्ट्रवादी कॉंग्रेसचे काय ? 25 कोटी रुपयांच्या व्यवहारासंदर्भातील बातमी दाऊदशी संबंधीत आहे. या बाबत वर्तमानपत्रामध्ये सुध्दा छापून आले आहे. 15-20 दिवसांपूर्वी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी संभाषणामध्ये माननीय मंत्री महोदयांच्या नावाचा उल्लेख असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. तेव्हा या ठिकाणी सांगण्यात आले होते की, या विषयी निवेदन करण्यात येईल. परंतु अद्यापपर्यंत निवेदन करण्यात आले नाही. हे चार मंत्री निर्दोष असतील असे गृहीत धरुन मी आज त्यांच्यावर काही आरोप

...2



श्री.नितीन गडकरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करीत नाही. काँग्रेस पक्षाच्या व्यक्तींसोबत 25 कोटी रुपयांचा व्यवहार झाल्याप्रकरणी कॅसेटमध्ये संभाषण आहे. राष्ट्रवादी काँग्रेसवाल्यांना वाटत असेल की, एवढया मोठया व्यवहारामध्ये आमचे नाव का आले नाही ?

महोदय, राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी तर या मंत्र्यांना क्लीन चीट देऊन टाकली आहे. मी विचारु इच्छितो की, त्यांनी कोणत्या आधारावर या मंत्र्यांना क्लीन चीट दिली आहे ? या प्रकरणी त्यांनी चौकशी केली आहे काय ? महोदय, या व्यवहारांसंदर्भात आज अनेक बातम्या वर्तमानपत्रांमध्ये छापून येत आहेत. या बातम्या पत्रकारांकडे कशा पोहोचल्या ? छोटा राजन आणि डॉन यांच्या बरोबर राज्याच्या मंत्री महोदयांचे फोटो वर्तमानपत्रांमध्ये बातमीसह छापून येत आहेत. जर या बातम्या खोटया असतील तर त्या वर्तमानपत्रांवर कारवाई करणार आहात काय ?

महोदय, या सर्व टेप्स् छोटा राजन आणि दाऊद यांच्या संदर्भातील आहेत. डी.के.राव यांच्या संदर्भातील सुध्दा आहेत. त्यामुळे माझी तर अशी मागणी आहे की, या संपूर्ण प्रकरणाची सी.बी.आय. किंवा सी.आय.डी. मार्फत चौकशी करा. जर मंत्री महोदय दोषी नसतील तर सत्य बाहेर येऊ द्या. सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी तर अगोदरच सांगितले आहे की, या प्रकरणाच्या चौकशीस ते तयार आहेत. परंतु चौकशीपूर्वीच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांना क्लीन चीट दिली असेल तर ते लोकशाहीला धरुन आहे काय ? या मंत्री महोदयांसंदर्भात काय चौकशी झाली आहे ? या प्रकरणी सरकार काय करणार अहे ? महोदय, या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, या विषयी सरकारला लवकरात लवकर निवेदन करावयास सांगावे. चौकशी झाल्यानंतर दोन गोष्टी समोर येतील. चौकशीमध्ये जर हे मंत्री महोदय निर्दोष असल्याचे निष्पन्न झाले तर त्यांना न्याय मिळेल आणि दोषी असतील तर त्यांना मंत्रिमंडळातून राजीनामा द्यावा लागेल. म्हणूनच "दूध का दूध और पानी का पानी अलग होने दिजीए."

महोदय, सावंत आयोगाच्या शिफारशीनुसार माजी मंत्री श्री.सुरेशदादा जैन आणि पद्मसिंह पाटील यांच्यासंदर्भात जो निर्णय झाला तो वेगळाच विषय आहे. महोदय, आज राज्यामध्ये "ये क्या हो रहा है." खरे म्हणजे हा सर्व प्रकार अतिशय गंभीर असा आहे. त्यामुळे या विषयी सरकारला आजच्या आज निवेदन करण्यास सांगावे. या प्रकरणी सरकारची बदनामी होता कामा नये. वर्तमानत्रामध्ये राज्याच्या मंत्र्यांचे फोटो आणि बातमी छापून येणे हे राज्याची इज्जत आणि प्रतिष्ठा घालणारे आहे.

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत आपण आर्डर दिली पाहिजे. मी तर म्हणेन की, या प्रकरणाची चौकशी सी.बी.आय.तर्फे करण्यात यावी. या प्रकरणातील सत्य सभागृहासमोर आणण्यासाठी आपणास चौकशी जाहीर केली पाहिजे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी त्या मंत्र्यांना क्लिन चीट दिलेली आहे. सभापती महोदय, मग, आपण या प्रकरणाची चौकशी केली आहे की नाही ? की, चौकशी न करताच क्लिन चीट दिली आहे ? याबाबत सन्माननीय सदस्यांच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे. या प्रकरणातील सत्य जाणून घेण्याचा आमचा अधिकार आहे. तरी, यामध्ये जे काही असेल ते सभागृहात मांडावे. एवढ्या मोठ्या सहकाऱ्यांबाबत अशी घटना घडली असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करण्याबाबत आपण त्यांना आदेश द्यावेत, अशी आमची आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी चार माननीय मंत्री महोदयांसंदर्भात काही माहिती दिली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या चार माननीय मंत्र्यांना क्लिन चीट दिली आहे, हे वर्तमानपत्रामध्ये मी देखील वाचले आहे आणि आपणही वाचले असेल. मी आता आपल्याला एक गोष्ट सांगतो. कदाचित ही गोष्ट म्हणजे माझे मत असेल. मी या ठिकाणी उपसभापती या नात्याने बसलो आहे. मी आपलाच एक भाग आहे. वर्तमानपत्रामध्ये करण्यात येणाऱ्या आरोपांमध्ये कोणीही अपवाद नसतो. त्यामध्ये शिवसेनेचे, बी.जे.पी.चे कोणत्याही पक्षाचे सन्माननीय सदस्य असू शकतात आणि या अशाप्रकारे झालेल्या आरोपांची चौकशी व्हावी हे आपल्या सर्वांचे एकमत आहे. हे चुकीचे मत नाही. परंतु अशाप्रकारे किती प्रकरणांमध्ये सरकार आपल्याच लोकांची चौकशी करणार ? जर कोणी दोषी असतील तर दोषींना शिक्षा केली पाहिजे, आपण तसे निश्चित करा. परंतु कारण नसताना विपर्यास करुन बेलगाम आरोप व्हायला लागले तर भविष्यामध्ये राजकारणात कोणताही चांगला माणूस काम करण्यासाठी धजावणार नाही. तरी, अशा प्रकरणी सर्व लोकप्रतिनिधींनी प्रत्येकाच्या मागे ठामपणे उभे राहिले पाहिजे. आपण या संदर्भात मागणी केली आहे, ते ठीक आहे. परंतु आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाहीत. मी निश्चितपणे या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून काय ते सांगीन. ज्याअर्थी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना क्लिन चीट

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

दिलेली आहे...... माननीय मुख्यमंत्री हे शासनाचे प्रमुख असतात. त्यामुळे त्यांनी तसे केले असेल तर त्यांच्या हेतूबद्दल शंका घ्यावयाचे काहीएक कारण नाही. माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील त्यावेळी निश्चितपणे या संदर्भात खुलासा करतील, यात शंका नाही. तरी, तोपर्यंत आपल्या सहकाऱ्यांबद्दल कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेऊ नये किंवा शंका घेऊ नये. आज काही लोकांवर असे आरोप झाले आहेत, भविष्यात देखील काही लोकांवर असे आरोप होऊ शकतील आणि.....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या संदर्भातच मला एक गोष्ट सांगावयाची आहे.

**उपसभापती** : मला माझे बोलणे पूर्ण करु द्या. त्यानंतर आपण या संदर्भात आपला विचार मांडावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला या संदर्भात हेच सांगावयाचे आहे की, वर्तमानपत्रांनी या प्रकरणी ऑडीओ टेपचा आधार दिलेला आहे. सभापती महोदय, हे प्रकरण होम मिनिस्ट्रीच्या अंतर्गत आहे. तरी, माझा प्रश्न असा आहे की, या टेप गृह विभागाकडून बाहेर कशा काय गेल्या ? सभापती महोदय, यामध्ये काँग्रेसच्या लोकांना बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामध्ये राष्ट्रवादीचे भुजबळ देखील आहेत. सभापती महोदय, या प्रकरणात असे करण्यामागे नक्की कोणता उद्देश आहे ? अधिवेशन सुरु असताना मंत्र्यांसंबंधीची एवढी महत्वपूर्ण घोषणा सभागृहाच्या बाहेर करणे योग्य नाही. तरी, माननीय मुख्यमंत्र्यांनी या चारही माननीय मंत्र्यांविषयी सभागृहात सांगावे. लोकप्रतिनिधींचे असे चारित्र्यहनन होते, अशा प्रकारणात वर्तमानपत्रवाले टेपचा आधार घेतात आणि सरकार या संदर्भात काही बोलत नाही, हे गंभीर आहे. सभापती महोदय, आपले म्हणणे मला मान्य आहे. आपण उपसभापती आहात, आपल्यासमोर माननीय मुख्यमंत्री व शासन गौण आहे. सभागृहाचे संकेत, प्रथा, परंपरा आहे. आपल्या आदेशाप्रमाणे चौकशी होत असते. तरी, या प्रकरणी मंत्र्यांना क्लिन चीट देण्यामधील वास्तवता काय आहे, हे सभागृहाला सांगायला आपण त्यांना सांगा, एवढीच आपणास विनंती करतो.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : कधी कधी बातमीचा विपर्यास होतो, मी आपणास एक गोष्ट सांगितली तर तिचे आपणास आश्चर्य वाटेल, या सभागृहामध्ये सभापती व उपसभापती एखाद्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देतात. या विधानमंडळ सचिवालयातील रोखपालाच्या संदर्भातील विषय सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता, त्यासंदर्भात तक्रार आली होती व आता पोलीस चौकशी सुरु झालेली आहे, तेव्हा तो बेजबाबदार चौकशी अधिकारी असा म्हणाला होता की, या विधानमंडळाचे विधासनभा अध्यक्ष व विधानपरिषद सभापती यांना देखील मी पाहून घेईन, अशा प्रकारचे आरोप त्या अधिकाऱ्यांने केले होते. याची वाच्यता मी आतापर्यंत कोठेही केलेली नाही. आता प्रसंग आला म्हणून सांगत आहे, त्यानंतर मी माझ्या बंगल्यावर जाऊन गृहमंत्री महोदयांना हा प्रकार सांगितला व सदर अधिकाऱ्यांवर ताबडतोब ॲक्शन घेण्याबाबत सूचना केली होती. मी माननीय सभापती विधानपरिषद व मानननीय अध्यक्ष विधानसभा यांना सुध्दा याबाबत काहीही बोललेलो नाही. या ठिकाणी सदर अधिकाऱ्यांने हा अनुचित प्रयत्न केलेला आहे. आपण आता जी मागणी केली आहे ती मी समजू शकतो, यासंदर्भात आपणास शासनाकडून निवेदन हवे आहे, त्याबाबत माननीय मुख्यमंत्री निवेदन करतील, तोपर्यंत आपल्या सहकाऱ्याबद्दल केवळ वर्तमानपत्राच्या आधारे मत नोंदविणे योग्य होणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या मताशी सहमत आहे. आता प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, जवळपास सर्वच वेगवेगळया वर्तमानपत्रामध्ये या संदर्भातील बातम्या प्रसिध्द होत आहेत, "मिड-डे" वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे. त्यामुळे जनतेमध्ये मोठया प्रमाणात याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. यामध्ये सरकारने लवकरात लवकर खुलासा करावा. तसेच याबाबत "दूध का दूध आणि पानी का पानी" झाले म्हणजे सर्व माहिती जनतेसमोर येईल. मुद्दा उपस्थित करण्यामागील आमचा हेतू हा होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2.....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, दिनांक 11 मार्च 2005 रोजी मार्ड संघटनेतील डॉक्टर आपआपल्या कामावर रुजू झालेले आहेत. आता परिस्थिती अशी आहे की, डॉक्टर लोकांनी ज्यासाठी संप केला होता त्यामध्ये त्यांच्या बेसिक मागण्या होत्या, रुग्णालयात सोई सुविधा नसणे, डॉक्टरांच्या वसतीगृहामध्ये कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसणे तसेच डॉक्टरांचे स्टायपेंड वाढवून देणे अशा त्यांच्या मागण्या होत्या. याबाबत 11 मार्च रोजी तोडगा निघून संप मागे घेण्यात आलेला आहे. हा संप 13 दिवस चालू होता, परंतु यासंदर्भात शासनाने अजूनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही, कॅबिनेटसाठी टिप्पणी तयार करण्यात आलेली नाही. याचाच अर्थ संपकरी डॉक्टरांनी काय समजावे. सरकारने ज्या मागण्या मान्य केलेल्या आहेत त्याबाबत सरकारला विसर पडलेला आहे काय ? याबाबत सरकार नेमके काय करणार आहे ? यासंदर्भातील निवेदन सभागृहामध्ये सरकार करणार आहे काय ? याबाबतचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा यह है कि 5 अप्रैल, 2006 को नांदेड़ में लक्ष्मण राजकोंडावार के घर पर बम विस्फोट की घटना हुई थी, जिसमें 2 व्यक्ति मारे गए थे और बहुत सारे लोग जख़्मी हुए थें. दिनांक 7 अप्रैल को विशेष पुलिस महानिरीक्षक श्री सूर्यप्रकाश गुप्ता ने इस घटना के संबंध में जानकारी देने के लिए पत्रकार परिषद बुलाई थी. इस पत्रकार परिषद में पुलिस महानिरीक्षक ने यह जानकारी दी है कि, इस बम विस्फोट की घटना के धागे-दोरे परभणी, जालना की घटना से जुड़े हुए हैं. उन्होंने आगे यह भी कहा कि इस घटना के आरोपियों का संबंध विश्व हिन्दू परिषद, बजरंग दल एवं आर.एस.एस. से है. इसलिए मैं यह कहना चाहती हूं कि इस घटना की उच्च स्तरीय जांच की जाए. मैं खास तौर से यह कहना चाहती हूं कि इस घटना की जांच पुलिस अधिकारी श्री रमेश भुरेवाल से न कराई जाए, क्योंकि परभणी में घटी घटना की जांच के समय इस अधिकारी ने मिसगाईड किया था. चूंकि यह घटना बहुत गंभीर है. पूरे मराठवाड़ा में बम विस्फोट की घटनाएं हो रही है. इसलिए इस मामले में शासन को ध्यान देना चाहिए.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पत्रकार परिषदेमध्ये जे कोणी माहिती सांगत आहेत ते ऑथेंटीक आहेत काय ? त्या आधारावर या ठिकाणी माहिती दिली जात आहे काय ? त्या ठिकाणी आरएसएस आणि विश्वहिंदू परिषदेचे लोक असल्याचे सांगण्यात आले आहे. अशाप्रकारे कुणीही पत्रकार परिषद घेऊन माहिती देतील, अशाप्रकारे मी सुध्दा पत्रकार परिषद घेऊन सभागृहामध्ये औचित्याचा मुद्दा उपस्थित करीन. म्हणून पत्रकार परिषदेमध्ये सांगण्यात आलेली माहिती अधिकृत असणे अत्यावश्यक आहे. दररोज राजकीय व्यक्तींच्या, संस्थांच्या पत्रकार परिषदा होत असतात, त्यामध्ये अनेक प्रकारे आरोप-प्रत्यारोप होत असतात.

डॉ.एम.ए. अझिज : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या बाबीवर आपल्या माध्यमातून औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. सन 1970 साली झालेल्या जातीय जंगलीमुळे सर्व जातीच्या लोकांना धार्मिक मिरवणुकीवर बंदी घालण्यात आली होती. परंतु सन 1978 पर्यंत मुस्लीम सोडून इतर धार्मिक मिरवणुकींवरील बंदी उठवण्यात आली. मात्र इस्लाम धर्माचे हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनी निघणा-या सार्वजनिक मिरवणुकीवर आज सुध्दा बंदी कायम आहे.

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए. अझिज...

ही बाब वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून सुध्दा या मिरवणुकीसाठी परवानगी देण्यात आली नाही. परंतु मुस्लीम लोकांच्या मिरवणुकीला परवानगी देता येत नाही असे सांगण्यात येते. मात्र इतर धर्मियांच्या मिरवणुकींना स्थानिक पातळीवर जिल्हा प्रशासनामार्फत परवानगी दिली जाते. उद्या दि. 11 एप्रिल, 2006 रोजी पैगंबर जयंती असल्यामुळे, या वर्षी मुस्लीम लोकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. परंतु पैगंबर जयंतीच्या निमित्त मिरवणुकीसाठी परवानगी मिळत नसल्यामुळे मुस्लीम धर्मियांमध्ये प्रचंड क्रोध आहे. या मिरवणुकीसाठी पोलिसांनी परवानगी नाकारल्यास विना परवाना मिरवणूक काढण्यात येईल अशा प्रकारची चर्चा होत आहे. अशाप्रकारे विना परवाना मिरवणूक निघाल्यास कायदा व सुव्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी पोलिसांची राहील. म्हणून यासंबंधी शासनाने व माननीय गृह मंत्र्यांनी ताबडतोब निवदेन करावे. मुंबई पोलीस कायदा, 1951 च्या कलम 36 अन्वये पोलीस मिरवणुकीसाठी परवानगी देत असतात. यासंबंधीची सर्व माझ्याकडे माहिती आहे.

( यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अजीज ....

त्यानुसार पोलिसांनी 14.4.2001 ला डॉ.आंबेडकर जयंतीच्या दिवशी तसेच 18.3.2006 रोजी शिवजयंतीच्या दिवशी मिरवणूक काढण्यास परवानगी दिली होती. तसेच संत रोहिदास जयंतीच्या दिवशी म्हणजे 17.2.2006 रोजी देखील मिरवणुकीस परवानगी दिली होती. त्याचप्रमाणे 9 मे 2005 रोजी शिवसेनेचा मोर्चा काढण्यात आला होता त्यासाठी देखील परवानगी दिली होती. तेव्हा या संदर्भात आपण माननीय गृहमंत्र्यांना बोलावून आजच्या आज याबाबत निवेदन करण्यास सांगावे कारण ही मिरवणूक उद्या आहे आणि त्यासाठी पोलिसांकडून परवानगी मिळेल अशी मी अपेक्षा करतो. त्यासाठी म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित केला आहे.

****

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादितचा सन 2002-03 चा पहिला वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचा (मुंबई) सन 1991-92 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

******

....... यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनांबाबत .....**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे, जयंत प्र. पाटील, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 6 एप्रिल, 2006 रोजी रायगड जिल्ह्यातील उरण येथील द्रोणागिरी नोडमधील सी बर्ड या कंटेनर्स गोदामात कुवेतमधून भंगार भरून आलेल्या कंटेनर्समध्ये 7 एमएम, पॉईंट टूटू के टाईप 19 हजार जीवंत काडतुसांचा साठा आढळून येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने, मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स., यांनी "दिनांक 8 एप्रिल 2006 रोजीच्या सुमारास कुंजीरवाडी (ता.हवेली, जिल्हा पुणे) हद्दीतील येऊर फाट्यानजिक तुपे वस्तीवर पडलेला दरोडा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 6 एप्रिल 2006 रोजी मुंबईतील ना.म.जोशी मार्ग पोलीस कोठडीतील प्रेमनाथ राव या आरोपीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घडलेली घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने याबाबत निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " मुंबई व ठाणे येथील विवाह नोंदणी निबंधक कार्यालयांमध्ये चालू असलेला काळाबाजार व त्याला कायम स्वरूपी बंदी घालण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने याबाबत निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर वि.प.स. यांनी "ग्रामविकास विद्यालय,पाटाळा (ता.भद्रावती, जिल्हा चंद्रपूर) येथील अपात्र सहाय्यक शिक्षकाला मान्यता देऊन पात्र शिक्षकांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा चंद्रपूर यांनी मान्यता नाकारणे याबाबत सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती देणे ही गंभीर बाब आहे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने याबाबत निवेदन करावे.

..... यू 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .......

सन्माननीय सदस्य सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, प्रा.शरद पाटील, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 8 एप्रिल 2006 रोजी किर्लोस्करवाडी (जिल्हा सांगली) येथील किर्लोस्कर कारखान्यात दोन युनियनमधील सत्ता संघर्षातून उसळलेली दंगल" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, हा विषय गंभीर असल्याने याबाबतचे निवेदन 2 दिवसात केले जावे असे निदेश आपण शासनाला द्यावे.

**उपसभापती** : पुढील आठवड्यात या सूचनेवर निवेदन करण्यात यावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे व नितीन गडकरी यांनी "अमरावती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागात 155 कर्मचाऱ्यांची नियमबाह्य भरती करण्यात आल्याची दिनांक 20 मार्च 2006 रोजी उघडकीस आलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री विलास अवचट व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 17 जानेवारी 2006 रोजी वा त्या सुमारास छोटीराम अर्जुन बागूल, सुतारे, ता.साक्री, जिल्हा धुळे येथे झालेला संशयास्पद मृत्यू." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने याबाबत निवेदन करावे असे निदेश देतो.

नियम 93 अन्वये आलेल्या अन्य सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

*****

....... यू 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत .....**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला या ठिकाणी एक अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर विषयासंबंधात औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. कृपया आपण मला अनुमती द्यावी.

सभापती महोदय, मुंबईतील सिद्धीविनायक मंदिराजवळ अतिशय गलिच्छ असे प्रकार चालतात. त्या ठिकाणी मंदिराच्या लगतच फेरीवाले आणि छोटे स्टॉलधारक आहेत. ते तेथे येणाऱ्या भाविक महिला व पुरूषांशी गलिच्छ प्रकारे लगट करीत असतात. हे सर्व फेरीवाले बहुतांशी परप्रांतीय आहेत. दोन्ही बाजूंनी जाणाऱ्या भाविक महिला-पुरूषांना ते अडवित असतात आणि त्यातही महिला असतील तर त्यांचा हात पकडून अडवित असतात आणि हार-फुले घेण्याचा आग्रह करीत असतात. त्याबद्दल त्यांना हटकले तर .. " तो क्या हुआ, हात ही तो पकडा है " असे बिनदिक्कत म्हणतात. त्याबद्दल तेथील पोलिसांकडे तक्रार केली तरी पोलीससुद्धा त्याबद्दल काही करीत नाहीत. त्यावरून तेथे दररोज मारामाऱ्या देखील होतात. त्या ठिकाणी जवळ जवळ 50-60 पोलीस असतात पण ते या प्रकाराबद्दल असहाय्यता व्यक्त करतात. अगोदरच त्या ठिकाणी मोठी भिंत घातली असल्याने तो भाग अरूंद झाला आहे आणि मंदिरामध्ये दर्शनासाठी रोजच मोठ्या प्रमाणात महिला-पुरूषांची गर्दी होत असते व त्या गर्दीचा फायदा घेऊन हे फेरीवाले व स्टॉलवाले महिलांचा हात पकडून आपल्याकडे खेचतात व आपल्याकडील वस्तू विकत घेण्याचा आग्रह धरीत असतात. तेव्हा हे प्रकार बंद होण्यासाठी पोलिसांकडून कारवाई होणे आवश्यक आहे म्हणून मी हा मुद्दा येथे उपस्थित केला आहे.

**उपसभापती** : याबाबतीत शासनाने ताबडतोब कारवाई करावी आणि त्याबाबत येथे माहिती द्यावी.

आता यानंतर नियम 93 च्या सूचनांसंबंधात निदेश दिल्यानुसार शासनाकडून निवेदने करण्यात येतील. तत्पूर्वी मला एक घोषणा करावयाची आहे.

....... यू 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 10 - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2006 या संदर्भात माननीय सभापतींची घोषणा.**

**उपसभापती** : सन् 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2006 या विधेयकासंदर्भात माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी उद्या, मंगळवार, दिनांक 11 एप्रिल 2006 रोजी सकाळी 11.00 वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे दोन्ही सभागृहातील सदस्यांची एकत्रित बैठक आयोजित केली आहे. सदर बैठकीत विधेयकातील तरतुदींसंदर्भात सादरीकरण (Power Point Presentation) करण्यात येणार आहे. सबब सदर बैठकीस सर्व सदस्यांनी सकाळी 11.00 वाजता उपस्थित रहावे आणि या विधेयकासंबंधात माहिती घ्यावी. या कार्यक्रमानंतर सदस्यांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

****

( यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मेहतर, भंगी, दुमार इ. उपजातींना "सुदर्शन" नावाने मान्यता देणे.

मु.शी. :मेहतर, भंगी, दुमार इ. उपजातींना "सुदर्शन" नावाने मान्यता देणे याबाबत सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यां-ी दिलेली -नियम 93 अ-वये सूच-ा.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यां-ी "मेहतर, भंगी, दुमार इ. उपजातींना "सुदर्शन" नावाने मान्यता देणे" या विषयावर -नियम 93 अ-वये जी सूच-ा दिली होती, तिला अ-नुल□ून, आप□ -निदेश दिल्याप्रमा□ मला -निवेद-न □रावयाचे आहे. -निवेद-ााच्या प्रती सदस्यां-ा अ□दरच वितरीत □लेल्या असल्या-ने मी हे -निवेद-न सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : -निवेद-न सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे -निवेद-न छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या मेहतर, भंगी, दुमार या उपजातीच्या लोकांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या जातींना "सुदर्शन" असे नाव लावून त्यांना मान्यता देण्यात यावी. ते तुमच्याकडे नवीन नावाने आरक्षण मागत नाहीत. धानुक, धानक, हेला, डोम, डुमार, हॉडी, नगाडची, बसोर, मेहतर, भंगी, मखीयार इत्यादी उपजाती यामध्ये आहेत. तेव्हा "सुदर्शन" असे नाव देण्याकरीता आपण जाहिरात द्यावी. हे नाव धारण करण्यास जर कुणाचा आक्षेप असेल तर त्यांना देऊ नका. या सर्व उपजातीतील लोकांचे म्हणणे आहे की, "सुदर्शन" या नावाला कुणाचा आक्षेप नसल्यामुळे ते नोटीफाय करण्यात यावे. यामध्ये नवीन काही करण्याचा प्रश्न नाही. या लोकांचा भंगी म्हणून उल्लेख करण्यात येत होता त्याला त्यांचा आक्षेप होता. म्हणून त्याबाबत आपण नकारात्मक भूमिका घेण्याऐवजी सर्व जातीच्या लोकांना जाहीर आवाहन करावे. आणि "सुदर्शन" हे नाव लावण्याकरीता जर कुणाचा आक्षेप नसेल तर त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. तसे करावयास आपली हरकत काय आहे?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, पूर्वी मेहतर, भंगी हे अनुसूचित जाती म्हणून ओळखले जात होते. परंतु त्यांच्या काही संघटनांनी अशी मागणी केली की, त्यांचा भंगीऐवजी "रुखी" किंवा "वाल्मिकी" असा उल्लेख करावा . त्याचबरोबर "महर्षी सुदर्शन गुरुजी" यांना वेगवेगळया जातीचे लोक महापुरुष म्हणून मानतात. त्यामुळे धानुक, धानक, हेला, डोम, डुमार, हॉडी, नगाडची, बसोर, मेहतर या जातीतील लोक महर्षी सुदर्शन गुरुजींना मानत असल्यामुळे इतर जातीच्या लोकांना यामध्ये समाविष्ट केले तर ते मान्य करता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचे म्हणणे मला मान्य आहे. "सुदर्शन" आणि कंसामध्ये त्या पाच जातींचा उल्लेख करावा. त्या जाती निकष पूर्ण करीत असतील तर आणि त्याबाबत कुणाचाही आक्षेप नसेल तर त्यांना मान्यता देऊन "सुदर्शन" आणि कंसामध्ये त्या जातींचा उल्लेख करुन तशाप्रकारचे नोटीफिकेशन काढायला हरकत काय? उदा. ज्या 1 ते 5 जाती आहेत त्यांचे "सुदर्शन" म्हणून क्लासिफिकेशन करा. आणि या 5 जातींना "सुदर्शन" म्हणून नाव देण्यासंबंधीचे नोटिफिकेशन काढीत आहोत त्याला कुणाचा आक्षेप आहे काय? असे विचारावे. ज्यांचा आक्षेप असेल त्यांना हे नाव धारण करु देण्याचे कारण नाही. हजारो लोक आज एकत्र राहात आहेत त्यांच्या भावनांची आपण कदर करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

दुसरा मुद्दा असा की, वाल्मिकी म्हणून सफाई कामगाराची 5 टक्के लोकसंख्या आहे. या समाजाला शासनाच्या सवलतीचा फायदा ज्या प्रमाणात मिळावयास पाहिजे तो मिळत नाही. आणि म्हणून 13 टक्के आरक्षणामध्ये 5 टक्के आरक्षण "सुदर्शन" समाजासाठी करण्याबाबत आपण पहिल्यांदा विचार करावा व त्यांना आरक्षणाचा फायदा मिळवून द्यावा. कारण हा समाजाची घाण उपसणारा समाज आहे या समाजाचा विकास झाला पाहिजे. आज या समाजामध्ये कुणीही डॉक्टर, इंजिनिअर नाही. म्हणून त्यांच्याकरीता आपण 5 टक्के आरक्षण ठेवावे. त्यामध्ये जर कुणी लायक माणूस मिळाला नाही तर ते आरक्षण त्या पुढील समाजाला वाटून द्या. परंतु त्यांचे अधिकार प्रोटेक्ट झाले पाहिजेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

मी तुलना करत नाही. पण सवलती मिळणाऱ्या समाजामधील हजारो डॉक्टरर्स, इंजिनियर्स, आय.ए..एस. ऑफीसर्स झालेले आहेत. परंतु या समाजातील महाराष्ट्रामध्ये एकच महिला डॉक्टर झालेली आहेत. इंजिनियर जवळपास नाहीतच. शासनाने 13 टक्क्के आरक्षण शेड्युल कास्टला दिलेले आहे. त्यामध्ये 5 टक्के समाज हा सफाई काम करणारा आहे, त्या समाजाला अजूनही न्याय मिळत नाही. त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे. त्यांचे असे म्हणणे आहे की, 5 टक्के सफाई काम करणारा आमचा समाज आहे, त्यांना न्याय मिळत नसेल तर या आरक्षणाला काही अर्थच नाही. शेड्युल कास्ट या एका समाजाला आरक्षणाचा फायदा होतो. परंतु जो मैला, घाण डोक्यावर वाहून नेणारा समाज आहे, त्यांना विकासाची संधी मिळत नाही, हे योग्य नाही. या दृष्टीने काही तरी विचार केला पाहिजे. या समाजामध्ये डॉक्टर, इंजिनियर्स, आय.ए.एस. ऑफीसर झालेले नाहीत. या 5 टक्के समाजाचा विचार सरकार करणार आहे काय ?

श्री.चंद्रकांत हांडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी, धानुक, धानक, हेला, डोम, डुमार, इत्यादि जातींच्या गटांना सुदर्शन या नावाने संबोधून त्यांचा त्यामध्ये समावेश करावा, अशाप्रकारची मागणी आहे. सुदर्शन महाराज हे संत होऊन गेले. शैक्षणिक आणि एकूणच आर्थिक मागासलेपणा याचा विचार करुन त्या समाजासाठी आरक्षण ठेवले जाते. आज अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांची यादी पाहिली तर जवळजवळ 300 ते 500 च्या जातींची संख्या आहे. एकेका जातीमध्ये बऱ्याच उप जाती आहेत. या सगळ्यांनी गट तयार करुन आम्हाला त्याप्रमाणे आरक्षण ठेवण्यात यावे अशी मागणी केली तर खूप अडचणीचे होईल. घटनात्मक मुद्दे देखील उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु हे खरे आहे की, इतर मागासलेला समाज आहे त्या समाजातील माणसांना पुढे आण्यासाठी रिझर्व्हेशन असणे आवश्यक आहे, या मताशी मी सहमत आहे. निश्चितच सामाजिक न्याय विभागाकडून याबाबतीत प्रकर्षाने लक्ष देऊन सर्व समाजाची उन्नती कशी होईल, हे पाहिले जाईल.

श्री.नितीन गडकरी : मंत्री महोदयांना माझी एवढीच विनंती आहे की, 13 टक्के आरक्षण ठेवलेले आहे, त्यामध्ये हा समाज 5 टक्के आहे. कदाचित 2 टक्के असेल. परंतु याचा शोध घेऊन जो काही 2 टक्के, 3 टक्के हा मागासलेला समाज आहे. डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम करणारा समाज आहे, तो आज स्वातंत्र्य मिळून 59-60 वर्षे झाली तरी शोषित, पीडित आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

त्यांच्यापैकी, डॉक्टर, इंजिनियर, आय.ए.एस. अधिकारी कोणीही झालेले नाही. या सगळया प्रक्रियेमध्ये या समाजाला न्याय मिळालेला नाही. मला असे वाटते की, याचा आपण कोठेतरी अभ्यास करावा. असे करणे आपल्याला एकदम शक्य नसेल तर यासाठी एक अभ्यास गट नियुक्त करुन या संबंधीचा आढावा घ्यावा. निश्चितच शोषित पीडित समाजाला न्याय मिळालेला नाही, तो समाज पूर्णपणे वंचित राहिलेला आहे. त्यांना आरक्षणाचा फायदा मिळत नसेल तर आरक्षणाला काही अर्थ नाही. म्हणून माझी विनंती आहे की, 13 टक्क्यामध्ये एका समाजाला डॉक्टर, आय.ए.एस. या केडरमध्ये लाभ मिळाल्यानंतर त्यामधील दुसऱ्या समाजाला तो लाभ द्यावा. क्लास वनचे अधिकाऱ्याचे पदामध्ये त्यांना लाभ द्यावा. आरक्षणाचा फायदा हा समाजातील गरीब माणसापर्यन्त पोहोचवावा. आज आपल्याला तसे काही करता येत नसेल तर त्यासाठी अभ्यास गट नेमण्याचा विचार करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, वेगवेगळ्या जातीचे असे गट पाडता येत नाहीत. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी एखादा अभ्यासगट निर्माण करण्यासारखे आहे. शासन निश्चितपणे त्याचा विचार करील.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी.

**उपसभापती** : यानंतरचे अनुक्रमांक 2 चे नियम 93 अन्वये जे निवेदन आहे ते पुढे ढकलण्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी विनंती केलेली आहे. ते निवेदन बुधवारी घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा गंभीर मुद्दा आहे. गृहनिर्माण विभागाचे माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यास तयार आहेत. आपल्याकडे माननीय कॅबिनेट मंत्र्यांनी चिट्ठी पाठविली की, हे निवेदन नंतर ठेवावे.

श्री. दयानंद मस्के : मी चिट्ठी पाठवली.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेस तसेच कॉंग्रेसचे लोक माननीय राज्यमंत्र्यांवर अन्याय करीत आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर द्यावे. काही कमीजास्त झाले तर आम्ही त्यांना सहकार्य करु. अशी चिट्ठी पाठवून माननीय राज्यमंत्र्यांनी आपले अधिकार कमी करुन घेऊ नयेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 97 अंतर्गत जो प्रस्ताव आहे तो बुधवारी घेण्याचे ठरलेले आहे आणि नियम 260 अंतर्गत जो प्रस्ताव आहे तो गुरुवारी घ्यावयाचा असे ठरलेले आहे.

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर अनुक्रमांक सातवर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांचा मुंबई शहराच्या संदर्भातील नियम 260 अंतर्गत जो प्रस्ताव आहे तो आज न घेता बुधवार दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी घेण्याचे ठरले आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 260 अंतर्गत जो प्रस्ताव आहे तो बुधवारी घेण्याचे ठरले होते परंतु तो प्रस्ताव बुधवारऐवजी गुरुवारी घेण्यात येणार आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : बँकेचा अधिकारी असल्याचे भासवून म्हाडाची रक्कम सर्व धर्म मानव सेवा संघ नामक ट्रस्टच्या नावे जमा करण्याबाबत देण्यात आलेले पत्र.

**मु. शी**. : बॅंकेचा अधिकारी असल्याचे भासवून म्हाडाची रक्कम सर्व धर्म मानव सेवा संघ नामक ट्रस्टच्यानावे जमा करण्याबाबत देण्यात आलेले पत्र याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीमती कांता नलावडे व श्रीमती संजीवनी रायकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दयानंद मस्के ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीमती कांता नलावडे व श्रीमती संजीवनी रायकर, वि. प. स. यांनी "बॅंकेचा अधिकारी असल्याचे भासवून म्हाडाची रक्कम सर्व धर्म मानव सेवा संघ नामक ट्रस्टच्यानावे जमा करण्याबाबत देण्यात आलेले पत्र" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : ही फार गंभीर गोष्ट आहे. कोणी तरी श्री. शर्मा नावाचा माणूस येतो आणि त्याला आपले अधिकारी 45 कोटी रुपयांचा धनादेश देतात ही गंभीर बाब आहे. तो मनुष्य त्या बँकेत जातो आणि सर्व धर्म मानव सेवा संघ नामक ट्रस्टच्या नावे रक्कम जमा करण्याबाबत पत्र देतो. त्या बँकेच्या अधिकाऱ्यांना संशय आला म्हणून बँकेच्या अधिकाऱ्यांनी फोन करुन म्हाडाला माहिती दिली. 45 कोटी रुपयांचा धनादेश देण्याचे प्रकरण कोणत्या स्तरावर मंजूर झाले ? त्यासाठी कोणाची परवानगी घेतली ? परवानगी देत असताना कशाकशाची तपासणी केली ? यासंदर्भात चौकशी केली काय ? त्यामध्ये कोण दोषी आढळून आले ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, हे प्रकरणी गंभीर आहे याबद्दल प्रश्न नाही. नियमाप्रमाणे या बँकेमध्ये जास्त व्याज मिळेल यादृष्टीने स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इस्टेट, ठाणे येथे पैसे ठेवण्यात येतात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे एकच प्रकरण नाही. याच्या आधीही असे घडलेले आहे. याच्या आधी आंध्रप्रदेशमधून बनावट कागदपत्रे तयार करुन बँकेकडून पैसे काढून सर्व धर्म मानव सेवा संघ, ठाणे यांच्या नावे देऊन तेथून आंध्र प्रदेशातील एका ट्रस्टच्या नावे हस्तांतरीत झाल्याचे उघडकीस आले आहे. म्हाडातून पैसे काढणे सरळ काम नाही. या दोन्ही प्रकरणामध्ये म्हाडामध्ये देखील त्यांना सपोर्ट करणारे चॅनेल आहे. सभापती महोदय, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावत आहे. याच्या आधी काढलेले 1 कोटी रुपये, 2 कोटी रुपये 7 कोटी रुपये असे एकूण 10 कोटी रुपये कोठे गेले ? ते कोठे वापरले गेले ? यासंदर्भात म्हाडाने काय चौकशी केली ? त्यामध्ये कोण दोषी आढळून आले ? म्हाडामध्ये कोण दोषी आढळून आले ?

श्री. दयानंद मस्के : यामध्ये म्हाडाचे अधिकारी दोषी नाहीत. नियमाप्रमाणे त्यांनी बँकेमध्ये पैसे भरलेले आहेत. त्या ठिकाणी जो ट्रस्ट आहे त्या ट्रस्टच्या नावाने खोटे पत्र दिले आहे. बँकेतून ट्रस्टच्या नावे पैसे गेलेले आहेत. म्हाडाकडून ट्रस्टच्या नावे पैसे गेलेले नाहीत.

श्री. नितीन गडकरी : यामध्ये म्हाडाचे कोणीही अधिकारी दोषी नाहीत, यामध्ये काहीही गडबड नाही, हे सगळे बँकेतून घडलेले आहे असे माननीय मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय ? माननीय मंत्रिमहोदय कोणत्या आधारावर असे बोलत आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...5...

RDB/ SBT/ KGS/ MHM/ MAP

श्री. दयानंद मस्के : आमचे जे पैसे आहेत ते बँकेमध्ये गेलेले आहेत आणि त्याची नोंद बँकेकडे आहे. त्यामुळे ते पैसे देण्यामध्ये म्हाडाचे अधिकारी दोषी आहेत असे वाटत नाही.

श्री. नितीन गडकरी : बँकेचे जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्याविरुध्द तक्रार करुन गुन्हा दाखल केला आहे काय ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:00

श्री. दयानंद मस्के : या प्रकरणी एफ.आय.आर. दाखल केलेला आहे. 9 आरोपी सापडलेले आहेत. त्यांच्याकडून काही रक्कम हस्तगत केलेली आहे. 3 कोटी 61 लाख 85 हजार 549 रु. इतकी रोख रक्कम आणि 1 कोटी 79 हजार 762 इतकी मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : म्हाडाची रक्कम सुरक्षित आहे ना ?

श्री. दयानंद मस्के : होय. म्हाडाची रक्कम सुरक्षित आहे. एसआरएच्या रकमेमध्ये झालेला घोटाळा उघडकीस आलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय राज्यमंत्री महोदय असत्य माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. ही गंभीर गोष्ट आहे. एक कोणता तरी शर्मा नावाचा माणूस बँकेचा प्रतिनिधी आहे असे सांगून अधिका-या समोर येऊन उभा राहातो आणि ब्रीद नावाचा अधिकारी 45 कोटीचा धनादेश त्या शर्मा नावाच्या माणसाच्या हातात देतो. बँक असे सांगते की, आमचा कोणताही प्रतिनिधी तुमच्याकडे आलेला नाही. त्या अगोदर 3 कोटीचा जो धनादेश दिलेला होता त्याच्यावर लाभार्थीचे नाव व खाते क्रमांक लिहिलेला नव्हता. ब्लँक चेक देण्यात आलेला होता. निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, " स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडील पत्र तसेच बँकेच्या अधिका-यांशी झालेल्या चर्चेवरुन असे निदर्शनास आले की, बँकेकडे सर्वधर्म मानव सेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या नावे रक्कम जमा करावी अशा अशयाचे बनावट पत्र पोहोचले आहे." मग म्हाडाच्या अधिका-याने "आपण कोण ? हे पैसे आंध्र प्रदेश बँकेच्या नावे का पाठवायला सांगता?"अशी त्याला विचारणा का केली नाही ?

श्री. दयानंद मस्के : हे पैसे शासनाच्या नावे बँकेमध्ये पोहोचलेले आहेत आणि त्याचे रेकॉर्डही आहे. ट्रस्टच्या नावे पैसे देण्यात आलेले नाहीत. यामध्ये फ्रॉड झालेला आहे. यामध्ये एकूण 10 आरोपी असून 9 आरोपी सापडलेले आहेत. त्यांच्या कडून रक्कम वसूल केलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : शर्मा नावाचा अधिकारी बँकेचा प्रतिनिधी होता काय ? आधी 10 कोटी बुडालेले असताना ज्या अधिका-याने 45 कोटीचा चेक बनावट माणसाला दिला त्या अधिका-यावर शासन कडक कारवाई करणार आहे काय ?

श्री. दयानंद मस्के : या प्रकरणी चौकशी चालू आहे. या प्रकरणी म्हाडाचे अधिकारी गुंतलेले असतील तर अशा दोषी अधिका-यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "प्रस्तुत प्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे यांची भूमिका संशयास्पद असल्याने व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाशी विसंत असल्याने म्हाडाने खेरवाडी पोलीस स्टेशनमध्ये बँकेविरुध्द गुन्हा दाखल केला असून सदर गुन्हयाची चौकशी सुरु आहे." म्हणजे याबाबतीत शासनाने दराचे निकष पाहिलेले नव्हते काय ? स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे यांची भूमिका संशयास्पद आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. तेव्हा याबाबतीत शासनाला नेमके काय म्हणावयाचे आहे ?

श्री. दयानंद मस्के : बँकमध्ये जे पैसे होते ते म्हाडाने ट्रस्टच्या नावाने दिलेले नाहीत. आरोपी ट्रस्टचे आहेत. त्यांच्याकडून मुद्देमाल सापडलेला आहे.

-----

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 16:05

**पृ.शी.**: प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे दलालांच्या टोळीमार्फत रुग्णांशी होत असलेले गैरव्यवहार

**मु.शी.**: प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे दलालांच्या टोळीमार्फत रुग्णांशी होत असलेले गैरव्यवहार याबाबत सर्वश्री सागर मेघे,पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे दलालांच्या टोळीमार्फत रुग्णांशी होत असलेले गैरव्यवहार या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, नागपूर शहरातील मनोरुग्णालयामध्ये तीन हजार रु. दिल्यानंतर ॲडमिट होता येते अशा प्रकारचे चॅनल काम करीत असल्याचे उघडकीस आले आहे. या बाबतीत स्टींग ऑपरेशन करण्यात आले आणि एका चांगल्या माणसाला वेडा ठरवून ॲडमिट करण्यात आले. यासंदर्भात शासनाने चौकशी केली. निवेदनात म्हटले आहे की, वैद्यकीय अधीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ.पी.एन.जयस्वाल यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, स्टींग ऑपरेशन झाल्यानंतर हा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे की पहिल्यापासूनच डॉ. जयस्वाल यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे. अतिरिक्त कार्यभार असताना हे प्रकरण घडलेले आहे अशी माझी माहिती आहे. डॉ. जयस्वाल यांना वाचविण्याचे षडयंत्र रचले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ? त्याचप्रमाणे या रुग्णालयासाठी पूर्णवेळ अधीक्षक नेमण्यात येईल काय ? तसेच डॉ. जयस्वाल यांना तात्काळ निलंबित करण्यात येईल काय अथवा त्यांची इतरत्र बदली केली जाईल काय ? कारण या रुग्णालयामध्ये चांगल्या माणसाला वेडा ठरविणारी एक टोळी अशा प्रकारचे भयंकर कृत्य करीत आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मनोरुग्णालयात दोन प्रकारे रुग्ण ॲडमिट केले जातात. एका प्रकारामध्ये दोन मानसोपचारतज्ज्ञांनी जर शिफारस केली तर रुग्णाला ॲडमिट केले जाते. दुसऱ्या प्रकारामध्ये दोन खाजगी डॉक्टरांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर जर मॅजिस्ट्रेटने रेकमंड केले तर रुग्णाला 10 दिवस मनोरुग्णालयात निरीक्षणाखाली ठेवण्यात येते. या प्रकरणामध्ये हॉस्पीटलच्या डॉक्टरांनी त्याला रेकमंड केले नाही तर परस्पर दोन खाजगी डॉक्टरांनी कोर्टात जाऊन सांगितले की हा मनोरुग्ण आहे. कोर्टाने डायरेक्शन दिल्या की मनोरुग्णालयामध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात यावे. यामध्ये या रुग्णालयाचा एक कर्मचारी सहभागी होता. जे दोन खाजगी डॉक्टर्स आहेत त्यांची चौकशी चालू आहे. कोर्टाने आदेश काढल्यानंतर चौकशी केली. हे प्रकरण निदर्शनास आल्यानंतर या रुग्णालयात कायम स्वरुपी डॉक्टरांची नेमणूक करण्यात येईल.

...3


SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, रुग्णालयाच्या रजिस्टरमध्ये खाडाखोड करण्यात आली आहे. ते बदलले गेले आहे. डॉ.जयस्वाल या रुग्णालयात गेल्या तीन वर्षापासून काम करीत आहेत. अशा डॉक्टरांना येथे ठेवून ते चांगल्या माणसांना वेडे ठरविण्याचे काम करीत आहेत असे दिसून येते. अशा डॉक्टरांवर शासन तात्काळ कोणती कारवाई करणार आहे ?

नंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. कानडे..... 16:10

निवेदन क्र. 3..........सुरु.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या केसमध्ये मॅजिस्ट्रेटने या पेशंटची शिफारस केलेली आहे. यासंबंधीचा नियम असा आहे की, मॅजिस्ट्रेटने ऑर्डर दिल्यानंतर 30 दिवसांच्या आत केंव्हाही त्या पेशंटला मेंटल हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करु शकतो. हे देखील खरे आहे की, या पेशंटला घेऊन आल्यानंतर डॉ. टेंभूर्णेकर यांनी त्या पेशंटला वॉर्ड क्र. 8 मध्ये नोंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर पत्रकार श्री. देशमुख यांनी सांगितले की, दोन तीन दिवसानंतर पेशंटलाघेऊन येतो असे सांगून ते कागदपत्रे घेऊन निघून गेले. अशा वेळी पेशंट जर पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यासाठी आला नाही तर त्याबाबतची नोंद पोलीस स्टेशनमध्ये करायला पाहिजे आणि तशी नोंद झाली नाही याबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई देखील केली आहे. हॉस्पिटलमध्ये परमनेंट अधीक्षक नाहीत, ही गोष्ट देखील खरी असून जे डॉक्टर सध्या आहेत त्यांच्याकडे चार्ज दिलेला आहे. हे डॉक्टर काझी आणि डॉ. शेख सध्या तेथे आहेत. या ठिकाणी अधीक्षक म्हणून कायमस्वरुपी एक महिन्यात नेमणूक करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विदर्भामध्ये एकच मेंटल हॉस्पिटल आहे तरी देखील परमनेंट अधीक्षक तेथे भरला जात नाही. खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस करणारे डॉक्टर्स चांगल्या माणसाला पकडून पागल करण्याचा प्रयत्न करतात. मी अतिशय जबाबदारीने सभागृहात आरोप करीत आहे की, यासंदर्भात मला मिळालेल्या माहितीनुसार मॅजिस्ट्रेटने तीन हजार रुपये घेऊन अशी परवानगी दिलेली आहे, ही गंभीर गोष्ट आहे. कायदयासमोर सर्व समान आहेत. एखादा मॅजिस्ट्रेट तीन हजार रुपये घेऊन असे काम करीत असेल तर या सगळया रॅकेटवर कारवाई करायला पाहिजे. अशा घटनांकडे दुर्लक्ष करणे हे चांगले नाही. त्या ठिकाणी सध्या जे अधीक्षक आहेत ते पार्ट टाईम आहेत, त्यांच्याकडे चार्ज दिलेला आहे, ते बाहेर प्रायव्हेट प्रॅक्टिस करतात. म्हणून या हॉस्पिटलमध्ये आठ दिवसात परमनेंट अधीक्षक नेमण्यात यावा आणि या संपूर्ण प्रकरणामध्ये जे मोठे मोठे लोक गुंतलेले आहेत मग ते मॅजिस्ट्रेट असोत अथवा डॉक्टर्स असोत त्यांच्यावर सी.आर.पी.सी. खाली कारवाई करुन हातकडया घालाव्यात. तसेच या सर्व प्रकरणाची चौकशी आयपीएस अधिकाऱ्याच्या पातळीवर सर्वोच्च अधिकाऱ्याकडून म्हणजेच पोलीस महासंचालकांकडून करुन या रॅकेटचा भंडाफोड करण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय, या प्रकरणाची उच्च स्तरावरुन चौकशी करण्यात येईल. ( 2...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: "सिंधुदुर्ग जिल्हयातील नळ पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्तीअभावी बंद असणे."

**मु.शी.**: "सिंधुदुर्ग जिल्हयातील नळ पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्तीअभावी बंद असणे" याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील नळ पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्तीअभावी बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्य प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्र. 4 .......सुरु.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सुमारे 25 कोटी रुपयाची या दुरुस्तीसाठी गरज आहे. म्हणून हा खर्च करुन या उन्हाळयामध्ये येथील रहिवाशांना त्रास होणार नाही यासाठी शासन युध्द पातळीवर ही पाणीपुरवठा योजना दुरुस्त करुन पाणीपुरवठा सुरळीत करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, एक तर आमच्याकडे 25 कोटीची मागणी आलेली नाही. तसेच जी दुरुस्तीची मागणी आली आहे ती 1.55 कोटीची आहे, नवीन सोर्सेससाठी एकूण 1.32 कोटीचे 24 प्रस्ताव आलेले आहेत. अशा प्रकारे एकूण मागणी 2.90 लाखाची आहे. पिण्याच्या पाण्यासाठी टंचाईच्या काळात ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत त्या सर्व शासनामार्फत केलेल्या असून या जिल्हयामध्ये कुठेही पिण्याच्या पाण्यासाठी पैशाची कमतरता पडणार नाही आणि जी जी मागणी आलेली आहे त्यासंबंधीची उपाययोजना शासनामार्फत केलेली आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नांदिली ग्रामपंचायत, ता.मुरबाड,जि.ठाणे येथील नाभिक समाजाच्या ग्रामपंचायत सदस्यांना बहिष्कृत करणे.

**मु.शी.**: नांदिली ग्रामपंचायत, ता.मुरबाड,जि.ठाणे येथील नाभिक समाजाच्या ग्रामपंचायत सदस्यांना बहिष्कृत करणे याबाबत श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित).

....

**पृ.शी.**: मुंबई शहरासाठी तयार केलेला आपत्ती व्यवस्थापन आराखडा फोल जाणे.

**मु.शी.**: मुंबई शहरासाठी तयार केलेला आपत्ती व्यवस्थापन आराखडा फोल जाणे बाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सदर निवेदनावर उत्तर कोण देणार आहे ? संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय हे खालच्या सभागृहात उपस्थित असल्यामुळे सदर निवेदन परवा घेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : ठीक आहे.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जीवन विकास नागरी सहकारी पतसंस्थेत (ता.आर्वी,जि.वर्धा) झालेला गैरकारभार.

**मु.शी.**: जीवन विकास नागरी सहकारी पतसंस्थेत (ता.आर्वी,जि.वर्धा) झालेला गैरकारभार याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स. यांनी 'जीवन विकास नागरी सहकारी पतसंस्थेत (ता.आर्वी,जि.वर्धा) झालेला गैरकारभार' या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे सुधारणा करू इच्छितो.

लेखी उत्तराच्या दुसऱ्या परिच्छेदातील खालून पाचव्या ओळीतील 'त्यानुसार' शब्द वगळण्यात यावा.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जीवन विकास नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, आर्वी, तालुका आर्वी, जिल्हा वर्धा, संबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या पंतसंस्थेमध्ये गैरव्यवहार व अपहार झालेला आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, आर्वी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 चे कलम 83 अन्वये श्री.चौधरी, सेवानिवृत्त न्यायाधिश, वर्धा यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली आहे. या चौकशी अहवालामध्ये अफरातफर व गैरव्यवहार झाला नसल्याबाबतचे स्पष्ट अभिप्राय नोंदविण्यात आलेले आहेत. तर परिच्छेद दोनमध्ये नमूद करण्यात आले आहे की, सदर चौकशी वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे व संस्थेच्या संचालक मंडळांनी ठेवीदारांच्या ठेवीच्या रकमा परत करण्यासंबंधी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांनी सदर संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. म्हणजे मूळ उत्तरामध्ये तफावत आहे. जीवन विकास नागरी सहकारी पतसंस्थेचे जे ठेवीदार आहेत, ते गेल्या 4-5 वर्षापासून आपल्या ठेवी मागत आहेत. परंतु, त्या त्यांना परत केल्या जात नाहीत. त्यामुळे ठेवीदारांच्या मुलांची लग्न रखडली आहेत. आता शासनाने संचालक मंडळ बरखास्त करून कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. या संस्थेचे जे अध्यक्ष आहेत, त्यांनी स्वत:ची सगळी मालमत्ता विकलेली आहे. ते आता यातून पळ काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. या पत संस्थेतील ठेवी परत मिळाव्यात म्हणून ठेवीदारांनी माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सहकार मंत्री यांना विनंती केली आहे. तेव्हा या पतसंस्थेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टीने सहकार खाते ठेवीदारांना आश्वस्त करणार आहेत काय ? तसेच या पतसंस्थेमध्ये किती ठेवी आहेत ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, 261.27 लाख इतक्या रुपयाच्या ठेवी आहेत. वसुली कमी झाल्यामुळे ठेवी परत होऊ शकलेल्या नाहीत हे सत्य आहे. म्हणून संचालक मंडळास नियम 78 (1) अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सदर नोटीशी नंतर प्रशासक नेमण्यासंबंधीची पुढील कारवाई करण्यात येईल.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ठेवीदारांच्या ठेवीसंबंधीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. ठेवीदारांनी आपल्या ठेवी परत मागितल्या असून त्या त्यांना अद्याप परत मिळालेल्या नाहीत. या पतसंस्थेचे अध्यक्ष आणि संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलेले आहे. तेव्हा शासन या ठेवीदारांचे कसे संरक्षण करणार आहे ? ठेवीदारांना त्यांची ठेवी परत मिळण्यासंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या पतसंस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलेले नाही. त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन, संचालक मंडळ बरखास्त का करु नये ? असे सांगितले आहे. आपल्या या कार्यवाहीमुळे ठेवीदारांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. संचालक मंडळ बरखास्त झाले तर मग ठेवीदारांना संरक्षण कोण देणार आहे ? ठेवीदारांना आपल्या मुलीबाळींचे लग्न करण्यासाठी पैसा हवा आहे. परंतु त्यांना आपल्या ठेवी परत मिळत नाहीत. म्हणून माझा प्रश्न आहे की, ठेवीदारांना ठेवी परत मिळण्यासंदर्भात माननीय मंत्री महोदय काही आश्वासन देतील काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, नियम 78 ची नोटीस देण्यात आलेली आहे. चौकशीमध्ये संचालक मंडळ दोषी आढळून आले तर त्या मंडळाला बरखास्त करण्यात येईल. त्या ठिकाणी प्रशासक नियुक्त करुन, वसुलीची कार्यवाही करण्यात येईल आणि ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात येतील.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## निवेदन क्र.6 च्या संदर्भात

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे सदरहू निवेदन परवा घेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, मिठी नदीसारखा अतिशय महत्वाचा विषय असताना सुध्दा माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत. आज नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन असताना जर माननीय मंत्री महोदय उपस्थित राहत नसतील तर शासनाच्या वतीने संबंधीत मंत्र्यांचा आणि विभागाचा यामध्ये बेजबाबदारपणा आणि बेफिकीरी आहे असे आपल्याला वाटत नाही काय ?
या ठिकाणी महसूल राज्यमंत्री उपस्थित आहेत.

श्री.दिवाकर रावते : या ठिकाणी माननीय महसूल राज्यमंत्री उपस्थित आहेत, त्यांनी सांगावे की, हे निवेदन नंतर घेण्यात यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, हे निवेदन नगर विकास विभागाशी संबंधीत आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण कृपया आपण खाली बसा. हे निवेदन नंतर घेण्यात येईल.

-----

## लक्षवेधी सूचना क्र.1 पुढे ढकलण्याबाबत

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी विनंती केल्यानुसार लक्षवेधी सूचना क्रमांक-1 पुढे ढकलण्यात आली आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 16:20

**पृ.शी.**: रायगड जिल्हयातील काही भागांत मोठया प्रमाणावर डोंगरातून माती व दगडाचे होत असलेले उत्खनन.

**मु.शी.**: रायगड जिल्हयातील काही भागांत मोठया प्रमाणावर डोंगरातून माती व दगडाचे होत असलेले उत्खनन यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील बिरवाडी, वाळण, या भागामध्ये मोठ्या प्रमाणात डोंगरातून माती व दगडाचे उत्खनन सुरु असल्याने भविष्यकाळात या ठिकाणी दरडी कोसळण्याचे निर्माण झालेले संकट व पर्यावरणाला निर्माण झालेला धोका, शहरात व औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणावर भरावाची कामे सुरु असल्याने राजकीय पक्षाच्या मंडळींनी या धंद्यात रोवलेले पाय, महसूल विभागाकडून 90 ब्रासची परवानगी मिळवून महिनाभर हजारो ब्रास मातीचे करण्यात येत असलेले उत्खनन, मोठ्या प्रमाणावर राजरोसपणे उत्खनन होत असल्याने तालुक्यातील हजारो डोंगर उध्वस्त होणे, बेसुमार उत्खनन रोखण्यासाठी ठेवण्यात आलेली भरारी पथके भ्रष्ट झाल्याने अनधिकृत उत्खनन वाढून या परिसरातील पर्यावरणाला निर्माण झालेला धोका, सबब अतिवृष्टी झाल्यास मोठ्या प्रमाणावर वित्त व मनुष्य हानि होण्याची व्यक्त होत असलेली भिती, सदर उत्खनन थांबवावे अशी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली अथवा करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विना परवाना उत्खनन करणाऱ्यांकडून किती दंड वसूल करण्यात आला आहे ? परवान्यापेक्षा जादा उत्खनन करणारे परवानेधारक किती आहेत ? त्यांचे परवाने रद्दे केले आहेत काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशी दोन प्रकरणे शोधून काढण्यात आली आहेत. त्यामध्ये 38 लाख रुपये दंड आणि रॉयल्टी वसूल करावयाची आहेत. त्यापैकी 10 लाख रुपये वसूल झाले असून, उर्वरित वसुली करण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : ज्यांना दंड झालेला आहे त्यांचे परवाने रद्द करणार आहात काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : विना परवानगीने काम केल्यामुळे त्यांना दंड झालेला आहे. त्यामुळे त्यांचे परवाने रद्द करण्यात येतील.

-----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: वीज वाहिनीचा धक्का लागल्याने मच्छिमार गंभीर जखमी होणे.

**मु.शी.**: वीज वाहिनीचा धक्का लागल्याने मच्छिमार गंभीर जखमी होणे यासंबंधी सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत, सर्वश्री संजय दत्त, प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित दिलेली लक्षवेधी सूचना

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

दिनांक 10 मार्च, 2006 रोजी मालवण समुद्रातील पदमगड ते सिंधुदूर्ग या सागरी मार्गावर महाराष्ट्र विज वितरण मंडळाने टाकलेल्या विज वाहिन्यांखाली आल्याने मच्छिमारी करण्यासाठी गेलेल्या 6 मच्छिमारांना धक्का लागून ते गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना, या 6 जखमींपैकी तिघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे आढळून येणे, श्री. मोंडकर व इतर जखमींना मुंबई येथील के.ई.एम. रुग्णालयात दाखल करण्यात येणे, श्री.मोंडकर यांच्या उजव्या हाताला झालेल्या जखमेत विष पसरल्याने त्यांचा कोपऱ्यापासून हात कापण्यात येणे, तसेच जव्या पायाची तीन बोटेही कापण्यात येणे स्थानिक गावातील ग्रामस्थ लोकवर्गणी जमा करुन या अतिगंभीर जखमींवर सध्या औषधोपचार करीत असल्याचे आढळून येणे, महाराष्ट्र विज वितरण मंडळाला विज वाहिन्या खाली लोंबत असल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रातून तसेच स्थानिक नागरिकांनी विज वाहिन्या त्या तात्काळ बदलण्याबाबत वारंवार कळवूनही विज मंडळाने त्याकडे केलेले दुर्लक्ष, यापूर्वीही गेल्या महिन्यात 20 ते 25 मच्छिमार विजेचा धक्का बसून झालेल्या अपघातात जखमी झाल्याची घडलेली घटना, त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये व मच्छिमारांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, अपघातात जखमी झालेल्या मच्छिमारांना आर्थिक सहाय्य देवून त्यांना विज मंडळात नोकरी देण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.

.8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 16:20

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला जे उत्तर आलेले आहे त्यावरुन असे दिसते की, माननीय मंत्री महोदयांची विभागाकडून कशाप्रकारे दिशाभूल केली जात आहे. दिनांक 5 मार्च रोजीच्या रत्नागिरी टाईम्समध्ये "वीज मंडळाची बेपर्वाई, होडीतून प्रवास करणे धोकादायक" अशी बातमी आली होती. अशा अनेक तक्रारी या प्रकरणी आलेल्या आहेत. ज्या तीन विद्युत लाईन्स होत्या, त्यातील एक लाईन पाण्यातून जात होती. परंतु निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "सुनामी वादळाच्या परिणामस्वरुप उद्‌भवलेल्या लाटांमुळे किल्ल्यात जाण्यासाठी असणाऱ्या पायवाटेवरील रेती वाहून गेली व त्या ठिकाणी समुद्राचे पाणी भरले आहे." महोदय, हे साफ खोटे आहे. मी स्वत: सात वेळा या मार्गावरुन गेलो आहे. या ठिकाणी जे चुकीचे निवेदन करण्यात आलेले आहे ते सदनाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

सभापती महोदय, त्या विद्युत वाहिनीच्या तारा 17 ते 19 फूट उंचावर होत्या हे साफ खोटे आहे. या संदर्भातील पोलिसांचा पंचनामा आहे. त्या पंचनाम्यात स्पष्ट दिले आहे की, त्या ठिकाणी दोन पोल होते आणि त्या दोन पोलच्या पाच मिटर्समध्ये दुसरा एकही पोल नव्हता. सभापती महोदय, त्या ठिकाणी एकूण तीन वाहिन्या होत्या, त्यापैकी एक वाहिनी समुद्राच्या पाण्यातून जात होती. सभापती महोदय, राहिलेल्या दोन वाहिन्या 5 ते 7 फूट उंचीवर आहेत. यासंबंधी लक्षवेधीच्या उत्तरात असे सांगितले आहे की, " सदर विद्युत वाहिनीच्या तारा, वाहिनीखाली असणाऱ्या समुद्राच्या पाण्याच्या सरासरी पातळीपासून 17 ते 19 फूट उंचावर होत्या. " सभापती महोदय, या उत्तरात तफावत आहे. या प्रकरणातील सहाय्यक अभियंता श्री. राठोड हे अतिशय उर्मठ व अकार्यक्षम आहेत. सभापती महोदय, या संदर्भातील तक्रारीबाबत श्री. राठोड यांनी असे उत्तर दिले आहे की, " तुमच्या जबाबदारीवर तुम्ही तेथे गेलात आणि तुम्ही तेथे गेल्यामुळे हा अपघात झालेला आहे, या प्रकरणी मंडळ कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही. " सभापती महोदय, या प्रकरणी मंडळाचीच पूर्णपणे जबाबदारी आहे. या अपघातामध्ये लोकांचे हातपाय कापले गेले आहेत. काही लोक गोव्यातील रुग्णालयामध्ये मृत्यूच्या उंबरठ्यावर आहेत. तरी, माझे माननीय मंत्रीमहोदयांना असे प्रश्न आहेत की, अशा अकार्यक्षम अधिकाऱ्याला ताबडतोब बडतर्फ करणार का ? जखमींना तसेच ज्यांचे हातपाय गेलेले आहेत, त्यांना नुकसानभरपाई दिली जाणार का ? आणि जे जखमी झाले आहेत, त्यांचा सेवेमध्ये समावेश केला जाणार आहे का ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अपघाताच्या ठिकाणाहून सिंधुदूर्ग किल्ल्याला वीज पुरवठा केलेला आहे. सभापती महोदय, तसे पाहिले तर, ही विद्युतवाहिनी खूप जुनी म्हणजे सन 1977 ची आहे. या वाहिनीचे एल.टी.मधून एस.टी. मध्ये सन 2000 मध्ये रुपांतर केले. सभापती महोदय, संपूर्ण चौकशीअंती एक बाब निदर्शनास येते की, लाईन उभारली त्यावेळी वीज वाहिनीचे पाण्यामधून जमिनीवरील अंतर योग्य होते. परंतु मधील काळात त्सुनामी लाटा आल्या. सभापती महोदय, पूर्वी या ठिकाणी पाणी असायचे. परंतु ज्यावेळी ओहोटी येत होती, त्यावेळी लोक ये-जा करायचे. सभापती महोदय, त्सुनामी लाटा आलेल्या परिसरामध्ये जागा वाहून गेल्यामुळे तेथे एक खोलगट भाग तयार झाला आणि त्याचा वापर करुन निश्चितपणे त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

परिसरातील लोकांनी छोट्या-छोट्या होड्यांमधून प्रवास सुरु केला. पूर्वी अशाप्रकारे प्रवास करण्यात येत नव्हता. विभागाकडून देण्यात आलेली माहितीच मी सभागृहात सादर केलेली आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, या संदर्भात पूर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. यासंबंधी वर्तमानपत्रात पूर्वी बातमी आली असेल आणि विभागाने जर त्याची नोंद घेतलेली नसल्यामुळे हा अपघात घडला असेल तर सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी मानून या संपूर्ण प्रकरणामध्ये फेरचौकशी केली जाईल आणि या संदर्भात जर कोणी अधिकारी दोषी आढळला तर त्याच्याविरुध्द कारवाई केली जाईल. सभापती महोदय, ही घटना घडल्यामुळे ज्या व्यक्तींना बाधा पोहोचली आहे किंवा ज्यांचे हातपाय तुटले आहेत, अशांना एक विशेष बाब म्हणून, सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून, सर्व आपद्ग्रस्त व्यक्तींना वीज मंडळामंडळाच्या माध्यमातून आवश्यक ते सहाय्य देण्यात येईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात काही गोष्टी मान्य केलेल्या आहेत. त्या ठिकाणी जी वायर टांगली होती, तिची दुरुस्ती सन 2000 मध्ये केली आहे. या प्रकरणातील वस्तुस्थिती आता लोकांच्या समोर आलेली आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

इलेक्ट्रीक वायरमधून करंट पास होत असल्यामुळे त्या ठिकाणी अपघात झालेला आहे. यासाठी एमएसईबीचे अधिकारी जबाबदार आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. तेथे राठोड नावाचे अधिकारी आहेत, आताच सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी त्याचा उल्लेख केलेला आहे. मालवण येथील एक पोल बदलणे अत्यंत गरजेचे होते त्यासाठी मी सदर अधिकाऱ्यांकडे गेलो होतो, तो पोल बदलण्याची मागणी कित्येक लोकांनी करुन देखील एमएसईबी व बांधकाम विभागाने ते काम केलेले नाही. सदर कामासाठी त्यांच्याकडे गेलो असता श्री. राठोड, साहित्य नाही म्हणून सांगायचे, मी त्यांना कुडाळ कार्यालयातून साहित्य घेण्यास सांगितले, तरी सुध्दा पोल बदलण्याची कार्यवाही झालेली नाही. श्री. राठोड यांच्यावर एफआयआर दाखल झालेला आहे, त्यांच्यावर योग्य ती कारवाई होईलच. परंतु सदर ठिकाणी 4 ते 5 लोकांचे हात किंवा पाय तुटून ते जखमी झालेले आहेत त्यांना शासनाकडून एक-एक लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, निवेदनाच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, सदर घटनेबाबत सविस्तर चौकशी करण्यात येईल व दोषी आढळल्यास संबंधितांविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्यावेळी एखादी लक्षवेधी सूचना दाखल होते, अशी लक्षवेधी सूचना सभागृहात दाखल झाल्यानंतर त्यावर उत्तर देण्यासाठी अतिशय कमी वेळ असतो. त्यामुळे सदर विभागाकडून आलेल्या माहितीच्या आधारे मंत्री महोदयांना उत्तर द्यावे लागते. त्यानंतर सभागृहामध्ये त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांकडून अधिकची माहिती दिली जाते. व सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या प्रकरणाची फेर चौकशी करण्यात येईल. तसेच सदर घटनेबाबत इलेक्ट्रीक इन्स्पेक्टरचा अहवाल 1 ते 2 दिवसांत त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात येईल व संबंधितांवर योग्य अशी कडक कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जखमी व्यक्तींना 1 लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी केलेली आहे, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, जे जखमी झालेले आहेत, त्यांचे झालेले नुकसान व औषधोपचाराचा खर्च निश्चितपणे त्यांना देऊन मदत करण्यात येईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर असा प्रकार घडलेला आहे. ज्या ज्या ठिकाणी मच्छिमार झोन आहेत त्या ठिकाणी इलेक्ट्रीक वायर्स खाली आलेल्या आहेत, पनवेल, पेण, ठाणे या ठिकाणाहून सुध्दा अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत, म्हणून आपण सगळयाच ठिकाणच्या इलेक्ट्रीक वायर्स उंचावरुन टाकण्याचे आदेश संबंधितांना देणार आहात काय ? तसेच या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी व कर्नल सुधीर सावंत यांनी ज्या अधिकाऱ्याचे नांव सांगितले आहे ती माहिती सत्य समजून सदर अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्याचा शासन निर्णय घेणार आहे काय ? तसेच जखमी व्यक्तींना आपण फक्त 2 हजार रुपयांची मदत दिलेली आहे, त्याबाबत निकषांप्रमाणे मदत देण्यात येईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणी इलेक्ट्रीक वायर्स खाली आलेल्या आहेत व त्यातून करंट पास झालेला आहे त्या सर्व वायर्स उंचावरुन नेण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येतील. या खात्याची ती जबाबदारीच आहे. मी आजच या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सर्व राज्यामध्ये सूचना पाठवित आहे. ज्या ज्या ठिकाणी लाईन खाली आलेली असेल त्या लाईनचे ठराविक काळामध्ये दुरुस्ती करण्याचे काम हाती घेतले पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना मी देणार आहे. या कामामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी जाणुनबुजून दुर्लक्ष केले असेल, व सदर अधिकारी दोषी असेल तर त्यांच्यावर विधानसभेचे अधिवेशन संपण्याच्या आत कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 16:35

श्री.दिलीप वळसे-पाटील ...

या ठिकाणी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी एका ठराविक रकमेच्या मदतीचा आग्रह धरु नये. हे अधिवेशन संपण्यापूर्वी या प्रकरणामध्ये जखमी झालेल्या लोकांना कमीत कमी रु.50,000/- एवढी मदत देण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिकलसेलग्रस्त रुग्णांचे होत असलेले प्रचंड हाल

**मु. शी** : सिकलसेलग्रस्त रुग्णांचे होत असलेले प्रचंड हाल यासंबंधी
सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेते ) : अध्य□ महोदय, मी आपल्या अ-ुमती-ने -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि□ महत्वाच्या बाबी□डे मा-ा-ीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे ल□वेधू इच्छितो आणि□ त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा □रावे, अशी वि-ंती □रतो.

" विदर्भातील 20 टक्के सिकलसेलग्रस्त रुग्णांबाबत शासन गंभीर नसणे, या सिकलसेलग्रस्तांसाठी नवीन धोरण राबविण्याची घोषणा करुनही अद्यापपावेतो पुढील कार्यवाही न होणे, सिकलसेल रुग्णांसाठी शहरातील मेयो हॉस्पीटल येथे संशोधन व उपचार केंद्र उभारणे, परंतु या केंद्राला निधी दिला नसल्याने हे केंद्र मोडकळीत येणे, उपचार साधनाअभावी रक्त नमुन्याची तपासणी न होणे, तेथे प्रशिक्षित तंत्रज्ञ नसणे, शासनाने वारंवार निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन देवूनही त्यावर कार्यवाही न होणे, यामुळे सिकलसेलग्रस्त रुग्णांचे होत असलेले प्रचंड हाल, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.दिलीप वळसे-पाटील ( वैद्यकीय व शिक्षण मंत्री ) : अध्य□ महाराज, ल□वेधी सूच-ेसंबंधीच्या -िवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-ने सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : -िवेद-ा सभा□हाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

-िवेद-ा

( **प्रेस** : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भातील 20 टक्के सिकलसेलग्रस्त रुग्णांबाबत शासन गंभीर नसणे अशा प्रकारच्या अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. तसेच या संदर्भात शासन गंभीर नसल्याचे आम्ही म्हटलेले आहे. त्या रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स नाहीत, प्रशिक्षित तंत्रज्ञ नाहीत, रक्त नमुन्यांची तपासणी केली जात नाही. दि.10/07/2001 रोजी नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथील प्रादेशिक सिकलसेल संशोधन व उपचार केंद्र कार्यान्वित करण्यात आले.

सन 2006-07 या आर्थिक वर्षात इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्याकरीता प्रत्येकी 10 लाख रुपयांचे निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर केंद्र स्थापन करताना मेयो रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी स्वत:चे नियमित काम सांभाळून या केंद्राचे काम करावे असा निर्णय घेण्यात आला होता. गेल्या 5 वर्षांपासून या केंद्राला सुरुवात झाली असून, सन 2001 पासून ते सन 2006-07 पर्यंत या केंद्राला शासनाकडून किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे ? माझा दुसरा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या केंद्रासाठी मेयो येथील कर्मचारी वगळता स्वतंत्र कर्मचारीवृंद नियुक्त केला आहे काय ? आणि माझा माननीय मंत्रिमहोदयांना तिसरा प्रश्न असा आहे की, नागपूर येथील दोन वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये हे केंद्र सुरु करण्यात आले आहे. परंतु विदर्भ हा 11 जिल्हयांमध्ये विभागलेला आहे. पश्चिम विदर्भामध्ये अकोला जिल्हयामध्ये अशाप्रकारचे वैद्यकीय महाविद्यालय असल्यामुळे तेथे अशाप्रकारचे केंद्र सुरु करण्यात येऊन तेथील लोकांना न्याय देण्यात येणार आहे काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : विदर्भामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये सिकलसेलचा विषय अतिशय महत्वाचा आहे. या संदर्भात शासनाने वेळोवेळी आपली भूमिका जाहीर केलेली आहे. दि. दि.10/7/2001 रोजी नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथील प्रादेशिक सिकलसेल संशोधन व उपचार केंद्र कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच त्या ठिकाणी मेयो रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी स्वत:चे नियमित काम सांभाळून या केंद्राचे काम करावे असा सुध्दा निर्णय घेण्यात आला होता. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. या केंद्रासाठी आदिवासी कल्याण तसेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील ...

डीपीडीसी च्या माध्यमातून निधी उपलब्ध केला जात होता. परंतु यासाठी जेवढे प्राधान्य देणे आवश्यक होते तेवढे दिले गेले नाही ही बाब खरी आहे. परंतु याबाबत काहीच काम झालेले नाही असे म्हणता येणार नाही. या प्रकरणी बरेच काम झालेले आहे. यासाठी नियमित प्रयत्न व्हावेत अशी आपल्या सभागृहाची व सामान्य रुग्णांची अपेक्षा होती. यासाठी वेगवेगळया कालावधीत 30 ते 40 लाख रुपये मंजूर करण्यात आले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सन 2001 ते 2006-07 पर्यंतचा ब्रेकअप द्यावा.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सन 2001 मध्ये डीपीडीसी मार्फत 32,50,000/- एवढा निधी मंजूर झाला होता. सन 2005-06 या वर्षासाठी इंदिरा गांधी शासकीय रुग्णालय व महाविद्यालयाला 13 लाख रुपये मंजूर करण्यासाठी प्रस्तावित होते. परंतु यामध्ये थोडा विलंब झाला होता. दरम्यानच्या कालावधीत या दोन शासकीय महाविद्यालय व रुग्णालयांसाठी प्रत्येकी 10-10 लाख रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत.

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

आणि 2006-07 या वर्षाचे जे बजेट सादर झालेले आहे त्यामध्ये जवळपास 90 लाख रूपये आपण यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. यामध्ये इंदिरागांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर आणि धुळे यांना प्रत्येकी 30-30 लाख रूपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. जे 10 लाख रूपयांचा उल्लेख आपण करीत आहात ते या तिन्हींना पीएलए फंडातून दिलेले आहेत. त्या व्यतिरिक्त हे 90 लाख रूपये आपण उपलब्ध करून दिले आहेत. या संदर्भात मधल्या काळामध्ये माननीय राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती देखील आपण नियुक्त केली होती आणि हा विषय केवळ वैद्यकीय शिक्षण विभागापुरता मर्यादित नाही तर इतरही विभाग याच्याशी संबंधित असल्याने त्या संबंधित विभागांचे सचिव, उदा. आदिवासी कल्याण विभाग असेल वा इतरही विभाग असतील त्या सगळ्यांना एकत्रित करून एक इफेक्टिव ट्रीटमेंट या रोगाच्या रूग्णांना देण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. अकोल्याचा देखील त्यात समावेश करण्यात आलेला आहे आणि केवळ अकोलाच नाही तर ज्या ज्या परिसरामध्ये हे रूग्ण आढळून येतील तेथील शासकीय हॉस्पिटलमध्ये त्यावर उपचार करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, खरे मध्ये या उत्तरामध्ये दिलेले पहिले वाक्यच चुकीचे आहे. सिकलसेल हा रोग प्रादुर्भावातून होत नाही तर हा अनुवंशिक असा रोग आहे. वंश परंपरेतून हा रोग होतो आणि त्याची अनेक कारणे आहेत. चुकीचे रेकॉर्ड होऊ नये यासाठी मी ही माहिती येथे दिली आहे. त्याप्रमाणे मंत्री महोदयांनी निवेदन दुरूस्त करावे ही विनंती. सभापती महोदय, विदर्भातील सर्व जिल्ह्यांतून आणि गावांतून या दृष्टीने आपण सर्वेक्षण केलेले आहे काय ? असल्यास, त्यात या रोगाचे किती रूग्ण आपल्याला आढळून आले ? कारण काही वर्षापूर्वी हा प्रश्न सन्माननीय श्री.एकनाथ गायकवाड हे या विभागाचे मंत्री असताना या सभागृहामध्ये आला असता त्यांनी यासाठी इलेक्ट्रोफोरोसीस टेस्ट असते ती प्रत्येक प्रा.आ.केंद्रांमध्ये उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिलेले होते. या टेस्ट अत्यंत अल्प पैशामध्ये होऊ शकतात. तर त्या आश्वासनाप्रमाणे ही टेस्टची सुविधा आपण उपलब्ध करून दिली आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, 2001 पासून 2007 पर्यंत साधारणत: 58,710 रूग्ण या रोगाचे आढळून आले त्यापैकी 4087 रूग्णांवर उपचार करण्यात आलेले आहेत. आतापर्यंत याबाबतीत लोकांना जागृत करण्याचे दृष्टीने 7 वर्कशॉप्स आपण घेतलेली असून त्यापैकी

...... जीजी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील .....

4 नागपूरमध्ये आणि 3 गोंदियामध्ये घेतलेली आहेत. तसेच हा रोग प्रादूर्भावातून होत नसून वंश परंपरेतून होतो असे जे आपले म्हणणे आहे त्याच्याशी मी सहमत असून त्याप्रमाणे या निवेदनात दुरूस्ती करण्यास माझी हरकत नाही. मी त्याप्रमाणे हे निवेदन दुरूस्त करीत आहे.

डॉ. दीपक सावंत : परंतु आपण या रोगासाठी आवश्यक असलेली इलेक्ट्रोफोरोसिस टेस्ट आपण सर्व प्रा.आ.केंद्रांमध्ये उपलब्ध करून दिली आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, याबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु याबाबत निश्चितपणे माहिती घेऊन ती आपल्याला दिली जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सिकलसेल ॲनिमिया या रोगाचे प्रमाण विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये जास्त असून विशिष्ट जाती-जमातीमध्ये हे प्रमाण अधिक होते. परंतु अलिकडे उच्च वर्गामध्ये देखील हा आजार दिसून येतो. सन्माननीय सुशीलकुमार शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री असताना नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये या विषयावर येथे फार चर्चा झाली होती आणि माननीय मंत्री महोदयांनी देखील ही बाब गांभीर्याने घेतली होती. तेव्हा ताबडतोब सर्व सचिवांची तसेच प्रमुखांची एक बैठक नागपूरमध्ये बोलाविण्यात येऊन एक समिती स्थापन करण्यात आली होती. जागतिक आरोग्य संघटनेने देखील या सिकलसेल ॲनिमियाचा अत्यंत गंभीरपणे विचार करून या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी म्हणून प्रचंड फंडाची देखील व्यवस्था करून त्यातून निधी दिलेला होता. तर तो निधी आपल्याला प्राप्त झालेला आहे काय ? खरे तर हा रोग डबल एक्स असेल तर जीवघेणा, गंभीर स्वरूपाचा असतो. ..

( यानंतर श्री. सरफरे .... एचएच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

म्हणजे आई-वडील या दोघांना हा आजार असेल तर त्यांच्यापासून निर्माण होणाऱ्या अपत्यालाही हा आजार होतो. त्यामुळे वंशपरंपरेने चालत आलेला हा रोग आहे. म्हणून या रोगाची तपासणी करुन ज्या डबल एक्सना सिकलसेल आहे त्यांना विवाहापासून अलिप्त रहाण्यासाठी कौन्सिलिंग करण्याची आपण व्यवस्था केली आहे काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वी सभागृहामध्ये सांगितले आहे की, या विषयाच्या संदर्भात जितक्या गांभीर्याने ज्या ज्या गोष्टी करावयास पाहिजे होत्या त्या त्या स्तरावर केल्या गेलेल्या नाहीत. म्हणून या संदर्भात सचिव, वैद्यकीय शिक्षण, सचिव, सार्वजनिक आरोग्य, सचिव, सामाजिक न्याय, सचिव, आदिवासी विकास, सचिव, महिला व बाल कल्याण, संचालक, आदिवासी विकास संचालनालय, संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, संचालक, समाज कल्याण संचालनालय, या सर्व अधिकाऱ्यांची माननीय राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. यामध्ये ज्या इफेक्टिव्ह केसेस पुढे आल्या पाहिजेत त्या न आल्यामुळे राज्य शासनाने दिनांक 7.1.2006 रोजी एक बैठक घेतली. आणि या रोगासाठी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ट्रीटमेंट उपलब्ध करुन देण्यासाठी जी कारवाई करणे आवश्यक आहे त्यासाठी एक ॲक्शन प्लॅन तयार केला. तयार करण्यात आलेला ॲक्शन प्लॅन माननीय सदस्यांच्या माहितीकरीता मी सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे. त्याबाबत माननीय सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्या सूचना स्वीकारुन त्यामधून आपल्याला निश्चितपणे मार्ग काढता येईल. सभापती महोदय, राज्यातील एकाही मेडिकल कॉलेजमध्ये याकरीता पैसे कमी पडत असतील तर त्यासाठी बाकीच्या घटकातील खर्चामध्ये काटछाट करुन यासाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत. व टाईम बाऊंड अशाप्रकारे तीन महिन्याच्या काळात ज्या ज्या ठिकाणी सेंटर्स स्थापन करणे आवश्यक आहे त्या ठिकाणी फाईंड आऊट झालेल्या पेशंटला ट्रीटमेंट दिली जाईल. दुसऱ्या बाजूला अशाप्रकारची घटना घडू नये यासाठी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी एकत्रित असा कार्यक्रम तयार करुन त्यासाठी एक टास्कफोर्स निर्माण केला आहे, तशाप्रकारचा एक ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. हा प्लॅन तीन महिन्यात कार्यरत होईल आणि पुढील पावसाळी अधिवेशनामध्ये त्याचा कार्यपूर्ती अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सभापती महोदय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, या कामासाठी जागतिक आरोग्य संघटनेकडून निधी उपलब्ध झालेला नाही.

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, दिनांक 13 डिसेंबर 2005 रोजी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांसमवेत माननीय राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी नागपूरच्या इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी यासंबंधी शासनाचे धोरण एक महिन्यात जाहीर करण्यात येईल असे सांगितले होते. परतु अद्याप पावेतो शासनाने धोरण जाहीर केले नाही. माननीय श्री. दिलीप वळसे पाटील साहेबांनी तीन महिन्यामध्ये यासंबंधीची कार्यवाही करण्यात येईल, त्यासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही असे सांगितले. सभापती महोदय, मला मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, माननीय श्री. दिग्विजय खानविलकर हे आरोग्य मंत्री असतांना त्यांनी नागपूरच्या अधिवेशनामध्ये 3 कोटी रुपये देऊ अशी घोषणा केली होती. या गोष्टीला दोन-तीन वर्षे होऊन गेली तरी अजून 3 कोटी रुपये मिळाले नाहीत. म्हणून मंत्रिमहोदयांना मला विनंती करावयाची आहे की, हा गंभीर अशाप्रकारचा रोग असल्यामुळे तीन महिन्यामध्ये त्यावर कार्यवाही करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, डिसेंबर महिन्यातील नागपूरच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर दिनांक 7.1.2006 रोजी शासनाने एक बैठक घेतली. आणि त्यामध्ये सिकलसेल आजाराचे राज्यामध्ये संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी एक योजना तयार केली असून त्या प्लॅनची प्रत माझ्या हातामध्ये आहे. त्यामध्ये प्री अँगल मेथॉडॉलॉजी अचिव्ह करणे, इत्यादी सर्व विषय त्यामध्ये कव्हर केले आहेत. या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी ही संपूर्ण स्किम कशी असली पाहिजे, तिची हेरारकी कशी असली पाहिजे यासंबंधी पूर्णपणे योजना तयार केली आहे. ती संपूर्ण योजना मी सभागृहाच्या पटलावर ठेवायला तयार आहे. या तयार केलेल्या योजनेची संपूर्ण राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यासाठी विभागाने कार्यवाही सुरु केली आहे. त्याचे इफेक्टिव्ह परफॉर्मन्स तीन महिन्यामध्ये आपल्याला दिसेल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील पुढे सुरु....

प्रामुख्याने तीन महिन्यानंतर म्हणजे जूनच्या अधिवेशनामध्ये, याबाबतचा अहवालाचा वृत्तांत मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : वन व महसूल विभागाच्या वतीने खाजगी वनांची जागा शासनाच्या ताब्यात घेणे.

**मु. शी.** : वन व महसूल विभागाच्या वतीने खाजगी वनांची जागा शासनाच्या ताब्यात घेणे यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, श्री.अनंत तरे, डॉ.अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" वन विभाग आणि महसूल विभाग यांच्या वतीने "खाजगी वनां"ची जागा शासनाच्या म्हणजे वन विभागाच्या ताब्यात घेण्यासाठी सन 1975 मध्ये बजावण्यात आलेल्या नोटिसा, या कायद्यातील तरतुदीनुसार बारा हेक्टरपेक्षा अधिक जागा असेल आणि ही जागा वन सदृश्य असेल तरच जादा जागा "खाजगी वन" म्हणून ताब्यात घेताना कोणते निकष लावण्यात यावेत याबाबत शासकीय यंत्रणा संभ्रमात असणे, वनपालांनी येता-जाता ज्या जागांवर झाडे दिसली त्या जागांच्या मालकांचे गट क्रमांक "खाजगी वना" च्या क्षेत्रात टाकण्यात येणे, सदर कायदा अस्तित्वात आला त्यावेळी संयुक्त कुटुंबे असणे, संबंधित कुटुंबातील सदस्यांनुसार 12 हेक्टर जागा उपजिविकेकरिता पुरेशी नसणे, तसेच ज्यांच्या जमिनी एक-दोन गुंठ्यांच्याही नाहीत त्यांच्या जमिनी तत्कालिन वनपालांनी "राखीव वन" म्हणून दाखविणे, तसेच नोटिसा दिल्यानंतर त्याबाबत हरकती मागविणे कायद्याने बंधनकारक असतांना याबाबतची कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत त्या परिसरातील गरीब शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम, दूर करण्याकरिता शासनाने हस्तक्षेप करुन निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया,"

श्री.बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे :पुणे जिल्ह्यातील सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या गावांपैकी, एतवरवाडी, पोळेकरवाडी, अंगडे, खानापूर, मणेरवाडी, सांबरवाडी, कल्याण, पानशेत या गावांतील हजारो शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित असा हा प्रश्न आहे. लक्षवेधी सुचना उपस्थित करण्याच्या मागे दोन-तीन हेतू आहेत. उप सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"ज्यांची जमीन 12 हेक्टरच्या आत आहे, त्यांना कोठेही बाधा येणार नाही." परंतु प्रत्यक्षात ज्यांची 12 हेक्टरच्या आत जमीन आहे, त्यांची जमीन किती दिवसात शासन परत देणार आहे ? त्याबाबतची प्रक्रिया सुरु झालेली आहे काय ? माझा दुसरा महत्वाचा मुददा असा आहे की, या संदर्भातील कायद्यामध्ये बदल झालेला आहे, त्यानुसार केंद्र सरकारची याबाबतीत परवानगी ध्यावी लागेल असे निवेदनात म्हटलेले आहे. त्याचबरोबर सर्वोच्च नयायालयाला विनंती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे,असेही उत्तरात म्हटलेले आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, 12 हेक्टरच्या आत ज्यांची जमीन आहे, त्यांना जमीन परत करण्याबाबतचा जो निर्णय झालेला आहे,त्या संबंधित शेतकऱ्यांना त्याच ठिकाणची ती जमीन मिळू शकते असे आम्हीं समजावयाचे काय ? ही जमीन केव्हापर्यन्त त्यांना परत मिळणार आहे ? दुसरा प्रश्न असा की, कायदा बदलायचा असेल तर तशा प्रकारची आपली भूमिका मांडून सर्वोच्च न्यायालयाकडे किती दिवसामध्ये परवानगी मागण्याच्या बाबतीत शासन प्रयत्न करणार आहे?

श्री.बबनराव पाचपुते : उप सभापती महोदय,सन 1975 चा महाराष्ट्र सरकारचा कायदा आहे. संपूर्ण देशामध्ये वन क्षेत्र वाढविण्याच्या संदर्भात सूचना आलेल्या आहेत. त्यावेळेस इमर्जन्सी होती. त्यावेळेस जमीन डिक्लेअर करण्यात आली. एकूण 2 लाख 65 हजार 58 हेक्टर जमीनीचे क्षेत्र वन खात्याच्या ताब्यात आले. एवढे क्षेत्र आल्यानंतर काही लोक भूमीहीन झाले. त्या संदर्भात पुन्हा 1978 सालच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली. तेंव्हा कलम 22 (अ) (1) मध्ये सुधारणा करण्यात आली. त्याप्रमाणे 12 हेक्टरपर्यन्त जर क्षेत्र असेल तर संबंधित खातेदारास जमिन परत करण्याचा निर्णय घेतला. आतापर्यन्त 1 लाख 91 हजार 333 हेक्टर जमीन परत केली. उरलेल्या जमिनीच्या संदर्भात 1980 च्या कायद्यामध्ये दुरुस्ती झाली.त्यामुळे याबाबतची संपूर्ण प्रक्रिया थांबली. प्रत्यक्षात सातबाराच्या नोंदी पाहिल्यानंतर असे लक्षात आले की,बॉम्बे इन्व्हॉर्नमेंट ॲक्शन ग्रुप या संस्थेने हायकोर्टामध्ये याचिका दाखल केली होती, त्या संदर्भात हायकोर्टाने निर्णय दिला व त्या निर्णयानुसार महसूल विभागाला मुदत देण्यात आली होती.

II-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.बबनराव पाचपुते.....

तसेच मे 2001 पर्यन्त ज्या जमिनीवर प्रायव्हेट फॉरेस्ट आहेत, त्याबाबतीतच्या नोंदी सातबाराच्या उताऱ्यावर लागल्या पाहिजेत. त्याप्रमाणे नोंदी लावण्यात आल्या. खाजगी वनाच्या परत केलेल्या जमिनी असल्या तरी त्यातील 24 (2) प्रमाणे त्या जमिनी खाजगी वन क्षेत्र म्हणून रहातील. अशाप्रकारचा निर्णय देण्यात आला. त्यानंतर ज्यांनी जमिनी दिलेल्या आहेत, त्यांना त्या जमिनी परत मिळणार आहेत काय असा प्रश्न निर्माण झाला. या संदर्भात 24 (2) प्रमाणे सुधारणा करण्यास महाराष्ट्र सरकारची तयारी आहे. तशी तयारी असली तरी देखील त्याबाबत कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय करावा लागेल. त्यानंतर पुन्हा सुप्रीम कोर्टामध्ये जावे लागेल. 1980 चा जो कायदा आहे,त्यामध्ये आपल्याला सुधारणा करावयाची असेल तर त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी ध्यावी लागेल. तशी परवानगी किती दिवसात घेण्यात येईल असा माननीय सदस्यांचा आहे. त्या बाबत लवकरात लवकर परवानगी घेण्यात येईलए एवढेच मी सभागृहाला सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, शासनाच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. 1975 चा जो कायदा होता त्यामध्ये 1987 साली दुरुस्ती केली. 1978 नंतर दोन वर्षामध्ये म्हणजे 1980 साली केंद्र सरकारचा कायदा आल्यामुळे काही शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर सुध्दा त्यांच्या जमिनी शासकीय यंत्रणेकडून त्यांना मिळू शकल्या नाहीत. अशा बाबतीत तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. 12 हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेले असे किती शेतकरी आहेत की, ज्यांनी दोन वर्षामध्ये शासनाकडे अर्ज केला परंतु शासन ती जमीन त्यांना देऊ शकले नाही ? त्याबाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे ?

श्री. बबनराव पाचपुते :सभापती महोदय, ही कार्यवाही 1980 साली थांबल्यानंतर परत ही कार्यवाही सुरु झालेली नव्हती. 1,91,333 हेक्टर जमीन परत केलेली आहे. आणखी 73,724 हेक्टर जमीन परत करावयाची होती. ती कार्यवाही 1980 चा कायदा आल्यानंतर थांबली. आता ती कार्यवाही सुरु झालेली आहे. आताच उच्च न्यायालयामध्ये बॉम्बे एन्व्हायरोंमेंटल ॲक्शन ग्रुपने याचिका दाखल केल्यानंतर उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला आणि महसूल विभागाला आदेश दिलेले आहेत की, प्रत्येक सातबारावर या जमिनीवर खाजगी वन ही सज्ञा लावावी. त्याप्रमाणे काम चालू आहे. आपल्या मुख्य सचिवांनी हायकोर्टामध्ये तशा तऱ्हेचे ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. 21 मे पर्यंत हे काम पूर्ण करणार. ते काम पूर्ण झाल्यानंतर आणि ते वन खात्याकडे आल्यानंतर, किती जमीन आहे ? किती शेतकरी आहेत ? किती जमीन दिलेली आहे ? किती जमीन परत करावयाची आहे ? याची चर्चा होणार आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. पुण्याचे केसरी दैनिकाचे पत्रकार तसेच कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि इतर अनेक पक्षाचे कार्यकर्ते भेटले. सन्माननीय सदस्यांनी सिंहगडजवळच्या भोर, वेल्हा या गावांची नावे सांगितली. त्या ठिकाणी एकाही शेतकऱ्याकडे 12 हेक्टरपेक्षा जास्त जमीन नाही. तेथील शेतकऱ्यांकडे 2 हेक्टर, एक हेक्टर, अर्धा हेक्टर अशा जमिनी आहेत. त्या सर्व जमिनीवर आता वन सज्ञा किंवा खाजगी वन लागलेले आहे. खाजगी वन लागल्यानंतर त्याना त्या ठिकाणी काही काम करावयाचे असेल तर नवीन कायद्याप्रमाणे त्यांना वनेतर काम करता येणार नाही. जर आपण त्यांना शेती करण्यासाठी जमीन दिली असेल आणि आपण आता असे म्हणतो की, त्यांनी वनेतर म्हणजे वनापेक्षा इतर काम करु नये. हे चुकीचे आहे. ही बाब महाराष्ट्र शासनाच्या लक्षात आली.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ MAP/ SBT

श्री. बबनराव पाचपुते .....

त्यासाठी या कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. यासंदर्भात कार्यवाही सुध्दा सुरु झालेली आहे. लवकरात लवकर ही प्रक्रिया पूर्ण करुन सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन आदेश घेऊन त्या संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांना राहत देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री. अनंत तरे : ज्या शेतकऱ्यांनी अर्ज केले त्यांना 73 हजार हेक्टर जमीन द्यावयास पाहिजे होती. शासनाच्या चुकीमुळे त्यांना जमीन दिलेली नाही. याबाबत शासन काय करणार आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ज्यावेळी हा कायदा लागू झाला त्यावेळी सगळयांना कळविले होते. सर्वांनी 6 महिन्याच्या आत अर्ज करावयाचे होते. काही शेतकऱ्यांनी अर्ज केलेले नाहीत. सभापती महोदय, हा निर्णय एका दिवसामध्ये झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. काहीही न पाहता एकदम हे जाहीर करण्यात आले ही वस्तुस्थिती आहे. माझी जमीन खाजगी वनामध्ये आहे की, नाही हे काही शेतकऱ्यांना माहीत नसल्यामुळे त्यांनी अर्ज केले नाहीत. ज्यांनी अर्ज केला त्यांची चौकशी झाली. ज्यांनी अर्ज केला नाही त्यांची चौकशी झाली नाही. 1980 साली केंद्र सरकारचा कायदा आला. वन सज्ञा आल्यानंतर पुढची प्रक्रिया थांबली. आता ती प्रक्रिया सुरु झालेली आहे. एकदा जमीन दिल्यानंतर त्या जमिनीतून जे धान्य काढतात किंवा इतर काम करतात त्यांना अडविले किंवा ते करु दिले नाही. त्यामुळे अन्याय होत होता. हे लक्षात आल्यानंतर कायद्यामध्ये सुधारणा करण्याची तयारी ठेवली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने स्पष्टपणे मान्य केले आहे. 1975 चा कायदा किंवा नंतरचा सुधारित कायदा आल्यानंतर सुध्दा ज्यांची जमीन 12 हेक्टरपेक्षा कमी आहे त्यांना जमीन परत करता येते असे शासनाने म्हटले आहे. ते नियमात बसते असे निवेदनामध्ये म्हटले आहे. यासंदर्भामध्ये सुप्रीम कोर्टाची काही अडचण असेल तर शासनाने स्वत: कार्यवाही करुन यासंदर्भात सुप्रीम कोर्टातून तातडीने स्थगिती उठवून किंवा आदेश घेऊन ज्यांची 12 हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे त्यांना जमीन तातडीने देण्यासंबंधी कार्यवाही होईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी "होय" असे सांगितले असते परंतु इर्थपर्यंतच ही प्रक्रिया थांबवावयाची नाही. त्यांना जरी जमीन दिली तरी 1980 च्या कायद्याप्रमाणे त्या ठिकाणी वन सज्ञा किंवा खाजगी वन म्हणून जमीन लागलेली आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 17:00

(श्री. बबनराव पाचपुते...)

7/12च्या उत्ता-यावर ही नोंद झाली तर शेतक-याला इतर कामे करता येत नाहीत ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने पुढकार घेऊन कायद्याच्या कलम 24(2)मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात कॅबिनेटमध्ये ठराव आणल्यानंतर आम्ही केन्द्राकडे जाणार आहोत. शेतक-यांना जमीन परत मिळत असताना त्या जमिनीवर त्याला शेती करता यावी, घर बांधता यावे यासाठी शासनानेच पुढाकार घेऊन शेतक-यांना मदत करण्याचे काम सुरु केलेले आहे.

श्रीमती कांता नलावडे : 12 हेक्टर पर्यंतचे असे क्षेत्र संबंधित खातेदारास परत करता येते असे शासनाने सांगितलेले आहे. हा निर्णय शासनाने घोषित केलेला आहे काय ? 12 हेक्टरच्या आत जमीन असलेल्या किती शेतक-यांचे अर्ज आलेले आहेत ?

श्री. बबनराव पाचपुते : यामध्ये खूप अडचणी निर्माण झालेल्या आहेत. 1975 ते 1978 पर्यन्त ज्या जमिनींना वनसंज्ञा लागली आणि ज्या शेतक-यांच्या ही बाब लक्षात आली त्यांनी आपल्या जमिनी दुस-याला हस्तांतरित केल्या. या जमिनींचे चार-पाच वेळा हस्तांतरण झालेले आहे. ज्या शेतक-यांकडे या जमिनी हस्तांतरित झाल्या त्यांना त्या जमिनीवर खाजगी वनसंज्ञा लागल्याचे माहीत झाले नाही. अशा अनेक जमिनींवर आता इमारती देखील उभ्या राहिलेल्या आहेत. याबाबतीत महाराष्ट्र सरकारच्या कायद्यामध्ये बदल करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही. 33 टक्के वन राखले पाहिजे, वनाची वाढ झाली पाहिजे. राज्यामध्ये 2007 पर्यन्त 25 टक्के वनक्षेत्र करण्याचे आश्वासन जनतेला दिलेले आहे. एका बाजूला वनाचे क्षेत्र वाढवित असताना आणि दुस-या बाजूला ते कमी करीत आहोत अशा प्रकारची विसंगती राहू नये यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ही दुरुस्ती करीत असताना केन्द्राला ही बाब पटवून द्यावी लागेल. 12 हेक्टरच्या आतील जमीन परत करीत असताना त्या जमिनीवर वनेतर कामे करता येतील अशा पध्दतीने शासनाने निर्णय घेतलेला असून त्याबाबतीत वॉर फुटींगवर काम करण्यात येत आहे.

कर्नल सुधीर सावंत : 1.65 लाख हेक्टर जमिनी पैकी 45800 हेक्टर जमीन ही एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 85 टक्के खाजगी वन आहे. कोकण कमिशनर यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात एक समिती नियुक्त करण्यात आली होती. महसूल विभागाने निर्धारित केलेल्या जमिनीच्या बाबतीत वन विभागाने विरोधी केला म्हणून समितीचा याबाबतीत

..2..

(श्री. कर्नल सुधीर सावंत....)

निर्णय होऊ शकला नाही. तेव्हा कोकण कमिशनर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे काय ? असल्यास,त्या अहवालानुसार कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ? तसेच ज्यांच्या जमिनी वनामध्ये गेलेल्या आहेत त्यांना पर्यायी जमीन देण्यात येणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विषय वेगळा आहे. 62 हजार हेक्टरवर वनसंज्ञा लागलेली होती ती 42 हजार हेक्टरवर आणलेली आहे. कमिटी आणि वन खाते यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले होते. सुप्रीम कोर्टामध्ये वन विभागाच्यावतीने ॲफिडेव्हिट दाखल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये खाजगी जमिनीला वनसंज्ञा लागल्यामुळे सुप्रीम कोर्टात जाण्याशिवाय पर्याय नाही. याबाबतीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन मार्ग काढण्याचा शासन जरुर प्रयत्न करील.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये मी सुधारणा करीत आहे. संपूर्ण राज्यामध्ये 62.5 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घेण्यात आलेली आहे आणि त्यापैकी एकटया सिंधुदूर्ग जिल्हयातील 42.5 हजार हेक्टर जमीन आहे. राज्यातील एकंदर 62.5 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली आहे हे मी मुद्दाम नमूद करु इच्छितो. सिंधुदूर्ग या छोटया जिल्हयातील 42.5 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घेण्यात आली त्याला कोणताही आधार नाही. सर्व झाडे वाढलेली आहेत. त्यामध्ये आंबा आहे, काजू आहे आणि इतरही झ ाडे आहेत. संपूर्ण जिल्हयामध्येच ग्रीनरी आहे. या जिल्हयामध्ये शेतकऱ्याला त्याचा स्वत:चा गुरांचा गोठा देखील दुरुस्त करावयाचा असेल तर वनखात्याची परवानगी घ्यावी लागते. स्वत:ची झाडे तोडायची असतील किंवा नवीन झाडे लावावयाची असतील तरी वनखात्याची परवानगी घ्यावी लागते. जमीन शेतकऱ्याची किंवा खाजगी मालकांची आणि ताब्यात मात्र वनखात्याच्या अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. संपूर्ण जिल्हयाला यामुळे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. वन खात्याच्या कोणत्या तरी अधिकाऱ्याने सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केले आणि ही जमीन वनसंज ्ञेमध्ये आणली. खरे पाहता वनखात्याच्या संदर्भात जी केस होती ती उत्तर प्रदेशची होती आणि रेफरन्स मात्र महाराष्ट्र राज्याचा दिला गेला. जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी केवळ 8.5हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घ्यावी असा अहवाल दिला होता. पण प्रत्यक्षात 42.5 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली घेण्यात आली ती मोकळी केली पाहिजे अशी माझी या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जी गोष्ट सांगितली ती खरी आहे. वनखात्याच्या कारभाराचे दु:ख आम्ही विदर्भातील लोक भोगत आहोत. वनखात्याचे अधिकारी शेतकऱ्यांचा सत्यानाश करीत आहेत. पाण्याचा पंप लावायचा असेल,रस्ता असेल इतर कोणतीही गोष्ट करावयाची असेल तर वनखात्याची परवानगी घ्यावी लागते. वनखात्याच्या अधिकाऱ्यांना कायद्याने संरक्षण दिलेले आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील एवढी मोठी जमीन वनसंज्ञेखाली घेण्याआधी माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जी माहिती दिली ती वनखात्याने तपासून घ्यावी. काजूची झाडे असतील,आंब्याची झाडे असतील, रस्ता असेल अशी जमीन वेगळी काढा आणि बाकीची जमीन वनजमीन म्हणून वनखात्याने ताब्यात घ्यावी अन्यथा शेतकऱ्यांचे सगळे जीवन उध्वस्त होईल. वनखात्याने जी अवस्था विदर्भातील शेतकऱ्यांची केली ती निदान कोकणातील शेतकऱ्यांची तरी करु नये अशी माझी विनंती आहे. .....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय वनमंत्री ठाण्याला आले होते त्यावेळी त्यांनी जो आदेश वनखात्याच्या अधिकाऱ्यांना दिला होता त्याचे अजून पालन झालेले नाही. ठाणे जिल्हयामध्ये एक आदिवासी पाडा आहे त्याठिकाणी एखादी व्यक्ती मृत झाली तर त्या व्यक्तीला जाळण्यासाठी स्मशानभूमीच्या बाजूला वनखात्याने भिंत बांधली असल्यामुळे वनखात्याची परवानगी घ्यावी लागते. वनमंत्र्यांनी ठाण्याच्या भेटीच्या वेळी वनखात्याच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले की, स्मशानभूमीमध्ये जाण्यासाठी वाट करुन द्या. परंतु हा आदेश अंमलात आणला गेला नाही. आता या आदिवासी पाड्यातील एखादी व्यक्ती मृत झाली तर त्याचा मृतदेह वनाधिकाऱ्याच्या घरात नेऊन ठेवावा लागेल. पाण्याच्या बाबतीत सोय करुन देण्यासाठी महापालिका खर्च करण्यासाठी तयार आहे परंतु वनखात्यातील अधिकारी जनतेची अडवणूक करीत आहेत. इतकेच नव्हे तर भ्रष्टाचाराच्या बाबतीत या खात्यातील अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा कोणी हात धरणार नाही अशा प्रकारचे त्यांचे वर्तन आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, आपणही आपल्या भागातील प्रश्न उपस्थित केला तसेच सभागृहातील दोन ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या असल्यामुळे या प्रश्नाला आणखी गांभीर्य प्राप्त झालेले आहे. वास्तविक वन संज्ञेखाली सिंधुदुर्ग जिल्हयातील 8000 हेक्टरपेक्षा जास्त जमीन घ्यायला नको होती परंतु सन 1997 मध्ये वन संज्ञा लावण्याची घाई झाली व हा आदेश देण्यासंबंधीचा निर्णय झाला. कुठल्याही प्रकारची वस्तुस्थिती विचारात न घेता जवळजवळ 42000 हेक्टर जमीन या जिल्हयाची वन संज्ञेखाली घेण्यात आली त्यामुळे विकासापासून हा सिंधुदुर्ग जिल्हा वंचित राहिला ही गोष्ट खरी आहे. तसेच पर्यायी जमिनीच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, झुडपी जंगलांची जमीन देण्याच्या बाबतीत निर्णय झाल्यापासून आपल्या राज्यातील 1034 प्रकल्प जे अनेक वर्षांपासून पर्यायी जमिनीविना अडून राहिले होते त्यांना चालना मिळाली. मी वनमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यापासून या अडून राहिलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत केंद्रशासनाकडे पाठपुरावा केला, ज्या प्रकल्पांना पर्यायी जमीन देता येत नाही त्यासंबंधी स्वत: दिल्लीला जाऊन पाठपुरवा केला व त्यानंतर अशी झुडपी जंगले पर्यायी जमीन म्हणून देण्यासाठी केंद्रशासनाने मान्यता दिली त्यामुळे 30 वर्षांपासून प्रलंबित असलेले 750 च्या वर प्रकल्प मार्गी लागले. तसेच माननीय उपसभापती यांनी जो विषय येथे उपस्थित केला ती अत्यंत गंभीर गोष्ट आहे. ही गोष्ट खरी आहे की, वनांच्या आतमध्ये आणि वनांच्या पलिकडे जाता येत नाही आणि तशा प्रकारे जर वन संवर्धन अधिनियम, 1980 चा भंग झाला तर वन अधिकाऱ्यांना सुप्रिम कोर्टाला तोंड द्यावे लागते. प्रत्येक वेळेस त्या अधिकाऱ्यांना दिल्लीला जावे लागते व सुप्रिम कोर्टात हजर रहावे लागते. ही बाब माझ्या लक्षात आल्यानंतर मी स्वत: याबाबतीत पुढाकार घेतला. कारण माझा स्वत:चा चारी क्र. 10 चा मुद्दा याच विषयाशी संबंधित होता. यासंदर्भात केंद्राकडे दोन बैठका झाल्या त्या बैठकांना मी स्वत: हजर राहिलो व अनेक चांगल्या गोष्टी त्या माध्यमातून केंद्रशासनाच्या लक्षात आणून दिल्या. त्या बैठकांमध्ये आम्ही 5 हेक्टरपर्यंत जमीन देण्याचे अधिकार मागितले होते परंतु तेवढी मान्यता केंद्रशासनाने दिली नाही तर 2 हेक्टरची मर्यादा मान्य केली. तसेच 1 हेक्टरपर्यंत जमीन स्मशान भूमी तसेच गावठाण इ. सामाजिक कामासाठी देण्याच्या अधिकाराला देखील त्यांनी मान्यता दिली. अशा प्रकारे महाराष्ट्र शासन एक हेक्टरपर्यंत पर्यायी जमीन देण्यासंबंधी निर्णय घेऊ शकते. यामुळे राज्यातील हजारो प्रकरणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .......

आपण सोडवू शकलो. यामध्ये एकच अडचण आहे की, संबंधित आर.एफ.ओ. आणि डी.एफ.ओ. कडून प्रस्ताव शासनाकडे यावा लागतो. असा प्रस्ताव शासनाला प्राप्त झाल्यानंतर शासनाला त्यासंबंधी ताबडतोब निर्णय घेता येतो. यासाठी माननीय केंद्रिय कृषी मंत्री श्री. शरदराव पवार आणि राज्यातील इतर केंद्रीय मंत्री यांची देखील मदत घेतली. कारण दोन हेक्टरपर्यंत आपल्याला पर्यायी जमीन वन विभागाला देता आली नाही तर आपल्याला आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाईन्स वगैरे टाकता येणार नाहीत. या प्रयत्नांना आपल्याला यश आले असून मागील वर्षापासून आपण हे काम सुरु केलेले आहे. तसेच आपण आपल्या भागातील वन अधिकाऱ्यांच्या संदर्भात सांगितले ती बाब माझ्या लक्षात आली असून संबंधितांवर कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : माझी सूचना अशी आहे की, ठाणे महापालिकेचे आयुक्त यांनी मी मांडलेल्या विषयासंदर्भात जो प्रस्ताव वन विभागाकडे सादर केलेला आहे त्यासंबंधीची माहिती घेऊन आपल्या वन अधिकाऱ्यांना आपल्या दालनात बोलवावे व त्यासंबंधीची माहिती मला द्यावी. या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा प्रश्न सोडवावा. कारण खरोखरच ही अत्यंत गंभीर बाब आहे. गेल्या दीड वर्षापूर्वी मी हा मुद्दा आपल्या उपस्थितीत मांडला होता व त्यावेळी आपल्या वन अधिकाऱ्यांनी मानाही डोलावल्या होत्या परंतु आपली पाठ फिरल्यानंतर त्यांनी जे करायचे होते तेच केले. म्हणून येत्या सोमवारी आपण या विषयाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन तसे आदेश द्यावेत.

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सिंधुदुर्ग जिल्हयासंबंधीचा जो मुद्दा उपस्थित केला त्यासंबंधी आपण अंतिम निर्णय घेऊन टाकला की काय ? हे मला माहिती नाही, परंतु तसा निर्णय सभागृहात जाहीर करण्याची संधी आपल्याला प्राप्त झालेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने राज्यातील सर्वात चांगला जिल्हा आहे. गोव्यापेक्षाही सुंदर समुद्र किनारा या जिल्हयाला लाभलेला आहे. या जिल्हयात जर एअरपोर्ट झाले तर करोडो रुपये आपल्याला पर्यटनाच्या माध्यमातून महसुलापोटी मिळतील. परंतु या जिल्हयात वन जमिनीचे प्रमाण जास्त असल्यामुळे आवश्यक त्या सुविधा निर्माण करता येणार नाहीत, हॉटेल्स बांधता येणार नाहीत, पाईपलाईन्स टाकता येणार नाहीत. यासंदर्भात काही तरी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये शासनाची जमीन नाही. सावंतवाडी येथे फक्त शासनाच्या मालकीची जमीन आहे. जवळ जवळ 42 हेक्टर इतके खाजगी वन आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला वाटते की, यास मंत्रिमहोदयांनी स्थगिती द्यावी. 5 ते 8 हेक्टरपर्यंतची मर्यादा योग्य आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये इको टुरिझम, इको फॉरेस्टसाठी चांगली जमीन, चांगले वातावरण फक्त सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये आहे. मी त्या जिल्हयाचा संपर्कमंत्री आहे. असे असताना देखील काही करू शकत नाही. महाराष्ट्र राज्याचे माननीय महसूल मंत्री देखील सिंधुदुर्ग जिल्हयातील आहेत. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी देखील सिंधुदुर्ग जिल्हयातील आहेत.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, येथे फक्त अधिकाराचा प्रश्न आहे. केंद्र शासनाचा वन (संवर्धन) अधिनियम 1980 हा कायदा श्री.शेषन साहेबांनी तयार केला आहे. एक प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले होते. त्यावेळी श्री.ग्रीन हे जज् होते. म्हणून हा कायदा बनविला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी हा कायदा बनविला आहे, त्यांच्या डोक्याला दाब दिला पाहिजे. माझी विनंती आहे की, यासंबंधी आपण निर्णय घ्यावा. ज्यावेळी आपले प्रकरण कोर्टात जाईल तेव्हा सभागृहाच्या भावना सुप्रीम कोर्टाला, हायकोर्टाला कळवाव्यात. विद्यमान कायद्यामुळे गरीब माणसाचे खूप हाल होतात. मी आपल्याला मेळघाटचे उदाहरण देतो. मेळघाट येथे कायद्याचे उल्लंघन केले म्हणून माझ्यावर कोर्टात केस दाखल करण्यात आली. आम्ही तेथे लाईन टाकली. पण 1980 च्या कायद्याचे बंधन आले. या कायद्यामुळे मेळघाटातील लोक गुलामगीरीपेक्षा बत्तर जीवन जगत आहेत. 1980 चा केंद्राचा कायदा आहे. त्यामुळे त्यातील बरेचसे अधिकार हे केंद्र सरकारकडे गेले आहेत. तेव्हा आपण सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची कमिटी नेमावी. वाटल्यास, यामध्ये लोकप्रतिनिधींची देखील नियुक्ती देखील करावी. आपण जर मनात आणले तरच असे होऊ शकेल. जंगल वाचविले पाहिजे, पर्यावरण टिकविले पाहिजे या मताचे आम्ही देखील आहोत. म्हणून माझी विनंती आहे की, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन जो निर्णय झाला आहे, त्याला स्थगिती द्यावी व यासंबंधी पुन्हा तपासणी शासन करणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी ज्या केसचा संदर्भ सांगितला आहे, तो उत्तर प्रदेशातील आहे. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी देखील काही सूचना केल्या आहेत. त्यामुळे शासनाने घाबरण्याचे काहीच कारण नाही. संपूर्ण सभागृहाच्या भावना आपण त्यांना कळवाव्यात. इको टुरिझम, इको फॉरेस्टच्या नावाखाली आता आपण शेवटी टेंटवर येत आहोत. अशाने मग तिथला कसा विकास होणार ? तेव्हा अतिशय प्राधान्य देऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, वन हे आता वरदान न ठरता शाप झाले आहे. विदर्भात देखील झुडपी जंगलांचा प्रश्न फार मोठा आहे. या सर्व प्रश्नासंबंधी अभ्यास करण्याची अत्यंता आवश्यकता होती. या प्रश्नासंबंधी खालच्या व आपल्या सभागृहामध्ये एकमत आहे. या प्रश्नासंबंधी पुन्हा सर्वे करावा, कमिटी नियुक्ती करावी करावी अशी मागणी करण्यात आलेली आहे. तिचा जरूर विचार केला जाईल. जमिनीचे क्षेत्र कमी करण्यासाठी अभ्यासगट नेमावा लागेल. शेवटी आपल्याला सुप्रीम कोर्टात गेल्याशिवाय पर्याय नाही. यासाठी आपल्याला पुढे हे जावेच लागणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या राज्याला स्वत:चा कायदा तयार करून निर्णय बदलता येऊ शकेल. स्वर्गीय राजीव गांधी यांनी शहाबानू प्रकरणातील सुप्रीम कोर्टाचा निर्णय बदलविण्यासाठी मूळ कायद्यामध्येच सुधारणा केली. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे कायदा बदलण्यासंबंधीची शिफारस करावी.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 17:20

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

श्री.नितीन गडकरी....

कारण कोर्ट हे उच्च आहे. कोर्टाचा मान ठेवणे आवश्यक आहे. परंतु दुसऱ्या बाजूला गरीबांना चिरडून टाकता कामा नये.

कर्नल सुधीर सावंत : महोदया, मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या संदर्भात एक कमिटी नेमण्यात आली होती. परंतु त्यामध्ये महसूल आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये डिस्प्युट निर्माण झाले. ही कमिटी नेमून सात वर्षे झालेली आहेत. दोन विभागांमध्ये डिस्प्युट असल्यामुळेच शासन सुप्रीम कोर्टामध्ये जात नाही. विभागाकडून चुकीचे काम झाले हे सिध्द होईल म्हणून वन विभागाचे अधिकारी ॲफेडेव्हिट करीत नाहीत. त्यामुळेच वन विभागाचे अधिकारी महसूल विभागाने केलेला अहवाल मान्य करीत नाहीत. महोदया, आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्यानंतर, त्या बाबत जो अहवाल आलेला आहे तो शासनाने स्वीकारलेला नाही. शिवाय शासन सुप्रीम कोर्टामध्ये देखील जात नाही. त्यामुळे माझी मागणी आहे की, शासनाने यावर योग्य ती कार्यवाही करुन, सुप्रीम कोर्टामध्ये ॲफेडेव्हिट सादर करावे.

श्री.बबनराव पाचपुते : महोदया, हा खाजगी वन जमिनीबाबतचा प्रश्न होता. परंतु या विषयाला साईडट्रॅक केले जात आहे. वास्तविक पाहता कोणताही कायदा आपण जनतेच्या हितासाठी करीत असतो. परंतु या कायद्यान्वये या ठिकाणी अन्याय झाला हे खरे आहे. 1997 साली अधिकाऱ्यांनी चुकीचे केले ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. परंतु या विषयी समिती नेमून, समितीने रिपोर्ट देण्याबाबत दोन विभागामध्ये आपापसात मतभेद होते हे योग्य नाही. या विषयाबाबत नेमकी भूमिका स्वीकारण्यात आली नाही. परंतु सदनातील सन्माननीय सदस्य, माननीय विरोधी पक्षनेते आणि लोकनियुक्त सदस्यांची समिती अधिवेशनापूर्वी करण्यात येईल. त्यामध्ये सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सुध्दा समावेश करु. अगोदरच्या समितीचा अहवाल आलेला आहे, त्या विषयी जर काही करावयाचे ठरले तर तत्कालीन अधिकाऱ्यांसमोर अडचण निर्माण होईल. या विषयी शासन सुप्रीम कोर्टात जाईल. सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास याबाबतची वस्तुस्थिती आणून दिली तर ते सुध्दा सहमत होतील. सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, गुरुनाथ कुलकर्णी, कर्नल सुधीर सावंत यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन, हा विषय कसा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

हाताळता येईल याबाबत शासनाकडून प्रयत्न करण्यात येतील. एकत्रितपणे बसून, या विषयी सुप्रीम कोर्टामध्ये ॲफेडेव्हिट दाखल करुन, लोकांच्या दृष्टीकोनातून सकारात्मक निर्णय कसा घेतला जाईल याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, या प्रश्नाची व्याप्ती मोठी असल्यामुळे आम्ही लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित केला होता. सिंधुदूर्ग, विदर्भ येथील प्रश्नांबाबत माननीय मंत्री महोदयांनी योग्य प्रकारची उत्तरे दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. या विषयी शासन सुप्रीम कोर्टामध्ये जाईल तेव्हा जाईल. त्यामुळे या कामामध्ये सर्वपक्षीय सदस्यांना विश्वासात घेत असताना, पावसाळयामध्ये शेतकऱ्यांना नोटीसा देऊन त्यांचेवर दबाव आणून, वन विभागाचे अधिकारी त्यांना त्रास देणार नाही, याबाबतचा दिलासा माननीय मंत्री महोदय ताबडतोब देतील काय ? तसेच शेतकऱ्यांच्या संदर्भात 1 हेक्टरची डिस्क्रीएशन पॉवर्स वापरण्याबाबत माननीय मंत्री महोदय प्रयत्न करतील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सुचविले त्यानुसार तातडीने निर्णय घेता येणार नाही. उच्च न्यायालयाने महसूल विभागाकडे ही जबाबदारी दिली आहे. 21 तारखेपर्यंत हा रिपोर्ट त्यांना सादर करावयाचा आहे. उच्च न्यायालय आम्हाला जे आदेश देईल त्यानुसार आम्हाला काम करावे लागेल. त्या दरम्यान जनतेच्या/शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीकोनातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे 24(2) ला सुधारणा केली आणि ती सुधारणा लवकरात लवकर कॅबिनेटमध्ये दुरुस्त करुन, त्याबाबत सुप्रीम कोर्टामधून परवानगी आणली तर लवकर काम होऊ शकते. त्या दृष्टीने शासनाची पूर्ण तयारी झाली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

**पृ.शी.** : निवृत्त उपजिल्हाधिकाऱ्याला निवाड्याची नक्कल मिळविण्यासाठी करावी लागणारी प्रतीक्षा

**मु.शी.**: निवृत्त उपजिल्हाधिकाऱ्याला निवाड्याची नक्कल मिळविण्यासाठी करावी लागणारी प्रतीक्षा याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखांसंबंधीची सूचना मांडतो.

" प्रशासकीय लालफितीच्या अनेक सुरस कथा सामान्यांना अनुभवायला मिळतात. त्यापैकी एक अनुभव एका निवृत्त उपजिल्हाधिकाऱ्यांनाही येत आहे. वडिलोपार्जित जमिनीतील आंब्याच्या झाडाच्या निवाड्याची नक्कल मिळविण्यासाठी ते गेली दहा वर्षे पाठपुरावा करीत आहेत. नक्कल मिळत नसल्याने जमिनीची विक्री करता येत नाही आणि नक्कल उपलब्ध नसल्याचे अधिकृत उत्तरही मिळत नाही. त्यामुळे सामान्यांप्रमाणे हेलपाटे घालण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

महसूल खात्यात कारकून म्हणून नोकरीला लागलेले गोपाळराव पाटील उपजिल्हाधिकारी पदावरुन निवृत्त झाले. सध्या नाशिकला राहणारे श्री. पाटील यांची पाळे खुर्द ( ता. कळवण ) येथे शेती ( सर्व्हे क्रमांक 28 ) आहे. त्यांच्या शेजारच्या सर्व्हे क्रमांक 27 या शेताच्या सामाईक बांधावर एकच बुंधा असलेली दोन झाडे आहेत. त्यातील आंब्याचे झाड श्री. पाटील यांच्या पूर्वजांनी मूळ मालक उपनाथ पाठक यांच्याकडून 40 रुपयांना खरेदी केले आहे. त्याची सातबारा उताऱ्यावर "ड" नोंदही झाली. सन 1926, 1927 व 1928 मध्येही ही नोंद आढळते. मात्र, सन 1973 मध्ये त्याबाबत वाद झाला व हे झाड आमचे असल्याचा दावा त्यांच्या शेजाऱ्यांनी कळवण न्यायालयात केला. सन 1978 मध्ये तो फेटाळण्यात आल्याचे त्यांचे वकील डी.झेड.पाटील यांनी त्यांना पत्राने

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

कळविले. आता गोपाळराव पाटील यांना बांधावरच्या झाडाच्या शेतातील फांदीसह जमीन विकायची आहे. मात्र, फांदी कोणाची याबाबत निवाड्याची प्रत आवश्यक आहे. त्यांनी त्यासाठी दहा रुपये अनामत रक्कम भरुन दिनांक 3 जून, 1996 ला अर्ज केला. मात्र, अनेकदा पाठपुरावा करुनही त्यांना अद्याप नक्कल मिळालेली नाही. त्यांचे वय सत्तरच्या पुढे आहे.

स्वत:च्या कार्यकाळात शिस्त व नियमांचे काटेकोर पालन करणारे श्री. पाटील यांना स्वत:लाच लालफितीचा अनुभव आल्याने मनातील भावना कशी व्यक्त करावी, हे देखील सुचत नाही. त्यांनी नुकताच आणखी एक अर्ज दिला आहे. मात्र, शेतातील आंब्याची फांदी कोणाची या विषयीच्या निवाड्याची नक्कल त्यांना मिळत नाही. जिल्हा कार्यालयात दाद मागूनही उपयोग झालेला नाही. त्यामुळे आता थेट उच्च न्यायालयातच दाद मागण्याचा त्यांचा विचार आहे. झाड शंभर वर्षांपूर्वीचे, दावा 25-30 वर्षांपूर्वीचा, अर्जदार 70 वर्षांचे आणि नक्कलेसाठी प्रतीक्षा दहा वर्षे .... हा एका निवृत्त उपजिल्हाधिकाऱ्याला येणारा अनुभव महसूल खात्यातील कारभाराबद्दल न बोलताही बरेच भाष्य करुन जातो. सभापती महोदया, अशाप्रकारे मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. तरी, या संदर्भात शासनाने डोळ्यांत अंजन घालून लक्ष द्यावे. संबंधित माननीय मंत्री महोदय या गोष्टीची दखल घेतील व संबंधिताला न्याय देतील, असे मानतो. धन्यवाद !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत शासनाने केलेल्या तरतुदीमुळे मागासवर्गीय समाजाचा होत असणारा तोटा

**मु.शी.**: सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत शासनाने केलेल्या तरतुदीमुळे मागासवर्गीय समाजाचा होत असणारा तोटा याबाबत सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखांसंबंधीची सूचना मांडतो.

" राज्यात विशेषत: मुंबईत व राज्यातील प्रमुख शहरांमध्ये निवासाच्या सोयीसुविधा पुरविण्याच्या दृष्टीने स्थापन होणाऱ्या व करण्यात येणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासन काही विशिष्ट अटी व शर्तीवर भूखंड उपलब्ध करुन देते असे भूखंड उपलब्ध करुन देत असताना त्या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या एकूण सदनिका अथवा जागांपैकी 20 टक्के जागा विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींसाठी (SC, ST & NT) देण्याबाबतचा दिनांक 7 जुलै, 1999 चा असलेला शासन निर्णय, या शासन निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात येणाऱ्या एकूण जागेच्या 20 टक्के जागा SC, ST & NT साठी देण्याचे सक्तीचे असणे तसेच या जागांच्या हस्तांतराबाबत विक्रीसंदर्भात शासनाचे 5 वर्षे, 10 वर्षे व 15 वर्षांच्या कालावधीचे स्लॅब निश्चित असून हस्तांतराची फी सुध्दा ठरलेली असणे. परंतु शासनाने केलेल्या या तरतुदीचा मागासवर्गीय समाजाला होत असलेला आर्थिक तोटा, सदरहू जागा अथवा सदनिका हस्तांतरित करावयाची अथवा विकायची झाल्यास ती मागासवर्गीय म्हणजे SC, ST अथवा NT समाजातील विकण्याची असलेली सक्ती, त्यामुळे अशा जागा अथवा सदनिकांची त्याच संवर्गातील खरेदीदार न मिळाल्यामुळे विक्री करता न येणे व अशा जागांच्या विक्रीमध्ये असलेल्या अनंत अडचणी, एखाद्या जागेला त्याच संवर्गातील खरेदीवर मिळाल्यास तो बाजार मुल्यापेक्षा त्या जागेची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ....

किंमत कमी सांगत असल्यामुळे कमी किंमतीला जागा विकावी लागणे. परिणामी मूळ मागासवर्गीय मालकाला तोटा सहन करावा लागणे. शासनाच्या या चूकीच्या निर्णयामुळे मागासवर्गीयांवर होत असलेला अन्याय व तोटा सबब अशा जागा अथवा सदनिका विक्री करणाऱ्या SC, ST अथवा NT च्या सदनिकाधारकांना त्यांच्या जागा कोणालाही विकण्याची मुभा देण्याची आवश्यकता व त्याप्रमाणे दिनांक 7 जुलै, 1999 च्या शासन निर्णयात बदल करण्याची आवश्यकता. शासनाने असा बदल केल्यास मागासवर्गीय समाजाचा सदनिकाधारक स्वत:ची जागा इतरांप्रमाणे कोणालही विक्री करु शकेल व त्यायोगे त्याला त्या जागोचा योग्य मोबदला प्राप्त होऊ शकेल व त्या अनुषंगाने त्याचा तोटा व अन्याय होणार नाही. सबब शासनाने वरीलप्रमाणे शासन निर्णयात बदल करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. आपण मला विशेष उल्लेख मांडू दिल्याबद्दल धन्यवाद ! "

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

सभापती महोदय, हा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी एक वर्षापूर्वी मांडलेला होता. विशेष उल्लेखास नियमाप्रमाणे माननीय मंत्री महोदयांकडून 30 दिवसांच्या आत उत्तर येणे अपेक्षित असते. SC, ST व NT यांना सदनिका देतांना जो निर्णय घेतलेला आहे त्यामुळे मागासवर्गीयावर अन्याय होत आहे. मागासवर्गीयानी घेतलेली सदनिका त्याला दुसऱ्याला विकता येत नाही त्यांना ती सदनिका मागासवर्गीय व्यक्तीसच विकावी लागते, त्यामुळे त्यांच्या सदनिकेची किंमत 50 ते 60 टक्केच मिळते. त्यामुळे त्यांच्यावर मोठया प्रमाणात अन्याय होत आहे. इतर लोकांना मात्र हा निर्णय लागू नाही. म्हणून SC,ST व NT यांची जी सदनिका आहे ती इतर लोकांना सुध्दा विकण्याची परवानगी देण्यात यावी. याबाबत मी एक वर्षापूर्वी सुध्दा विशेष उल्लेख मांडलेला आहे, याबाबत शासनाने तातडीने 30 दिवसांच्या आत निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

------

.......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अमरावती विभागातील माध्यमिक शाळांची काढून घेतलेली मान्यता पूर्ववत करणे

**मु.शी.**: अमरावती विभागातील माध्यमिक शाळांची काढून घेतलेली मान्यता पूर्ववत करणे याबाबत श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" अमरावती विभागातील माध्यमिक शाळांच्या काढून घेतलेल्या मान्यता पूर्ववत करण्याबाबत, अमरावती विभागातील यवतमाळ जिल्हयातील सोनमाता विद्यालय, चहांद राळेगांव, सम्यक विद्यालय, उमरसरा, आदर्श हायस्कूल, साखरदरा ता. वणी, भगवानदास कोठारी माध्यमिक विद्यालय अर्जुना, माध्यमिक कन्या शाळा, वडकी, ता. राळेगांव, मराठी माध्यमिक शाळा डोरली, तसेच वाशिम जिल्हयातील नॅशनल उर्द हायस्कूल, धनज ता. कारंजा, अन्वर उर्दु हायस्कूल कामरगांव ता. कारंजा, रेखाताई राष्ट्रीय कन्या शाळा, वाशिम, महात्मा फुले विद्यालय, मालेगांव, जिजामाता माध्यमिक कन्या विद्यालय, मालेगांव, तसेच आनंदा माध्यमिक विद्यालय, राधानगर, अमरावती, अबु वकार सिद्दिकी उर्दु हायस्कूल बाळापूर, जिल्हा अकोला एवढया शाळांच्या मान्यता शाळा संहिता, नियम क्र.7:4 अन्वये मिळालेल्या अधिकारानुसार शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्या मार्च, 2006 मधील वेगवेगळया दिनाकांच्या पत्रानुसार काढण्यात आली आहे. उपरोक्त सर्व शाळांमधील शिक्षक व कर्मचारी मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित शाळांमधील सवेत कायम झालेले आहेत. शिक्षण उपसंचालक यांच्या पत्रानुसार दर्शविलेल्या त्रुटींमध्ये या संदर्भात शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष संबंध येत नाही.

.....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे....

शिक्षण उपसंचालक यांनी दर्शविलेल्या त्रुटींची उपरोक्त सर्व शाळांनी पूर्तता केलेली आहे. या संबंधी शिक्षण उपसंचालकांना सुनावणीच्या वेळी सर्व कागदपत्रे सादर केली आहे. उपरोक्त शाळांमधील सर्व कर्मचारी कायम स्वरुपाचे असल्याने व त्यांची मान्यता काढल्याने सर्व कर्मचाऱ्यांची कुटुंबे उद्‌ध्वस्त होईल. म्हणून अशा सर्व कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने उपरोक्त शाळांना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी किमान दोन वर्षाची संधी द्यावी किंवा सर्व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरवून इतरत्र समायोजन करावे, याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

------

.......4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई येथील टोलेजंग इमारतीमध्ये वाढत चाललेला कांचाचा वापर

**मु.शी.**: मुंबई येथील टोलेजंग इमारतीमध्ये वाढत चाललेला कांचाचा वापर याबाबत श्री. संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मुंबई येथे आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या मुंबईतील टोलेजंग बिल्डिंगमध्ये चकाचक लुक देण्यासाठी काचांचा वापर करण्याचे प्रमाण वाढते आहे, मुंबईचे तापमान पाहता येथे काचांचा वापर करणे धोकादायक आहे, अग्निशामक दलांनी यापूर्वी अनेक धोक्याकडे लक्ष वेधूनही त्याची दखल महापालिकेने घेतली नाही असे दिसून येते, काचांचा सर्वात मोठा धोका असतो तो आपत्तीच्या वेळी दुर्धटना घडल्यास या काचांच्या माऱ्याने माणसांना इजा होण्याची शक्यता असते. काचेमुळे आग पसरण्याचा धोकाही अधिक असतो. ग्लासचा वापर करुन उभारण्यात आलेल्या इमारती दिसायला सुंदर असल्या तरी धोकाही तितकाच आहे. तरी सदरचा धोका धुडकावून आगामी काळात आणखी तीन हजार बिल्डिंगमध्ये काचेच्या भिंती उभारण्यास तयार आहेत, या महत्वाच्या प्रश्नाबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना सभागृहात मांडत आहे.

-------

यानंतर श्री. सांगळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण, रौप्य व कास्य पदक मिळालेल्या खेळाडूंची दखल घेणे.

**मु.शी.**: राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण, रौप्य व कास्य पदक मिळालेल्या खेळाडूंची दखल घेणे याबाबत माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मुझफ्फर हुसेन ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मेलबर्न येथे नुकत्याच पार पडलेल्या कॉमनवेल्थ गेममध्ये पदक पटकावणाऱ्या खेळांडूवर कौतुक आणि सत्कारांचा वर्षाव होत असताना दुसरीकडे या स्पर्धेत रौप्यपदक मिळवणाऱ्या राष्ट्रीय विजेत्या वेटलिफ्टर सिंपल कौर भुमराच्या नशिबी उपेक्षाच आली आहे. तीला शासनामार्फत कोणतीच मदत न मिळाल्याने सुवर्ण पदकांपासून वंचित राहिली असे तिचे पालक व प्रशिक्षकांची तक्रार आहे. राष्ट्रीय विजेता सिंपल कौर ही ठाणे जिल्हयातील मिरा - भाईंदर येथील काशिमीरा भागातील वडिलांच्या छोट्याश्या दहा बाय दहाच्या पंजाबी धाब्याजवळील वर्कशॉपमध्ये लाकडी प्लॅटफॉर्मवर सिंपल कौर हिने सराव करुन रौप्य पदक मिळविले व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये अनेक पदके मिळविलेली आहेत. महाराष्ट्रात असे अनेक खेळाडू आहेत की, त्यांनी राष्ट्रीय पातळीवर सुर्वण, रौप्य व कास्य पदके मिळविलेली आहेत. परंतु शासनाने त्यांची दखल न घेतल्यामुळे ते आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विश्वविक्रम करु शकले नाहीत. तसेच महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हयातील कु.तेजस्वीनी सावंत व मिरा - भाईंदर येथील सिंपल कौर या सारख्या खेळाडूंना शासनामार्फत जर राहण्यासाठी जागा, प्रशिक्षण व खेळांना लागणाऱ्या सोयी उपलब्ध करुन दिल्या तर महाराष्ट्रातील अनेक खेळाडू पुढे येऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे नाव गाजवतील. कु. सिंपल कौर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन ....

भुमरा यांनी कॉमनवेल्थ गेममध्ये वेटलिफ्टींगमध्ये रौप्यपदक पटकाविले आहे. म्हणून शासनाने या बाबतीत योग्य निर्णय घेऊन कु. सिंपल कौर यांचा सुध्दा गौरव करुन योग्य मान द्यावा, अशी विनंती मी शासनास या विशेष उल्लेखाद्वारे सूचित करीत आहे.

तसेच मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी आपल्या विशेष उल्लेखामध्ये ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सुध्दा याच विशेष उल्लेखाच्या संबंधित आहेत.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे

**L.A. BILL NO. XXVIII OF 2006.**

**(A BILL TO REGULARISE UNAUTHORISED DEVELOPMENTS IN THE CITY OF ULHASNAGAR AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)**

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदया, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 28 -उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 28 - उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, या ठिकाणी हे विधेयक मांडत असताना त्याबाबत थोडीशी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. उल्हासनगर हे मूळत: सन 1942 मधील ब्रिटीशांच्या काळातील आहे. दुस-या जागतिक महायुध्दानंतर 6000 ब्रिटीश सैनिकांना राहण्यासाठी या ठिकाणी ब्रिटीशांनी 1173 बॅरेकस् बांधले होते. परंतु भारत पाकिस्तानच्या फाळणी झाल्यानंतर पश्चिम पाकिस्तानमधून 94000 विस्थापित लोक आले होते. या लोकांसाठी 1173 बॅरेक्समध्ये व्यवस्था करण्यात आली होती. परंतु एवढया बॅरेक्यमध्ये 94000 लोक राहू शकत नाहीत, म्हणून तेथे असलेल्या खुल्या जमिनी ताब्यात घेऊन हे लोक राहू लागले. सन 1960 साली उल्हानगर नगरपालिका अस्तित्वात आली. तसेच 1974 पासून डी.सी.आर. लागू झाला. तसेच आपण नेहमीच दाट वस्तीमध्ये दोन एफएसआय दिलेले आहेत. परंतु उल्हासनगरच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास या ठिकाणी फक्त एकच एफएसआय देण्यात आला होता. आजची परिस्थिती पाहिली तर त्या ठिकाणी साधारणपणे 4,73,000 एवढी लोकसंख्या आहे. हे सर्व लोक 7 चौरस कि.मि.मध्ये राहतात. साधारणपणे प्लॅनिंगचे स्टँडर्ड नॉम्स पाहिले तर ....

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे ....

दर हेक्टरी 250 लोक असावे असे निकष आहेत. परंतु आज उल्हासनगरमध्ये दर हेक्टरी 700 च्या वर लोक राहताहेत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ... सभापती महोदय, मी येथे उल्हासनगरचा इतिहास सांगतो आहे ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय राज्यमंत्री येथे इतिहास सांगत आहेत हे खरे पण त्यांनी ब्रिटीश काळापासून इतिहास सांगण्यास सुरूवात केली आणि एकदम दोन मिनिटांमध्येच ते 1960 सालापर्यंत आले. तेव्हा त्यांनी इतिहास सांगताना तो नीट सांगावा अशी माझ ी त्यांना विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आज तेथे काय परिस्थिती आहे तेही मी सांगतो आहे. तेथे अफाट लोकसंख्या आणि मर्यादित एफएसआय असल्यामुळे या विधेयकाच्या उद्देशामध्ये देखील आपण म्हटले आहे की, ".... अफाट वाढलेली लोकसंख्या आणि मर्यादित तलपृष्ठ निर्देशांक असलेले मर्यादित क्षेत्र, लोभी व विधिनिषेधशून्य बांधकाम व्यवसायी त्याचप्रमाणे निष्काळजी स्थानिक प्रशासन यांच्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे केली गेली आहेत. .." म्हणजे आम्ही या विधेयकाच्या उद्देशामध्ये हे मान्य केलेले आहे की, निष्काळजी स्थानिक प्रशासन देखील या परिस्थितीला कारणीभूत आहे. तेव्हा हा मुद्दा आपण येथे निश्चितपणे मान्य केलेला आहे. तेव्हा तेथे झालेल्या या बेकायदेशीर बांधकामाबाबत हायकोर्टाने 2003 मध्ये निर्णय दिला की, तेथील 855 बेकायदा इमारती तोडण्यात याव्यात. त्याप्रमाणे या इमारती तोडण्याची प्रक्रिया महापालिकेच्या वतीने तेथे सुरू झाली तेव्हा तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. सभापती महोदया, याच सभागृहामध्ये नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये या संबंधात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली होती तेव्हा सर्व सभागृहाचे मत व्यक्त झाले होते की, या संबंधात शासनाने काही तरी तोडगा काढावा. हिवाळी अधिवेशनानंतर शासनाच्या वतीने देखील उत्तर दिले होते की, यावर निश्चितपणे तोडगा काढला जाईल आणि हे सारे लक्षात घेऊन 14.1.2006 ला अशा प्रकारचा अध्यादेश प्रख्यापित करण्यात आलेला आहे. सभापती महोदया, मी या ठिकाणी हेही सांगू इच्छितो की, या अध्यादेशाला किंवा या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली होती आणि त्यामध्ये काही महत्त्वाचे मुद्दे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब जे सांगत होते त्या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन जी डेसिग्नेटेड ॲथॉरिटी आहे तिने ज्यांनी ज्यांनी या बेकायदा बांधकामांमध्ये सहभाग

..... एसएस 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

घेतला त्यांना हुडकून काढून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे असाही निर्णय आपण घेतला तसेच जे अधिकारी आणि पदाधिकारी या बेकायदा बांधकामांसाठी जबाबदार आहेत त्यांच्यावर देखील निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे असाही निर्णय आपण घेतला आहे. तेव्हा उल्हासनगर मधील बेकायदेशीर बांधकामे नियमाधीन करताना एमएमआरडीए प्रमाणे तेथे विकास घडवून आणण्याचा निर्णय देखील मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आला आहे. तेव्हा तेथे सुनियोजित विस्तार आणि विकास करण्याच्या दृष्टीने आपण निर्णय घेतला असून त्याप्रमाणे पावले टाकण्यात येणार आहेत. व त्यासाठी 1.1.2005 ही कट ऑफ डेट निश्चित करून तेथ पर्यंतची जेवढी बेकायदेशीर बांधकामे आहेत ती कंपौंडींग चार्जेस घेऊन नियमाधीन करावीत अशी तरतूद यामध्ये आपण केलेली आहे. सभापती महोदया, या ठिकाणी अनधिकृत बांधकामे आहेत ती एकाच प्रकारची आहेत असे नाही तर अनेक प्रकारची आहेत. कोठे सामासिक अंतर सोडलेले नाही, तर कोठे आरक्षित जमिनीवर बांधकाम केलेले असेल अशा या सगळ्या गोष्टींसाठी वेगवेगळे प्रशमन शुल्क लावण्यात आलेले आहे. तेथे जे जे काही अनधिकृत बांधकाम असेल नियमित व नियमाधीन करण्यासाठी सेक्शन 3 च्या माध्यमातून तरतूद करण्यात आलेली आहे आणि 90 दिवसांमध्ये या सगळ्या अनधिकृत बांधकाम केलेल्या लोकांना नोटीसा देऊन त्यांना नियमाधीन करण्याचे काम या ऑथॉरिटीने करण्याची आवश्यकता आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

आणि त्यामुळे अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाली ती लक्षात घेऊन कंपाऊंडींग चार्जेसच्या माध्यमातून गोळा होणाऱ्या पैश्याच्या माध्यमातून तेथील भागाचा विकास व्हावा अशाप्रकारची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. आणि म्हणून या विधेयकामध्ये असलेल्या तरतुदी आणि हे विधेयक आणण्यामागील पार्श्वभूमी, इतिहास थोडक्यात या ठिकाणी सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. मानवतेच्या दृष्टीकोनातून निर्णय घेतांना हे विधेयक प्रिसिडंट किंवा सर्वदूर अशाप्रकारचा कायदा होऊ शकणार नाही, हा कायदा दुसऱ्या शहरांना लागू शकणार नाही. हा कायदा करणे ही शासनाच्या दृष्टीने निश्चितपणे भूषणावह बाब नाही हे मी मान्य करतो. परंतु त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेची स्थिती निर्माण झाल्यामुळे त्या परिस्थितीमधून मार्ग काढण्याकरीता मानवतेच्या दृष्टीकोनातून सहानुभूतीपूर्वक काही निर्णय घेणे अपेक्षित होते. अशाप्रकारचा कायदा गुजरात सरकारने देखील आणला होता, त्याचा आधार घेऊन या गोष्टी कुठेतरी नियमाधीन करण्याची आवश्यकता असल्यामुळे हे विधेयक सभागृहापुढे आणले आहे. सभागृहाने त्याला मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये वन विभागाच्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये वन संज्ञेखाली नागपूर व सिंधुदुर्ग जिल्हयातील साडे त्रेचाळीस हजार हेक्टर जमीन गेली आहे. याबाबत माननीय वन मंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सर्वपक्षिय समिती गठीत करण्यात येईल आणि येत्या तीन महिन्यामध्ये हा संपूर्ण प्रश्न सोडविण्यात येईल. मंत्रिमहोदयांनी यासंबंधीची भूमिका सभागृहामध्ये मांडली असल्यामुळे मला त्यांना यासंबंधी एकच विनंती करावयाची आहे की, यासंबंधी एक छोटीशी समिती निर्माण करुन तीन महिन्यामध्ये हा प्रश्न सोडविण्यासाठी नियोजन करण्याची त्यांची तयारी आहे काय?

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. हा प्रश्न सोडविण्याची शासनाची तयारी असल्यामुळे माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करुन त्यामध्ये वनमंत्री श्री.बबनराव पाचपुते, त्याचबरोबर माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, सुधीर सावंत, नितीन गडकरी, अरविंद सावंत, जयंत प्रभाकर पाटील. तसेच, चिफ कॉझर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, नागपूर, प्रधान सचिव, महसूल, प्रधान सचिव, वन हे अधिकारी या समितीमध्ये असतील. या समितीने तीन महिन्यामध्ये कशाप्रकारे काम करावयाचे आहे...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना ज्या माननीय सदस्यांनी दिली आहे त्यांच्यापैकी एकाही माननीय सदस्यांचे नाव या जाहीर करण्यात आलेल्या समितीमध्ये नाही.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, त्या त्या पक्षाच्या गटप्रमुखांना विचारुन त्यांनी दिलेली नावे घेतली आहेत. तरीसुध्दा यामध्ये आपल्याला बदल करावयाचा असेल तर करता येईल..

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : यासंबंधी गट प्रमुखांना विचारुन नावे बदलता येऊ शकतात...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमच्या पक्षातर्फे श्री. अरविंद सावंत यांचे नाव देण्यात आले होते. त्याऐवजी श्री. अनंत तरे यांचे नाव समाविष्ट करण्यात यावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ठीक आहे. या समितीने कशाप्रकारे काम करावयाचे आहे, याचे नियोजन तयार केले जाईल आणि तीन महिन्यामध्ये हा विषय संपविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये समिती करण्यासंबंधी मांडण्यात आलेल्या सूचनेवर मंत्रिमहोदयांनी तात्काळ निर्णय घेऊन समिती निर्माण करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधीन करणे विधेयक.

**L.A.BILL NO. XXVIII OF 2006.**

**(A BILL TO REGULARISE UNAUTHORISED DEVELOPMENTS IN THE CITY OF ULHASNAGAR AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO)**

(चर्चा पुढे सुरु.......

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदया, उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमाधीन करण्याबाबतचे विधेयक मांडलेले आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदया, खरे म्हणजे जी परिस्थिती निर्माण झालेली होती, त्या संदर्भात डिसेंबर 2005 च्या नागपूर येथील अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना चर्चेला आलेली होती. त्या संदर्भाने सभागृहाने गंभीरता घेऊन निर्देश दिलेले होते. त्याप्रमाणे राज्य शासनाने अध्यादेश काढला आणि त्यास हायकोर्टाने देखील मान्यता दिली. जवळपास दोन लाख लोक बेघर होणार होते, त्यांना या सभागृहाच्या माध्यमातून आणि हायकोर्टाच्या माध्यमातून दिलासा मिळालेला आहे. परंतु या विधेयकाच्या निमित्ताने काही सुधारणा करणे गरजेचे आहे. कारण अनधिकृत बांधकामे रेग्युलराईज करण्याच्या बाबतीत भ्रष्टाचाराची पावले उचलली जात आहेत. त्यावर कोठेतरी आळा घातला पाहिजे. या संदर्भाने मी दीड-दोन महिन्यापूर्वी मा.राज्यपाल महोदयांना पत्र लिहिलेले होते. त्याची प्रत मा.मुख्यमंत्र्यांना पाठविलेली होती. याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणून दिनांक 1 मार्च 2006 रोजी मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मा.नगरविकास राज्यमंत्री यांना पत्र पाठविलेले आहे. त्या पत्रामध्ये मी बऱ्याच सूचना केलेल्या आहेत. नगरपालिकेने अनधिकृत बांधकामाकडे आतापर्यन्त दुर्लक्ष केलेले आहे. त्यांच्याकडे दैनंदिन काम चालू आहे. उल्हासनगरमध्ये जवळजवळ 40 हजार इमारती अधिकृत करण्याबाबत बील आणलेले आहे. यामधून 200 ते 400 कोटीचा महसूल मिळू शकतो, अशाप्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. ही सगळी वसुली करत असतांना, दैनंदिन काम करणारी जी व्यवस्था आहे, त्यांच्यावर हा बोजा न टाकता दुसऱ्या पध्दतीने हे काम होऊ शकते. आज 40 हजार इमारती रेग्युलराईज करावयाच्या आहेत. त्यामध्ये बेकायदेशीर वसुली करण्याचा प्रयत्न सुरु आहे. माझी विनंती आहे की, यासाठी एक आय.ए.एस. ऑफीसर नेमून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (पुढे सुरु...

वेगळी यंत्रणा करावी. हायकोर्टाने देखील कालावधी दिलेला आहे. त्यांच्यामार्फत हे काम केले तर ते काम लवकर करता येईल आणि सोयीचेही आहे. म्हणून उल्हासनगरमध्ये कॅम्प नंबर 1 ते 5 आहेत. कॅम्प वाईज अधिकारी नेमावेत, यामध्ये पारदर्शकता असावी म्हणून आय.ओ.एस. दर्जाचे अधिकारी नेमावा.

सभापती महेदया, एफ.एस.आय. 4 देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. अनधिकृत इमारतींचा एफ.एस.आय. हा 8 पर्यन्त गेलेला आहे. या विधेयकाच्या पान क्रमांक 5 मधील कलम 4 च्या पोटकलम '3 अे' च्या परंतुकामध्ये असे म्हटलेले आहे की, "Provided that, the Designated Authority shall not regularise unauthorised developments having FSI more than 4.00 and projections beyond plot boundary and the change of use which in the opinion of the Designated Authority may cause danger to health or lead to hazard;"

सभापती महोदया, मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो की, काही इमारती या 6, 7 एफ.एस.आय. असलेल्या आहेत. आपण 4 एफ.एस.आय.ला परवानगी दिलेली आहे. बाकीच्या इमारती या बेकायदेशीर ठरविल्या जाणार आहेत काय ?

यानतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ......

6 किंवा 7 एवढ्या एफएसआय असलेल्या इमारती असल्या तरी 4 च्या वर एफएसआय असल्याने त्यांना 4 एवढ्या एफएसआयपर्यंत मंजुरी देण्याच्या संदर्भात शासनाने खुलासा करावा. नाही तर काही लोक वेगळे इंटरप्रिटेशन करुन कोर्टात जातील आणि गोंधळ निर्माण होईल. हे विधेयक मंजूर करण्यापूर्वी निर्णय घेतला असेल तर त्याबाबत खुलासा व्हावयास पाहिजे. शासनाच्या निर्णयाचे वेगळे इंटरप्रिटेशन करुन कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये, कोणी कोर्टात जाऊ नये म्हणून याबाबतीत खुलासा करावा. मी राज्य शासनाकडे जे पत्र दिलेले आहे आणि ज्या मागण्या केलेल्या आहेत त्यादृष्टीने राज्य शासनाने बिलामध्ये सुधारणा करावी. दिनांक 1 मार्च, 2006 रोजी मी जे पत्र पाठविलेले आहे त्यामध्ये असा उल्लेख केला आहे की, "An urgent and immediate need to appoint a section wise supervision team for all the 5 sections of the Ulhasnagar Municipal Corporation where notice for Regularizations of nearly 40,000 unauthorized residential and commercial complexes has been issued and to appoint a senior IAS Officer to overview the appointed suprevsion team." या पत्राची प्रत मी माननीय राज्यपाल महोदयांना पाठवली हाती. त्यांचेही उत्तर आलेले आहे. त्यांनी राज्य शासनाला दखल घेण्याबाबत कळविले आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "to ensure a fair and just settlement of the whole subject matter it will be highly advisable that the Government of Maharashtra:

Appoint senior IAS Officer to overview the progress of the Supervision Team and to ensure no irregularities or illegalities are bing undertaken.

Appoint a section wise supervision team for all the 5 sections of Municipal Corporation of Ulhasnagar, where the unauthorised complexes need to be regularized.

The Govt. of Maharashtra should apppoint these supervisors to

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

श्री. कन्हैयालाल गिडवाणी .....

overlook all the formalities and procedures being adopted for the regularization process, as it is important to remember that a major part of the blame for these unauthorized building lies with the officials of the Ulhasnagar Municipal Corporation, Govt. of Maharashtra, Councilor of Corporation, and MLA who ignored or deliberately and knowingly allowed approximately 40,000 buildings to be built without proper authorizations, resulting in a total city being put at ransom and more than two lakh people being rendered homeless. This has completely affected law and order situation of the city. Even the High Court has held them all jointly responsible for this failure of abiding and obtaining the regulation. Thus, the Government must appoint members and form a team of officials other than the ones over seeing the routine work. With the current set up of the Ulhasnagar Municipal Corporation, it will not be possible for the Govt. of Maharashtra to ensure completion of a fair and legally ethical regularization of the unauthorized buildings in the stipulated time; therefore the Government must apppoint the supervision team and ensure completion of the entire regularization in a maximum period of 6 months. It is extremely important that total and complete transparency be maintained in this entire process of regularization, as the entire State of Maharashtra is observing the process and out come of this regularization. The governmebnt must not wait until the stipulated 18 months period by the High Court is complete but ensure completion well ahead of the schedule. "

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

श्री. कन्हैयालाल गिडवाणी .....

मी शासनाला विनंती करतो. माझे पत्र शासनाच्या रेकॉर्डवर आहे. त्यासंदर्भात सूचना देणे अत्यंत गरजेचे आहे. हा विषय देशभर गाजलेला होता. नवी दिल्लीमध्ये सुध्दा सहा महिन्यांपासून जी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती आपण पाहतो. एक उदाहरण म्हणून नवी दिल्लीमध्ये याची चर्चा आहे की, महाराष्ट्र राज्य शासनाने जस्टीफिकेशन दिले, मुद्दे मांडले आणि अध्यादेश काढला. आपण त्याबाबतीत निर्णय घेतला. हायकोर्टाने दिलेला निर्णय त्यांनी माघारी घेण्याचे कारण म्हणजे आपण जी परिस्थिती सांगितली आणि अध्यादेश काढला हे आहे. ती परिस्थिती गंभीर होती आणि कोणीही ते मान्य करण्यासारखी परिस्थिती होती. या सभागृहापासून, शासनापासून, माननीय राज्यपालांपासून हायकोर्टापर्यंत सर्वांना ती परिस्थिती मान्य झालेली आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कन्हैयालाल गिडवाणी...)

मी जे मुद्दे याठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करुन या विधेयकामध्ये सुधारणा करावी, तेथे भ्रष्टाचार करण्यास कोणाला मोकळे रान देऊ नये, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 18:00

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : माननीय तालिका सभापती महोदया, सन 2006चे वि.स.वि क्रमांक 28 -उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे, या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. हे विधेयक येण्यापूर्वी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये दिनांक 15 डिसेंबर 2005 रोजी, उल्हासनगर शहरामध्ये निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, सर्वसामान्य नागरिकांच्या मनामध्ये निर्माण झालेली भीती आणि या सगळ्या गोष्टींचा विचार करुन उल्हासनगर शहरातील नागरिकांना दिलासा मिळावा, त्यांच्या निवासाबद्दल शासनाने दखल घ्यावी अशा आशयाची लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली होती. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी माननीय सभापतींनी असे निर्देश दिलेले होते की, या 855 अनधिकृत इमारती उभ्या करणारे, विकासक, बांधकाम व्यावसायिक, महानगरपालिकेचे अधिकारी, पदाधिकारी या सर्वांची चौकशी करुन नियमाप्रमाणे आणि कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. त्याच प्रमाणे या सर्व प्रकरणी नंदलाल समितीने सविस्तर अहवाल सादर केलेला असून त्या अहवालाच्या शिफारशींनुसार तातडीने कारवाई करावी असेही निदेश माननीय सभापतींनी दिलेले होते. त्यानुषंगाने शासनाने अध्यादेश काढून त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. उल्हासनगरमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीला जबाबदार असणारे विकासक, बिल्डर्स् यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे? यासंबंधीचा उल्लेख विधेयकामध्ये नाही. उल्हासनगर शहराच्या संदर्भात नंदलाल समितीने 1999मध्ये आपला अहवाल शासनास सादर केलेला आहे. हा अहवाल सादर होऊन 6 वर्षाला कालावधी लोटलेला आहे. या उल्हासनगर शहरामध्ये कोणकोणत्या पध्दतीने नियमबाह्य आणि बेकायदेशीर बांधकामे झालेली आहेत याचा अभ्यास नंदलाल समितीने केलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची आचारसंहिता, नियमांचे पालन न करता या उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. 90 ते 92 हजार माणसे राहू शकतील अशा या उल्हासनगर शहरामध्ये अधिकृतपणे 5 लाख माणसे राहात असली तरी अनधिकृतपणे 8 लाख माणसे आज वास्तव्य करीत आहेत. मी स्वत: उल्हासनगरमध्ये राहाणारा असून गेली 30 वर्षे उल्हासनगरमधील बदलत्या परिस्थितीचा मी स्वत: साक्षीदार आहे. 1970 सालातील उल्हासनगर शहर आणि आता 2006 सालातील उल्हासनगर शहर यामध्ये प्रचंड तफावत आहे. उल्हासनगर शहरातील जे भूखंड

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

गार्डन्स, शाळा, मैदाने, हॉस्पीटल अशा सार्वजनिक हिताच्या बाबींसाठी राखीव ठेवलेले होते त्या भूखंडांचे आरक्षण बदलून त्यावर पाच-पाच, दहा-दहा मजली इमारती उभ्या राहिलेल्या आहेत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

रस्त्याच्या बाबतीत विचार केला तर उल्हासनगर महानगरपालिका होण्याच्या आधीपासूनच या शहरातील रस्ते कंजेस्टेड आणि अतिशय गलिच्छ अशा प्रकारचे आहेत. अशा प्रकारची परिस्थिती वर्षानुवर्षे आहे. उल्हासनगर शहरामध्ये अनेक गैरप्रकार चालतात. शहरामध्ये अनेक अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. कोणत्याही प्रकारचे नियमांचे पालन न करता शहरामध्ये ही परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि अशा प्रकारची परिस्थिती असणारे राज्यातील हे एकमेव शहर आहे. या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांना कोणत्याही बॅंकेकडून घर खरेदी करण्यासाठी कर्ज सुध्दा मिळत नाही आणि ही परिस्थिती वर्षानुवर्षे आहे. मी उल्हासनगर शहरामध्ये अनेक वर्षापासून रहात असून मला सुध्दा आतापर्यंत घर खरेदीसाठी कर्ज मिळू शकले नाही. कारण या शहरामध्ये जी घरे बांधली जातात ती अनधिकृतपणे बांधली जातात त्यामुळे बॅंका कर्ज उपलब्ध करुन देत नाहीत.

सभापती महोदया, शहरातील अनधिकृत बांधकामांचा विचार केला तर जवळजवळ 30 हजार पेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत. अनेक ठिकाणी चटई निर्देशांकाचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. चटई निर्देशांकाचे उल्लंघन केलेली 12422 प्रकरणे आहेत. चार पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या 18434 इमारती आहेत. नियमांचे उल्लंघन करुन इमारती उभ्या राहिल्या आहेत त्यांची संख्या 588 आहे. या विधेयकातील कलम 43(अ) मध्ये उल्लेख करण्यात आला आहे की 4 चटई निर्देशांक वापरलेल्या इमारती नियमित केल्या जातील. सरकार अशा इमारतींना संरक्षण देणार आहे. उल्हासनगर शहरातील लोकांच्या मनामध्ये आजही ही भीती आहे की चार पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या इमारतींना संरक्षण मिळणार किंवा कसे ? कारण शहरामध्ये 8 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या इमारतींची संख्या सुमारे 37 आहे. 7 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या इमारतींची संख्या 109 आहे. 6 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या इमारतींची संख्या 116 आहे आणि 5 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या इमारतींची संख्या 326 आहे. म्हणजे 4 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरलेल्या इमारतींची एकूण संख्या 588 आहे. या सर्व इमारतींची 4 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरुन नियमांचे उल्लंघन करुन बांधल्या आहेत. जर या विधेयकाचा विचार केला तर 4 पर्यंत चटई निर्देशांक वापरलेल्या इमारती नियमित करण्याचे शासनाचे धोरण आहे. ज्या इमारतींनी 4 पेक्षा अधिक चटई निर्देशांक वापरला आहे अशा इमारतींच्या बाबतीत शासन नेमकी कोणती भूमिका घेणार आहे याचा खुलासा

श्री. रामनाथ मोते ....

करावा. सहा मजली किंवा सात मजली अशा प्रकारे नक्की कोणते बांधकाम अनधिकृत ठरविले जाणार आहे ? म्हणजे अधिकृत बांधकाम कोणते आणि अनधिकृत बांधकाम कोणते याचा खुलासा झ ााला पाहिजे. या विधेयकाच्या उद्देश आणि कारणांमध्ये खुलासा केलेला आहे आणि मंत्रीमहोदयांनी सुध्दा याठिकाणी सांगितले की, गुजरात पॅटर्नप्रमाणे हे विधेयक सभागृहामध्ये आणलेले आहे. गुजरात शासनाने या विषयाच्या बाबतीत जे विधेयक आणले होते त्याचा आधार या शासनाने घेतलेला आहे हे निश्चित झाले आहे. परंतु या दोन्ही राज्यांनी आणलेल्या विधेयकामध्ये फरक असा आहे की, गुजरात राज्याने जे विधेयक आणले होते त्यामध्ये इमारती ज्या परिस्थितीत असतील त्या परिस्थितीमध्ये त्या नियमित करण्याचे धोरण ठरविण्यात आले होते. गुजरात शासनाने विधेयक आणताना किती चटई निर्देशांक वापरला आहे याचा विचार केला नाही किंवा बांधकाम अनधिकृत झाले याचा विचार केला नाही आणि कट ऑफ डेट ठरवून जी जी बांधकामे अनधिकृत असतील त्यांना संरक्षण देण्याचे ठरविले. त्याठिकाणी कोणतीही मर्यादा ठेवली नाही. महाराष्ट्र शासनाने कोणती बांधकामे नियमित होणार हे सांगितले आहे. त्यामुळे बऱ्याच इमारतींवर अजूनही हातोडा पडणार आहे. याबाबतीत निश्चित स्वरुपात खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, दुसरा एक महत्वाचा मुद्दा असा की कंपाऊंडींग चार्जेस घेऊन इमारती नियमित केल्या जाणार आहेत. त्यासंदर्भातील चार्जेस किती असतील त्याची माहिती विधेयकामध्ये दिलेली आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

त्याचे वेगवेगळे गट पाडून कुठे 20 टक्के तर कुठे 10 टक्के अशा प्रकारे मार्केटच्या किंमतीच्या आधारे अनधिकृत इमारतींच्या मालकांकडून हे पैसे घ्यावयाचे आहेत. यामध्ये विकासक अथवा बिल्डरकडून काही रक्कम घेण्याची तरतूद आहे पण आता एकही विकासक अथवा बिल्डर अस्तित्वात नाही. कारण त्या घरात राहणारा जो माणूस आहे त्याने त्याच्या पूर्वी राहणाऱ्या व्यक्तीकडून ते घर घेतलेले असेल, म्हणजेच मूळ मालक आज जो कोण असेल तर तो दुसराच कुणीतरी असेल. अशा प्रकारे एकाकडून दुसऱ्याने आणि दुसऱ्याकडून तिसऱ्याने ते घर घेतलेले असेल, ओरिजिनल मालक दुसराच कुणीतरी असेल. अशा प्रकारे हस्तांतर होत होत तीन-चार माणसांकडून ते घर आलेले असते. म्हणून आता कोणीही विकासक नाही किंवा बिल्डरही नाही, ही सर्व गायब झाली आहेत आणि त्यालाच हे चार्जेस भरावी लागणार आहेत. हे चार्जेस घेत असतांना जे बाजारमूल्य धरणार आहात ते कोणत्या वर्षाचे धरणार ? याचाही खुलासा झाला पाहिजे. उदा. ज्या माणसाने सन 1980 सालामध्ये घर घेतले असेल आणि त्यावेळी जे बाजारमूल्य असेल ते वेगळे असेल. कारण उल्हासनगरमध्ये झोन-अे मध्ये 242 रुपये, झोन-बी मध्ये 242 रुपये, झोन-डी मध्ये 267 रुपये तर झोन-एच मध्ये 150 रुपये प्रति चौरस मीटरचा भाव रेडिरेक्नरप्रमाणे शासनाने ठरवून दिलेला आहे. म्हणून शासन कोणत्या बाजारमूल्याच्या आधारे संबंधितांकडून हे चार्जेस गोळा करणर आहे ? तसेच हे कंपाऊंडिंग चार्जेस गोळा करतांना पूर्वी घर घेतले असेल त्यावेळचे बाजारमूल्य गृहित धरणार की आजचे बाजारमूल्य गृहित धरणार ? याचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

महोदया, त्याचबरोबर या विधेयकात शासनाने पदनिर्देशित प्राधिकारी म्हणून नेमणूक करण्याची देखील तरतूद केलेली आहे. परंतु उल्हासनगरचा एकंदरित कारभार हा सर्व अनधिकृत बांधकाम अथवा नियमांचे उल्लंघन करुन चालू आहे या बाबीचा विचार केला तर अशी नेमणूक करतांना "कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेला" असा जो अधिकारी असेल त्याची शासनाने खात्री करुन घ्यावी व असाच एखादा वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी पदनिर्देशित प्राधिकारी म्हणून शासनाकडून निवडला जाणे आवश्यक आहे. आज उल्हासनगर शहरामध्ये एकही भूखंड शिल्लक नाही, शासनाचा भूखंड देखील शिल्लक नाही. इतकेच काय पण मला अशीही खात्री

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेची जी इमारत आहे ती सुध्दा अनधिकृतच आहे. म्हणजेच अनधिकृत बांधकाम पाडण्याची सुरुवात करण्यापूर्वी पहिला हातोडा पडावयाचा असेल तर तो उल्हासनगर महापालिकेच्या इमारतीपासूनच सुरु होणार आहे. त्याचबरोबर या शहरात कुठल्याही प्रकारच्या नागरी सुविधा नाहीत, पाण्याची तसेच स्वच्छतेची सोय नाही, आरोग्याची सोय नाही. एवढया मोठया प्रमाणात या महापालिकेला उत्पन्न मिळत असतांना कुठल्याही नागरी सुविधांकडे लक्ष दिले जात नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण कार्यक्रमांच्या निमित्ताने उल्हासनगरमध्ये आला असणारच परंतु केवळ उल्हासनगर शहराची पाहणी करण्यासाठी एकदा जरुर उल्हासनगरमध्ये यावे. आपल्याला दिसून येईल की, कल्याणनंतर उल्हासनगरमध्ये प्रवेश करतो त्या प्रवेशद्वारापासून तर उल्हासनगरची हद्द संपते तेथेपर्यंतचा रस्ता 100 फुटाचा आहे पण वास्तवात तो 100 फुटाचा रस्ता कुठेच दिसून येणार नाही. कुठे तो 40 फूट तर कुठे 60 आणि 80 फूट दिसून येईल. तसेच जो रस्ता वापरात आहे त्यावर देखील ठिकठिकाणी अडथळे आहेतच. म्हणजेच फक्त 30 फुटापेक्षा कुठेही रस्ता दिसून येणार नाही.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

60 फुटापैकी 30 फूट आणि 40 फुटापैकी 30 फूट रस्ता वापरण्यास मिळतो. दोन्ही बाजूंनी लोकांनी रस्ता ऑक्युपाय केलेला आहे. कल्याण पेट्रोल पंप ते अंबरनाथ नाक्यापर्यंत ही परिस्थिती आहे. तेथे पोलीस कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाही. 'नो पार्किंग झोन' कुठेच दिसत नाही. उल्हासनगरमध्ये देखील तेच चालू आहे. दुकान आतमध्ये असले तरी देखील गाडी कुठेही पार्किंग करा. आज तेथे पदपथ तर शिल्लकच नाही. पदपथ दुकानदारांनी व्यापून टाकला आहे. तेव्हा याचासुध्दा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने उल्हासनगरचा विकास करावयाचा असेल तर नियमाचे पालन काटेकोरपणे झाले पाहिजे. अध्यादेश निघाल्यानंतर, कट ऑफ डेट जाहीर केल्यानंतर देखील उल्हासनगरमध्ये अनधिकृत बाधकामे सुरू आहेत. माझ्या माहितीप्रमाणे जानेवारी 2006 नंतर आजतागायतपर्यंत उल्हासनगरमध्ये अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. यासंबंधीचे उदाहरण देखील देण्यास माझी तयारी आहे. उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामांना सर्वांचेच सहकार्य आहे. ते अत्यंत क्लेशदायक आहे. तेव्हा याचासुध्दा शासनाने गांभीर्याने विचार करावा. यास जे जबाबदार असतील त्यांच्याविरूद्ध कारवाई केली पाहिजे. मग त्यात बिल्डर असतील, विकासक असतील, शासकीय अधिकारी असतील या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. येथील प्लॉटचे वाटप करण्यासाठी प्रशासकीय कार्यालय होणे आवश्यक होते. येथे जी स्क्रीनिंग कमिटी होती, त्या कमिटीकडून बोगस सीडी म्हणजे शासकीय सनद घेण्यात आली आहे. याबाबत आपण नंदलाल समितीचा अहवाल वाचावा. त्यात याचा उल्लेख नक्कीच सापडेल. येथील बांधकामाची पडताळणी केली असता असे दिसून येईल की, जवळपास 3/4 बांधकामे ही अनधिकृत आहेत. या बांधकामांना शासनाकडून जी सनद मिळाली आहे ती देखील बोगस आहे. नगरपालिका, महानगरपालिकेचा परवाना देखील बोगस आहे. म्हणूनच सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. याला जे कोणी जबाबदार असतील त्यांच्याविरूद्ध कारवाई होणे आवश्यक आहे. दिनांक 3 जुलै 1999 रोजी नंदलाल समितीचा अहवाल आला. परंतु, त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई शासनाच्यावतीने झाली नाही. कोण आतमध्ये जाणार नाही, अशी लोकांची भूमिका होतीी गैरप्रकार, अवैध काम करणारे जे लोक आहेत, त्यांनी सर्वसामान्य लोकांना लुबाडून गडगंज संपत्ती मिळविली आहे. अशा लोकांवर कारवाई होणार नसेल तर, जे कोणी जबाबदार अधिकारी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

व लोकप्रतिनिधी असतील त्यांच्यावर कारवाई होणार नसेल तर येथे चर्चा करण्यास काहीही अर्थ नाही. तेव्हा यासंबंधी शासनाने विचार करावा एवढे या बिलाच्या माध्यमातून सांगतो आणि आपली रजा घेतो.

....

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : ज्या सन्माननीय सदस्यांना या बिलावर बोलावयाचे आहे, त्यांनी माझ्याकडे नावे पाठवून द्यावीत. म्हणजे किती जण बोलणार आहेत हे लक्षात येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदया, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-28, उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे विधेयक, 2006 ला समर्थन देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, अतिशय कठीण अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शासनाने या ठिकाणी हे चांगले विधेयक आणले आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने तयार होणाऱ्या कायद्यातून 855 इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना एक प्रकारे दिलासाच मिळणार आहे. वास्तविक पाहता ज्यावेळी न्यायालयाने उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामे तोडून टाकली पाहिजेत, असा आदेश दिला त्यावेळी त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीकोनातून विचार झाला नव्हता. अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बिल्डर्सच्या बाबतीत न्यायालयाने कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नव्हता. अनधिकृत बांधकाम करणारे आणि बांधकामांना आशिर्वाद देणाऱ्या, नगरपालिका/महानगर-पालिकांतील अधिकारी/लोकप्रतिनिधी यांच्याबद्दल सुध्दा कोर्टाने कसल्याही प्रकारे आदेश दिले नव्हते. खरे म्हणजे ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले त्या ठिकाणी गरजू लोकांनी फ्लॅट घेतले. परंतु ज्यांनी हे अनधिकृत बांधकाम केले त्यांच्या बाबतीत कोर्टाने काहीही आदेश दिले नव्हते किंवा त्यांना शिक्षा करण्याचा निर्णयही कोर्टाने घेतला नव्हता. ज्या लोकप्रतिनिधींनी या अनधिकृत बांधकामास आशिर्वाद दिला त्यांच्या बाबतीतही कोर्टाने आदेश दिले नव्हते. अशा विचित्र परिस्थितीत 855 इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या बाबतीत शासनाने मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करुन, अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतला. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी ही अनधिकृत बांधकामे अधिकृत केल्यावर राज्यामध्ये जे दुष्परिणाम होतील त्याबाबत सुध्दा शासनाने विचार केला पाहिजे असा मुद्दा मांडला.

महोदया, हा कायदा करीत असताना, ज्या अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकामास आशिर्वाद दिला, डोळे उघडे ठेऊन हे बांधकाम चालू ठेवले, त्यांच्यावर शासनाने कारवाई का केली नाही ? अशा अधिकाऱ्यांना शासनाने निश्चितप्रकारे शासन केले पाहिजे. नाही तर अशा प्रकारचा कायदा, राज्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी नगरपालिका/महानगरपालिका किंवा जिल्हा परिषदा आहेत त्या त्या ठिकाणी करावा लागेल.

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 18:20

श्री.अनंत तरे....

महोदया, स्वत:च्या जागेवर स्वत: केलेले अनधिकृत बांधकाम, दुसऱ्याच्या जागेवर तिसऱ्याने केलेले अनधिकृत बांधकाम, नियमापेक्षा जादा केलेले बांधकाम, आरक्षित भूखंडावर केलेले बांधकाम, शासकीय/केंद्र शासनाच्या वन जमिनीवर केलेले अनधिकृत बांधकाम, मूळ प्लॅननुसार बांधकाम न करता दुसऱ्याच प्लॅननुसार करण्यात आलेले बांधकाम इ. प्रकारे अनधिकृत बांधकाम केले जाते. ॲमेंडमेंट मान्य न करताच निरनिराळया प्लॅनद्वारे बांधकाम केले जाते. एखाद्या नागरिकाने जर अनधिकृत बांधकामासंदर्भात तक्रार केली तर त्या तक्रारीची कोठेही दखल घेतली जात नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे ....

सभापती महोदय, महानगरपालिका आयुक्तांच्या मनात असेल तरच कारवाई केली जाते. उल्हासनगरप्रमाणे ठाणे, भिवंडी, पुणे, नवी मुंबई या ठिकाणी देखील हजारो इमारती अनधिकृतरित्या उभ्या राहिलेल्या आहेत. सभापती महोदय, या अनधिकृत इमारती उभ्या राहत असताना तेथील शासकीय अधिकारी काय करत होते ? शासकीय जागेवर अतिक्रमण होत असताना तेथील एनरॉलमेंट अधिकारी, तहसिलदार काय करत होते ? सभापती महोदय, मध्यंतरी शासनाने असा एक फतवा काढला होता की, ज्यांच्या प्रभागामध्ये अनधिकृत बांधकामे होतील, त्याला त्याबाबत जबाबदार ठरवून सस्पेंड केले जाईल. तसेच तेथील पोलीस अधिकाऱ्याला देखील सस्पेंड केले जाईल. राज्यामध्ये आतापर्यंत शासनाने अशाप्रकारे किती तहसिलदार, प्रभाग अधिकारी व पोलीस निरीक्षकांवर कारवाई केलेली आहे ? सभापती महोदय, अनधिकृत बांधकामांवर शासनाचा अंकुश राहिलेला नाही. मला खेदाने असे सांगावेसे वाटते की, ऑफिशिअल प्लॅन दाखल केल्यानंतर सुध्दा एका वर्षानंतर, दोन वर्षानंतर देखील तो प्लॅन पास होत नाही. याबाबत त्या संबंधित मालकाला, आर्किटेक्चरला शंभर वेळा नगरपालिकेत व महानगरपालिकेत जावे लागते. परंतु एखादे अनधिकृत बांधकाम उभे करावयाचे असेल तर काही पैसे पुरविल्यानंतर कोणताही डेव्हलपमेंट चार्ज न घेता तेथे काम केले जाते. सभापती महोदय, अनधिकृत बांधकामाला अधिकृत बांधकामापेक्षाही पाण्याचे कनेक्शन, लिफ्टची परवानगी, इलेक्ट्रिकचे कनेक्शन, ड्रेनेजची कनेक्शन सहजासहजी मिळते. सभापती महोदय, या अनधिकृत बांधकामाबाबत एखाद्या नागरिकाने तक्रार केली तरीही दखल घेतली जात नाही. काही लोक याबाबत कोर्टात जातात परंतु सगळ्यांनाच कोर्टात जाणे परवडत नाही. म्हणून या संदर्भात माझे असे मत आहे की, या राज्यामध्ये अनधिकृत बांधकामावर देखरेख ठेवण्यासाठी एखादा मंत्री करावा अन्यथा एखादे खाते नेमुन त्यावर सचिव पातळीवरील अधिकारी ठेवावा. त्या अधिकाऱ्याने तक्रार आल्यानंतर चौकशी करुन अनधिकृत बांधकामांची विल्हेवाट लावली पाहिजे. सभापती महोदय, मी पंचायत राज समितीसारखी एक समिती नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये या कामांवर देखरेख ठेवण्यासाठी करावी, असा अशासकीय प्रस्ताव दिलेला आहे. गेल्या आठवड्यात हा प्रस्ताव चर्चेला येणार होता. सभापती महोदय, महानगरपालिकेतील एखादा प्रस्ताव महासभेमध्ये किंवा जनरल

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे ....

बॉडीमध्ये आयुक्तांच्या सहीने येतो. त्या प्रस्तावावर महापौरांपासून सर्व सन्माननीय सदस्य चर्चा करतात व तो प्रस्ताव एकमताने मंजूर होतो. परंतु सभापती महोदय, तो एकमताने मंजूर झालेला प्रस्ताव पुन्हा आयुक्तांकडे " येस " किंवा " नो " साठी जातो. सभापती महोदय, ही कायद्याची कुचेष्टा आहे. तरी, व्ही.एम.सी. ॲक्टमध्ये सुध्दा दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. एकमताने केलेला प्रस्ताव आयुक्तावर बंधनकारक असला पाहिजे. अनधिकृत बांधकामांसंदर्भात नगरसेवकांनी किंवा नागरिकांनी तक्रार केली तर आयुक्ताने त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. सभापती महोदय, आयुक्तांच्या मर्जीशिवाय कोणतीही कारवाई होत नाही. त्या ठिकाणी फुटावर भाव ठरविला जातो. नागरिकाने जर सांगितले की, मी माझ्या जागेवर घर बांधतो तर त्या नागरिकाची बांधकामे काही क्षणात तोडली जातात. सभापती महोदय, अशी अनेक उदाहरणे आहेत. म्हणून मी या ठिकाणी खेदाने सांगेन की, संपूर्ण अनधिकृत बांधकामांवर शासनाचा अंकुश राहिलेला नाही आणि शासनाला जर तसा अंकुश ठेवायचा असेल तर शासनाने सचिव पातळीवरील अधिकारी नेमून तक्रार आल्यानंतर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे अधिकार त्याला देण्याची आवश्यकता आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

सभापती महोदय, या ठिकाणी मी एक उदाहरण देतो की, अनधिकृत बांधकामा संदर्भात एक तक्रार 4 महिन्यापूर्वी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली होती. त्या पत्राचे साधे उत्तर सुध्दा मला मिळालेले नाही. कारवाई करणे तर लांबच राहिले. विधानमंडळाच्या सदस्यांच्या पत्राची दखल जर शासन घेणार नसेल तर सर्व सामान्य नागरिकाला कसा काय न्याय मिळत असेल ? उल्हासनगरप्रमाणे इतरत्र सर्व इमारती रेग्युलराईज्ड करणार आहात काय ? अशा प्रकारची मागणी आपणाकडे पुढील काळामध्ये येणार आहे. याचा फायदा घेऊन काही लोकांनी अनधिकृत बांधकाम करण्याचा सपाटा लावलेला आहे. त्यांना सुध्दा आपण कायदा करुन सोडून देणार आहात काय ? हा कायदा मंजूर होत असतांना कोणत्याही महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रामध्ये असे अनधिकृत बांधकाम झाल्यास त्यांना आपण सूट देणार आहात काय ? असे केले तर जे लोक नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे वागतात त्यांच्यावर अन्याय होणार नाही काय ? या विधेयकाद्वारे उल्हासनगरमधील 855 इमारती रेग्युलराईज्ड होणार आहेत, व पुढेही अशाच प्रकारच्या मागण्या राज्याच्या इतर भागातून येणार आहेत, एखादी इमारत बांधतांना वर्ष-दीड वर्षाचा कालावधी लागतो. इमारत पूर्ण झाल्यानंतर तेथे रहिवाशी राहायला जाण्यापूर्वी तोडण्याचे आदेश निघतात, याचा अर्थ काय आहे ? इमारतीचे बांधकाम करतांना तेथील अधिकाऱ्यांना ते दिसत नव्हते काय ? शासनाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कारवाई करु शकतात, महानगरपालिका व नगरपालिकेच्या माध्यमातून आयुक्त व मुख्याधिकारी कारवाई करु शकतात. परंतु याप्रमाणे कारवाई होत नाही असे दिसून येते. या ठिकाणी अनधिकृत कामे अधिकृत करण्याबाबत मंत्री महोदय विनंती करीत आहेत. बऱ्याच ठिकाणी 7-7, 12-12 मजली इमारती अनधिकृतपणे उभ्या आहेत, त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोई, लिफ्ट वगैरे मिळत आहेत हे कसे काय चालले आहे ? उल्हासनगरप्रमाणे प्रत्येक शहरासाठी वेगवेगळा कायदा आपण करणार आहात काय ? असा कायदा पुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून याबाबत शासनाने कडक धोरण अवलंबविले पाहिजे. हा कायदा करीत असतांना अनधिकृत बांधकामासाठी जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ? महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयुक्त व नगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी व तेथील संबंधित लोकप्रतिनिधी यांची चौकशी करुन आपण कारवाई करणार आहात काय ? अशा प्रकारची चौकशी

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे.. 18:30

श्री. अनंत तरे..

करीत असतांना जो चौकशी अधिकारी नेमण्यात येतो तो पुढील दीड ते दोन वर्षामध्ये निवृत्त होतो. त्यानंतर दुसरा चौकशी अधिकारी नेमण्यात येतो तेव्हा ज्याची चौकशी करावयाची आहे तो अधिकारी दीड ते दोन वर्षामध्ये निवृत्त होत असल्यामुळे त्या चौकशीला मुळीच अर्थ राहत नाही. म्हणून एखाद्या निवृत्त न्यायाधिशामार्फत संबंधित सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. कारण जो चौकशी अधिकारी नेमलेला असतो त्यांच्याकडून वेळेत चौकशी अहवाल कधीही मिळत नाही. अशा प्रकारची कोणतीही चौकशी न करता आपण संबंधित अधिकाऱ्यांना माफ करणार आहात काय ? आपण जरी अधिकाऱ्यांना माफ केले तरी जनता आपणाला माफ करणार नाही ? अशा प्रकारचा कायदा प्रत्येक शहरासाठी करण्याची वेळ या सरकारवर येईल. बीएमसी ॲक्टच्या माध्यमातून लोकप्रतिनधी व नगरसेवक यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई होत आहे. बीएमसी ॲक्ट प्रमाणे जी कार्यवाही होते त्या प्रकारचा एकच कायदा संपूर्ण राज्यासाठी करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे प्रभागामध्ये एटीपीओ व डीपीओ यांना दिलेले काम व्यवस्थित होते किंवा नाही यावर अंकुश ठेवणार आहात किंवा नाही ?

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे ....

तसेच एखाद्या आरक्षित जागेवर किंवा शाळेच्या प्लॉटमध्ये व्यापारी इमारती उभ्या राहतात त्यावेळी टाऊन प्लॅनिंग ऑफिसर्स काय करीत असतात ? विभाग काय करीत असतो ? याबाबत विचार होण्याची आवश्यकता आहे. अशाप्रकारचे गंभीर गुन्हे करणा-या अधिका-यांना तातडीने निलंबित करण्याची गरज आहे. या विधेयकावर बोलत असताना मी माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती करणार आहे की, शासनाने याबाबतचा कायदा करीत असताना, आज सेवेत असलेल्या अधिका-यांच्या कालखंडात अनधिकृत बांधकाम झालेले असेल अशा भ्रष्ट अधिका-यांना तातडीने सेवेतून निलंबित करण्याची घोषणा शासनाने करणे आवश्यक आहे. तसेच अशाप्रकारचे काही अधिकारी सेवानिवृत्त झालेले असतील, त्यांची पेन्शन तातडीने थांबवणे अत्यावश्यक आहे. तरच या कायद्याचा सर्वसामान्य जनतेला फायदा होऊ शकेल. तसेच काही महानगरपालिकांचे ऑडिट होते, त्या ऑडिटमध्ये कोणता रिमार्क मारला आहे, याची लोकप्रतिनिधींना माहिती सुध्दा नसते. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.अण्णासाहेब देशमुख यांनी महानगरपालिकेला पत्र लिहिले की, महानगरपालिकेच्या अनुषंगाने विधीमंडळामध्ये व अधिवेशनामध्ये जे काही प्रश्न उपस्थित होतात त्यांची आम्हाला माहिती द्यावी. या संदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सचिवांना पत्र लिहिले. परंतु सचिवांनी अशा प्रकारची माहिती देता येत नाही असे सांगितले. ज्या प्रश्नाबाबत सभागृहात चर्चा केली जाते त्या प्रश्नाचे महत्व महानगरपालिकेला समजत नाही. तसेच महानगरपालिकेच्या संदर्भात एखादा तारांकित प्रश्न झाल्यानंतर, त्या प्रश्नाला कोणत्या प्रकारे रिप्लाय दिला याबाबत महानगरपालिकेच्या नगरसेवकांना माहिती नसते. तसेच अनधिकृत झालेले बांधकाम पाडायला पाहिजे अशी एखाद्या महानगरपालिकेच्या महापौराची इच्छा असली तरी, हे काम होऊ शकत नाही. कारण अनधिकृत बांधकामे पाडण्याचे अधिकार कार्यकारी अभियंत्यांना असतात. त्यामुळे अनधिकृत बांधकामे तोडण्याची कारवाई पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून या विधेयकाच्या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, याबाबत संबंधितांना अधिकार देणे आवश्यक आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामे होत असतील तर ती थांबवण्यात मदत होऊ शकेल. या विधेयकाच्या निमित्ताने माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, महानगरपालिका तसेच नगरपालिका यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी पंचायती राज समितीसारखी एखादी समिती नेमण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 18:35

श्री.अनंत तरे ....

जेणेकरुन महानगरपालिका तसेच नगरपालिकांच्या कारभारावर या सदनातील सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून अंकुश ठेवता येऊ शकेल. तसेच उल्हासनगर येथील 855 अनधिकृत इमारती अधिकृत केल्या जाणार आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी कोर्टाच्या आदेशाप्रमाणे काही अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली त्यावेळी तेथे राहत असलेल्या लोकांची काय अवस्था झाली होती ? हे आम्ही टी.व्ही. वर पाहिले होते. तेथील लोकांनी कर्ज काढल्यानंतर ते कर्ज जन्मभर फेडू शकणार नाहीत अशी त्यांची परिस्थिती आहे. तसेच अनधिकृत असलेल्या इमारती अधिकृत करताना या प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

----------------

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदया, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 28 - उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक येथे मंजुरीसाठी आणण्यात आलेले आहे. सभापती महोदया, केवढी मोठी ही शोकांतिका आहे ? आपले महाराष्ट्र राज्य 1 मे 1960 साली निर्माण झाले आणि त्यानंतर या राज्याचा कारभार कसा चालला आहे त्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आपल्याला या विधेयकाच्या माध्यमातून पहावयास मिळते. 1960 पासून आतापर्यंत या राज्यामध्ये कोण राज्य करते आहे ? काही अपवादात्मक वर्षे सोडली तर काँग्रेस पक्षाचेच सरकार या राज्यामध्ये आणि देशामध्ये देखील राज्य करीत होते व आहे. म्हणजे काँग्रेसच्याच आशीर्वादाने या शहरामध्ये ही सारी अनधिकृत बांधकामे आजवर झालेली आहेत व होत आहेत आणि आता ती अधिकृत करण्यासाठी आपण हा कायदा करीत आहात. सभापती महोदया, आता या विधेयकाला पाठिंबा द्यायचा की विरोध करावयाचा हा प्रश्न आमच्या समोर पडला आहे. या विधेयकाला पाठिंबा द्यावा तर जे पूर्णपणे अनधिकृत आहे, बेकायदा आहे ते अधिकृत करण्यासाठी, कायदेशीर करण्यासाठी आम्ही या सरकारच्या मागे उभे रहात आहोत असे चित्र उभे राहते आणि विरोध करावयाचा म्हटले तर साडेचार लाख लोकांचा प्रश्न उभा ठाकतो अशी भयानक परिस्थिती या नगरविकास खात्याच्या मेहरबानीने आपल्या राज्यात उभी राहिली आहे. यामध्ये अंशत: आम्ही सुद्धा आहोत, त्याला अपवाद नाही. पण एक आहे की, जो कोणी मुख्यमंत्री असतो तो नगरविकास खाते आपल्याकडेच ठेवतो आणि मग त्याच्या विश्वासातील माणूस हा त्या खात्याचा राज्यमंत्री होतो आणि मग त्याच्याकडून अशी अनेक कामे होत असतात. अशा प्रथा व परंपरा या महाराष्ट्र राज्यामध्ये चालल्या आहेत, त्याचेच हे फलित आहे. सभापती महोदया, उल्हासनगर शहराशी 1976-77 किंवा त्यापूर्वी म्हणजे 19969 पासूनचा माझा संबंध आहे. खरे म्हणजे या उल्हासनगरमध्ये केवळ 1 लाख लोक रहावयास पाहिजेत तेथे 5 लाख लोक रहात आहेत. या मागे कोण आहे ? कोणाचा हा कारभार ? एका आमदाराचा. तो आमदार देखील काँग्रेस पक्षाचा खास. नंतर काँग्रेस पक्षाच्याच मुख्यमंत्र्यांनी त्याच्यावर कारवाई केली आणि त्याच्यावर तुरूंगात जाण्याची पाळी आली पण तुरूंगातून देखील तो या विधीमंडळामध्ये निवडून येतो. काय त्याचा प्रभाव ? पण हा प्रभाव कशाचा आहे ? तर त्याने आतापर्यंत उभारलेल्या

...... 3इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ......

अनधिकृत, बेकायदा बांधकामांचा., आणि त्यातून येणाऱ्या प्रचंड पैशाचा. या पैशाच्या माध्यमातून मग सगळ्यांच वेठीला धरता येते. इतकेच नाही तर त्याच्या विरोधात कोणी तक्रार केली तरी त्याच्या विरूद्ध कारवाई होत नाही. पोलीस आयुक्त, महापालिका आयुक्त देखील सांगतात की, त्याने गुन्हा केलेला नाही. मध्यंतरी उल्हासनगर महापालिकेया एका नगरसेवकाला मारले गेले आणि त्याबद्दल तक्रार त्याने स्वत: दिली पण तरीही महापालिका आयुक्त म्हणतात की, आम्ही तेथे होतो, त्यांनी काहीही केलेले नाही. म्हणजे त्याचे साक्षीदार हेच होते. अशा पद्धतीचा कारभार चालत असेल तर त्यांच्याकडून आणखी कसली अपेक्षा करावयाची ? इतक्या मोठ्या प्रमाणात, संख्येने, 40 हजारावर बांधकामे तेथे होतात आणि त्यातील बहुतांशी अनधिकृत आहेत तरीही त्या बाबत कोणतीही कारवाई होत नाही. एका एका माणसाला दोन दोन अनधिकृत इमारतींमध्ये जागा दिली जाते, त्या माणसांना देखील समजत नाही की, नेमकी अधिकृत इमारत कोणती आणि अनधिकृत कोणती ? आजही तेथे कोणीही हे सांगू शकणार नाही की, तेथील अधिकृत इमारत कोणती आणि अनधिकृत इमारत कोणती आहे. तुमचा अधिकारी तेथै गला तर त्यालाही गायब केले जाऊ शकते. इतकी हिंमत त्यांच्यामध्ये तेथे निर्माण झालेली आहे. पाकिस्तानमध्ये देखील हे घडत नाही पण ते आमच्या देशामध्ये, या राज्यामध्ये घडते आहे. आता बिहारमध्ये असे प्रकार घडू लागले आहेत आणि आपले राज्य बिहारच्याच वळणावर जात आहे असे म्हटले जाते. एके काळी बिहारमधील नालंदा विद्यापीठ हे एक आदर्श होते पण आता संपूर्ण बिहार राज्य एक वेगळाच आदर्श दाखवून देत आहे. सभापती महोदया, या विधेयकामध्ये ज्या सगळ्या तरतुदी आपण केलेल्या आहत त्या पाहिल्यानंतर मला वाटते की, काहीही कोठेही अनधिकृत करा आणि नंतर ते अधिकृत करून घ्या. असे प्रकार आज कोठे घडत नाहीत ? ..

( यानंतर श्री. सरफरे .... 3एफ 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

हे पुण्यामध्ये घडत नाही, मुंबईमध्ये घडत नाही, ठाण्यामध्ये घडत नाही? या सर्वच ठिकाणी अनधिकृत बांधकामे जोरात उभी राहात आहेत. मुंबईतील बांद्रे येथील एक उदाहरण मी आपणास देतो. त्याठिकाणी नवपाडा नावाची एक वस्ती आहे. त्या ठिकाणी गेल्या दोन वर्षापासून मोठया प्रमाणामध्ये अनधिकृत इमारतीचे बांधकाम चालू असून त्याबाबत तेथील काही नागरिकांनी तक्रारी केल्या. त्याबाबत मी महानगरपालिकेच्या आयुक्तांना पत्र लिहिले, महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला आणि त्याबाबत कारवाई करण्याचे आदेश देऊन सुध्दा कारवाई होत नाही. या अनधिकृत इमारती उभ्या रहातात त्यासाठी बांधकाम विभागाची परवानगी घेतली जात नाही, महानगरपालिकेची परवानगी घेतली जात नाही, इमारतीचा प्लॅन मंजूर करुन घेतला जात नाही. अशा राजरोस इमारती त्या भागामध्ये उभ्या राहात असून या इमारतींनी रस्त्याचा अर्धा भाग व्यापला आहे, अर्धा रस्ता खाल्ला आहे त्याकडे कुणीही लक्ष देत नाही. आज पोलीस सुध्दा त्या भागामध्ये जायला धजावत नाही. कारण या लोकांना आपण नाराज केलेतर आपल्याला मते मिळणार नाहीत. या सरकारला मते मिळतील की नाही माहीत नाही परंतु त्यांना नाराज करावयाचे नाही असे शासनाचे धोरण आहे. या सर्वाचा परिणाम असा होणार आहे की, या अनधिकृत इमारती अधिकृत करण्यासाठी आपल्याला पुन्हा एकदा कायदा करावा लागेल. या अनधिकृत इमारतींमधून इलेक्ट्रीक चार्जेस भरले जात नाहीत, पाण्याचे बिल भरले जात नाही, कर नावाची कोणतीही गोष्ट त्या ठिकाणी मिळत नाही. त्याच्या पाठीमागे जबरदस्त शासकीय यंत्रणा उभी आहे. आपला देश कुठे चालला आहे? उल्हासनगरच्या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी ही अनधिकृत बांधकामे केव्हां सुरु झाली? ती कुणाच्या प्रेरणेने, कुणाच्या आशिर्वादाने, कुणाच्या समर्थनाने, कुणाच्या धक्क्याने सुरु झाली? त्याचा आपण शोध लावणार काय? 855 इमारती पाडण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्यानंतर त्याची अंमलबाजवणी करण्याचा प्रश्न आला त्यावेळी लहान मुले, आया-बहिणी यांचे ऊर बडवून घेण्याचे प्रकार जनतेला बघवत नव्हते. ज्या लोकांनी त्यांना फसविले आहे त्यांना मदत करण्यासाठी आपण हा कायदा करीत आहात. ज्यांच्याकडून फसविले गेलेले आहेत, जे बोंबलत आहेत त्या जनतेसाठी आपण काय करीत आहात? आपण म्हणता की, जे बेकायदेशीर कामे करतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. कोणती कारवाई केली? इतक्या वर्षामध्ये आपण किती वेळा कारवाई केली? अनैतिक किंवा

श्री. मधुकर सरपोतदार...

अनधिकृत कामे केल्याबद्दल आपण किती लोकांना तुरुंगात पाठविले? फक्त एकमेव व्यक्तीला माजी मुख्यमंत्री कै. सुधाकरराव नाईक यांच्या मेहेरबानीने तुरुंगात पाठविले. त्यांनी मनात आणले आणि त्यांना उचलून तुरुंगात टाकून दिले. त्यावरुन खूप मोठे रामायण निर्माण झाले. ते एक रामायण होऊन गेले, त्या रामाचा आदर्श आपणापुढे होता. आज सर्वत्र रावण निर्माण होत आहेत.

सभापती महोदय, हे विधेयक आणले आहे त्याबाबत विचार व्यक्त करीत असतांना सहन होत नाही आणि सांगता येत नाही अशी आमची अडचण झाली आहे. या विधेयकाला जनतेचा विरोध आहे. अनधिकृत इमारती पाडल्यानंतर आपल्या आया-बहिणी रस्त्यावर येतील, त्यांची लहान मुले रस्त्यावर येतील. त्यांनी कुठे जायचे? ज्यांचे संसार रस्त्यावर आले आहेत त्यांचे पुढील भवितव्य काय असा प्रश्न निर्माण झाला. त्याकरीता आपण याठिकाणी विशेष अधिकारी नेमणार आहात, त्याच्याकडे कोणते अधिकार आहेत? त्यांच्याकडून महानगरपालिकेचा कारभार चांगला होईल? शेवटी ते देखील पैश्याने विकले जाऊ शकतात. He will be human body. कारण तो देखील माणूस आहे. माणसाचा विकनेस ओळखला जातो, त्यामध्ये भ्रष्टाचार हा सर्वात मोठा विकनेस आहे. आणि तो आज प्रभावीपणे काम करीत आहे. त्याला उल्हासनगर अपवाद मानण्याचे कारण नाही. त्या भ्रष्टाचारामधून आज उल्हासनगर उभे राहिले आहे. त्या भागातील नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या आहेत. आपण याठिकाणी इमारतींची संख्या सांगितली आहे, त्यावरुन बाकीच्या सर्व इमारती अधिकृत आहेत याची आपल्यालाही खात्री नाही. त्यांना कागदावर जी माहिती मिळाली ती त्यांनी दिली. उल्हासनगरमध्ये आज प्रत्येक सर्टिफिकेट डुप्लिकेट दिले जाते. प्रत्येक गोष्टीची नक्कल करण्यामध्ये उल्हासनगरचा कुणीही हात धरणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधु□र सरपोतदार (पुढे सुरु....

अशी या उल्हास-ा□रची □याती आहे. मेड इ-ा यु.एस.ए. असे उल्हास-ा□रचे व□-ा □ले जाते. मला याबाबतीत असे म्ह□ावयाचे आहे □, या विधेय□मध्ये वे□ळ्या प्र□रच्या तरतुदी □लेल्या आहेत. उल्हास-ा□रमधील स□ळी अ-ाधि□त बांध□मे अधि□त □र□यासाठी अध्यादेश □ढलेला आहे, याचे □यद्यात रुपांतर □र□यासाठी विधेय□ आ□लेले आहे. माझा प्रश्-ा असा आहे □, ही बांध□मे -ियमित □र□याची सुरुवात आहे, □ शेवट आहे ? हे □ळ□ आवय□ आहे. □रण अ-ाधि□त बांध□मे ही □ही ए□ शहरामध्ये नाहीत तर ती अ-ो□ शहरांमध्ये आहेत. ठा□ शहरामध्येही अ-ाधि□त बांध□मे आहेत. स-मा-ा-ीय सदस्य श्री. मोते साहेबां-ी सां□ल्याप्रमा□ □ल्या□मध्ये 100 फुटाचा रस्ता आहे, परंतु अ-ाधि□त बांध□मामुळे तो 30 फुटाचा झालेला आहे. रस्त्याची जा□ ही दु□-ो, तबेले, □रेजेस-ी व्यापलेली आहे. पा□स्ता-ातू-ा निर्वासित म्ह□-ा आलेल्या लो□-ा आप□ उल्हास-ा□र येथे जा□ दिली. या विस्थापितांची □रसोय होऊ -ाये, म्ह□-ा त्याच्या सहा-ुभूती पोटी विचार □रावा ला□ल्याचे उद्देश व □र□मध्ये म्हटलेले आहे. पुढे असे म्हटलेले आहे □," 7 चौरस □लोमीटरच्या विद्यमा-ा -िवासी □त्रामध्ये 4,73,000 इत□ लो□सं□या (प्रति हेक्टर 700 व्यक्ती एवढी घ-ादाट वस्ती) पसरली आहे. लो□सं□या ही 5 ला□पे□ही जास्त आहे. परंतु शास-ाच्या आ□डेवारीप्रमा□ जवळपास 5 ला□ लो□सं□या आहे. त्यामुळे प्रती हेक्टरी 700 लो□ रहातात, असे म्ह□□ आहे. त्या ठि□□ची अ-ाधि□त बांध□मे -ियमित □र□यासाठी दि-ां□ 14 जा-ेवारी 2006 रोजी अध्यादेश □ढ□यात आला. यापूर्वी सद-ामध्ये या विषयावर चर्चा झाली होती, त्यावेळेस उपसभापती महोदयां-ी आदेश दिलेले होते. त्या-ंतर "आम्ही यातू-ा मा□ □ढू", असे शास-ा□डू-ा सां□□यात आले होते. त्या संदर्भा-ो आमच्यासमोर विधेय□ मांड□यात आलेले आहे. माझ्या म-ामध्ये अशी भीती आहे □, आज उल्हास-ा□र येथील अ-ाधि□त बांध□मे -ियमित □र□यासंबां-ो विधेय□ आले उद्या □ल्या□, डोंबिवली येथीलही अ-ाधि□त बांध□मे -ियमित □र□याविषयीचे विधेय□ येईल. □ल्या□ डोंबिवली महा-ा□रपालि□ला अ-ाधि□त बांध□मे □शी □यदेशीर □रावी असा प्रश्-ा पडलेला आहे. त्या ठि□□च्या अ-ाधि□त बांध□मांसाठी अशाचप्र□रचे विधेय□ आ□ले जाईल. महाराष्ट्रातील अ-ो□ शहरांमध्ये अ-ाधि□त बांध□मे झालेली आहे. ते बांध□म -ियमित □र□यासाठी प्रशास-ातील अधि□री □डो□ संपत्ती □ोळा □रतात आ□ आम्ही लो□प्रति-िधी म्ह□-ा अशा विधेय□ल पाठिंबा दे□र, असाच यातू-ा अर्थ □ढावा ला□ल. शास-ा यासंबधा-ो शाश्वती दे□र आहे □य □ हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

पहिला प्रयो□ आहे. अशाप्र□रचा प्रयत्-न □वळ मा□सि□च्या आधारावर □लेला आहे. अ-य ठि□□च्या शहरातील अ-धिकृ□त बांध□मां-ना तो कायदा ला□ू होणार -नाही. ठा□ येथील -गौपाडा भा□मध्ये आर.सी.सी.च्या चार इमारती अ-धिकृ□तरित्या बांधलेल्या आहेत, त्या इमारती □धी □सळतील हे सां□ा येत -नाही.

(वेळ संपत आल्याची बेल वाजवि□यात येते.)

मुंबई शहरामध्येही अ-धिकृ□त बांध□मे झालेली आहेत, त्यामधू-न अनेक समस्या -निर्मा□ झालेल्या आहेत. याबाबत काही शासनातील अधि□ऱ्यांची नावे घेऊन सां□ू इच्छितो की, त्यांनी □डि□ंज संपत्ती -निर्मा□ □लेली आहे, त्यांची चौ□शी झाली पाहिजे.

या-नंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

सगळया प्रमुख शहरांमध्ये अनधिकृत बांधकामे झालेली आहेत आणि त्यामुळे समस्या निर्माण झ ालेल्या आहेत. शासनाचे जे अधिकारी आहेत ते पैसे घेतात. यासंदर्भात अनेक नावे सांगू शकतो. ज्या लोकांनी गडगंज संपत्ती गोळा केली आहे त्यांची चौकशी करावी. हा विषय मर्यादित असल्यामुळे या विषयाला फाटे फोडण्याचा माझा उद्देश नाही. किती पैसे दिल्यानंतर अनधिकृत बांधकाम कसे अधिकृत होते याचे तक्ते ठरलेले आहेत. एवढया मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचार चालू आहे. तुम्ही राज्यकर्ते आहात. आम्ही या ठिकाणी आमच्या व्यथा मांडावयाच्या पण त्याबाबत इलाज कोणी करावयाचा ? आम्ही या ठिकाणी प्रश्न मांडतो परंतु त्याबाबतीत इलाज करण्यासाठी जे करावे लागते ते होत नाही. आपण विधेयकाच्या उद्देश व कारणे यांच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सन 1960 साली उल्हासनगर नगरपालिकेची स्थापना झाली. या शहरासाठी विकास नियंत्रण विनियम, 1974 मध्ये प्रसिध्द करण्यात आले. तलपृष्ठ निर्देशांक 1.00 इतका देण्यात आला होता. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या उल्हासनगर शहराच्या, विकास आराखड्यामध्ये असे नमूद केले आहे की, 7 चौरस किलोमीटरच्या विद्यमान निवासी क्षेत्रामध्ये 4,73,000 इतकी लोकसंख्या पसरली आहे. म्हणजे प्रति हेक्टर 700 व्यक्ती एवढी घनदाट वस्ती आहे. आपण कायद्याने जी व्यवस्था निर्माण केलेली आहे किंवा जी योजना आखलेली आहे त्याबाबत आमच्यासमोर एक प्रश्न निर्माण होतो. विधेयकाच्या खंड 4 (1) मध्ये असे म्हटले आहे की, अनधिकृत विकासकाम पुढीलपैकी कोणत्याही जमिनीवर करण्यात आले असल्यास, कलम 3 च्या पोट-कलम (3) अन्वये ते अनधिकृत विकासकाम नियमाधीन करण्यात येणार नाही. यासंदर्भात काही अटी दिलेल्या आहेत. सगळी बांधकामे तपासून झाल्यानंतर जर कोणी अनधिकृत बांधकाम केले किंवा सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे आताही अनधिकृत बांधकामे चालू आहेत, ती बांधकामे थांबविणार असाल तर ते थांबविण्यासाठी इलाज करणार काय ? जे लोक अनधिकृत बांधकामे जनरेट करीत असतील त्यांच्या बाबतीत काही कारवाई करणार काय ? त्यांना तुरुंगात बसवणार काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. हे लोक कोण असतात ? आपण झोपडपट्टी दादा असा उल्लेख करतो. हे शहरातील दादा लोक आहेत. त्यांनी संपूर्ण शहराची वाट लावलेली आहे. त्यांनी पैसे गोळा केलेले आहेत. सन्माननीय सदस्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ MAP/ SBT

श्री. मधुकर सरपोतदार .....

श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले की, तेथील नगरपालिकेची इमारत सुध्दा अनधिकृत आहे. इतक्या धाडसाने सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विधान केलेले आहे. सन्माननीय सदस्य हे तेथील रहिवासी असल्यामुळे ते बांधकाम अधिकृत आहे की, अनधिकृत आहे हे सांगू शकतील. अनधिकृत बांधकामे हे तेथील रस्त्यावरची परिस्थिती बिकट होण्याचे एकमेव कारण आहे. जाब विचारणारे कोणी अधिकारी त्या ठिकाणी नाहीत. आयुक्त म्हणून कोणी अधिकारी त्या ठिकाणी जाण्यास तयार नाहीत. उल्हासनगरची ही परिस्थिती का निर्माण झाली ? याचा शोध शासन घेणार काय ? जी अनधिकृत बांधकामे आहेत ती आपण नियमित करणार आहात. त्यांना कायद्याच्या कक्षेमध्ये बसवणार आहात. लोकाकडून काही तरी मोबदला घेऊन ती बांधकामे नियमित करणार आहात. ते लोक त्या ठिकाणी राहतील. पण उद्याचे काय ? असा प्रश्न निर्माण होणार आहे. माननीय मुख्यमंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. खरे म्हणजे हे प्रश्न त्यांना विचारावयास पाहिजेत. कारण या खात्याचे ते कॅबिनेट मंत्री आहेत. त्यांनी या सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यावयास पाहिजेत. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री उत्तर देणार आहेत. आम्ही या पध्दतीने कारभार करणार आहोत असे रेकॉर्डवर येऊ द्या. आम्ही या पध्दतीने कारभार करीत आहोत आणि असा कारभार केल्यानंतर कोणी जर त्याचा भंग केला, आम्ही केलेल्या तरतुदीच्या विरोधात कोणी काम केले तर त्याचा कायद्यानुसार बंदोबस्त करु असे ठोस आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांकडून या सदनामध्ये दिले जाणार आहे काय ? मी या निमित्ताने मुंबईतील एक बांधकाम सांगितले. त्या बांधकामाकडे लक्ष द्यावे. पाहिजे तर मी त्याबाबतीत पत्र देईन. जे पत्र मी महानगरपालिकेच्या आयुक्तांना दिलेले आहे त्याबाबतीत लक्ष घातले तर अशा प्रकारची अनेक अवैध, अनधिकृत बांधकामे मुंबई शहरामध्ये दिसतील. उल्हासनगरमध्ये जे झालेले आहे तसेच मुंबई शहरामध्ये झालेले आहे. त्याकडे लक्ष दिले पाहिजे. सर्व अधिकार महापालिका आयुक्तांकडे आहेत. महापौर काही करु शकत नाहीत. त्या ठिकाणी जे लोक सत्तेमध्ये आहेत त्यांना काही करता येत नाही. त्यांना काहीच काम करता येत नाही. महानगरपालिका आयुक्तांकडे, उपायुक्तांकडे आणि त्यांच्या जोडीला असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकडे सर्व अधिकार असल्यामुळे त्यांचा नाईलाज होतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ पूर्वी श्री.बरवड 19:00

(श्री. मधुकर सरपोतदार...)

सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी केलेल्या सूचने प्रमाणे जो या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवू शकेल आणि या सर्व गोष्टींना कायदेशीर वळण लावील असा एखादा आय.ए.एस.अधिकारी त्याठिकाणी नेमावा. या सर्व गोष्टी नियमामध्ये बसविण्याचा प्रयत्न होणार असल्यामुळे त्याबाबतीत लक्ष ठेवून विकास करावा लागणार आहे. उल्हासनगर शहरामध्ये अतिशय गरीब परिस्थितीमध्ये जीवन जगणारी जी माणसे आहेत त्यांना दिलासा मिळावा या माणूसकीच्या दृष्टीकोनातून या विधयेकाकडे आम्ही पाहात असल्यामुळे या विधेयकाला विरोध करता येत नाही. हे विधेयक संमत व्हावे असे वाटते. It is a very subjective matter. म्हणून शासन सर्व गोष्टींची काळजी घेणार असेल तर हे विधेयक मंजूर करावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

.......3I-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला-वासिम-बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदया, सन 2006 चे विधान सभा विधेयक क्रमांक 28, उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक पर विचार प्रकट करने के लिए मैं खड़ा हुआ हूँ.

सभापति महोदया, मेरी परिस्थिति माननीय सदस्य श्री. सरपोतदार जैसी है. न तो मैं इस विधेयक का विरोध कर सकता हूँ और न ही इसका समर्थन कर सकता हूँ. उल्हासनगर शहर के लिए यह जीने मरने का प्रश्न है. मैं इसका समर्थन इसलिए नहीं कर सकता, क्योंकि यह कायदे का उल्लघंन है. लेकिन जब वहां के लोगों के जान-माल के प्रश्न को सामने रखता हूँ और इस विधेयक में उल्हासनगर के लोगों का सहानुभूतिपूर्वक विचार किया गया है, इसके लिए इस विधेयक का समर्थन करना जरुरी है. मैं सभागृह के अन्दर इतना ही सूचित करना चाहता हूँ कि 5 वर्ष पहले माननीय मंत्री श्री. टोपे ने गरीब लोगों को, छोटे लोगों को और छोटे वर्गों को मद्देनजर रखते हुए, उनको फायदा देने के लिए गुंठेवारी रेगूलेशन एंड अप-ग्रडेशन एक्ट लाया था. इस एक्ट के माध्यम से गरीब लोगों के छोटे भूखंड को नियमित करने की सुविधा मिलेगी.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया.......

गुंठेवारी रेगुलेशन एंड अपग्रेडेशन एक्ट के अन्तर्गत समय सीमा निश्चित की गई थी लेकिन वह समय सीमा समाप्त हो जाने के बाद भी आज तक गुंठेवारी के मामले नियमित हो रहे हैं. इसका परिणाम यह हो रहा है कि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम की चौखट पूरी तरह छिन्न-भिन्न हो गई है. परिणाम स्वरुप चार एकड़, दस एकड़ वाले ले-आऊट भी पास हो रहे हैं, नियमित हो रहे हैं. यही परिस्थिति उल्हासलगर में भी निर्माण होने की संभावना है. आज इस सदन में उल्हासनगर के अनधिकृत निर्माण कार्य को नियमित करने के लिए बिल लाया गया है. इस बिल में अनधिकृत निर्माण कार्य को नियमित करने के लिए जनवरी, 2005 यह समय सीमा निश्चित की गई है. यानी जनवरी, 2005 तक के अनधिकृत निर्माण कार्य नियमित किए जा सकते हैं. लेकिन इसमें यह सभावना है कि जिन्होंने 2 या ढाई एफएसआय का उपयोग किया है वे अब चार एफएसआय तक बांधकाम शुरु करके इस कानून का गैरफायदा उठा सकते हैं. इसलिए मैं यह सुझाव देना चाहता हूं कि उल्हासनगर के अनधिकृत निर्माण कार्य को नियमित करने के लिए डेड लाईन निश्चित की जाए. दूसरी बात यह है कि, दो महीने या तीन महीने का समय निर्धारित किया जाए. इस अवधि के अन्दर जिन्होंने अनधिकृत निर्माण कार्य किए हैं, उन्हें अपने मकानों के नक्शे महानगरपालिका के कार्यालय में प्रस्तुत करने के संबंध में सूचना दी जाए. क्योंकि अगर इस प्रकार की सीमा निश्चित नहीं की जाएगी तो जिस प्रकार से गुंठेवारी कानून का उल्लंघन हो रहा है, उसी प्रकार से उल्हासनगर के लिए भी जो कानून बनाया गया है, उसका भी उल्लंघन होता रहेगा और अनधिकृत निर्माण कार्य को नियमित करने संबंधी प्रोसेस सालो-साल चलती रहेगी और वह प्रोसेस कभी खत्म नहीं होगी. अनधिकृत निर्माण कार्य होते रहेंगे, विकास नियमावली का उल्लंघन होता रहेगा. तेज गति से अनधिकृत निर्माण कार्य होते रहेंगे. ये अनधिकृत निर्माण कार्य केवल इस शहर तक सीमित नहीं रहेंगे बल्कि पूरे महाराष्ट्र में अनधिकृत निर्माण कार्य होने लगेंगे. मैं आपको अकोला का उदाहरण देना चाहता हूं. आज अकोला शहर में करीब 10 हजार अनधिकृत मकान है. आज परिस्थिति ऐसी है कि इन अनधिकृत निर्माण कार्य को न तोड़ सकते हैं न नियमित कर सकते हैं. इसी का आधार लेकर पूरे महाराष्ट्र में हर जिले में अनधिकृत निर्माण कार्य करने के बाद उसे नियमित करने हेतु आपके पास संबंधित लोग दस्तक देने लगेंगे. ऐसी परिस्थिति निर्माण न हो, इस हेतु शासन को गंभीरता से विचार करना चाहिए.

..4



MSS/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ पूर्वी श्री.बरवड 19:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया.......

सभापति महोदय, मैं फिर से एक बार यह सुझाव रखना चाहता हूं कि उल्हासनगर के अनधिकृत निर्माण कार्य के संबंध में एक सीमा (जनवरी, 2005) निश्चित कर दी गई है. अब इस अवधि के बाद बने अनधिकृत निर्माण कार्य नियमित न किए जाए. दूसरा सुझाव यह है कि 3 महीने, 4 महीने या 6 महीने  इनमें से कोई एक समय सीमा निश्चित की जाए और इस समय सीमा के अंदर अपने अपने मकानों के नक्शे महानगरपालिका के कार्यालय में प्रस्तुत करने संबंधी सूचना दी जाए. अन्यथा आगामी 10 साल तक और उसके आगे भी अनधिकृत निर्माण कार्य चलते रहेंगे, नियमित होते रहेंगे, जिससे भयानक समस्या पैदा हो जाएगी. इसलिए अनधिकृत निर्माण कार्य संबंधी डेड लाईन निश्चित करनी चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

.......

इसके बाद श्री रावते का भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश जेथलिया यांच्या हिंदी भाषणानंतर)

श्री. दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरिता आणलेले हे विधेयक म्हणजे नपुसक सरकारचा जाहीरनामा आहे. हे सरकार या राज्यामध्ये काहीही करु शकत नाही,कशावरही निर्बंध आणू शकत नाही आणि कोणत्याही अनिर्बंधतेला आळा घालू शकत नाही तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखू शकत नाही हेच या विधेयकावरुन दिसून येईल. या बिलामध्ये तसे स्पष्ट शब्दात म्हटलेले आहे. निर्बुध्दपणाने सभागृहामध्ये कसे शब्द वापरतो याची महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील लोकप्रतिनिधी म्हणून आम्हांला लाज आणि शरम वाटते. बिलातील पृष्ठ 9 वर म्हटलेले आहे की," शहराची अफाट वाढलेली लोकसंख्या आणि मर्यादा असलेले निर्देशांक " येथपर्यंत शब्दरचना ठीक आहे. परंतु पुढे मात्र सरकारच्या नाकर्तेपणाचा पंचनामा आणि नपुसकतेचा पुरावा दिलेला आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी आपण किती अकार्यक्षम आहोत हे स्वत:च्या हाताने लिहिलेले आहे. बिलामध्ये "लोभी आणि विधिनिषेधशून्य बांधकाम व्यावसायिक" असे शब्द वापरण्यात आले आहेत. हे आम्हांला आणि तुम्हांला सर्वांनाच माहीत आहे तरीसुध्दा याठिकाणी या शब्दांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे "निष्काळजी स्थानिक प्रशासन" असाही शब्दप्रयोग करण्यात आला आहे. म्हणजे आपण किती नालायक आहोत हे याठिकाणी म्हटलेले आहे. स्वत:च्या कर्तव्यापासून परा:मुख होऊन पैसे घेऊन बेकायदेशीरपणाने अनधिकृत बांधकामांना सरळ परवानगी देणारे हे प्रशासन आहे. प्रशासन नावाचा कायदा या सदनाने मंजूर केला. हा कायदा महानगरपालिकेबाबत असेल किंवा अन्य खात्यांबाबत असेल या कायद्याचे उल्लंघन करुन काम कसे करावे हे या बिलाच्या माध्यमातून दाखविलेले आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

ज्या खात्याच्या अंतर्गत डी.सी. रुल्स तयार होतात ते रुल्स अधिकारी कसे पायदळी तुडवितात हे यातून पहायला मिळेल. एखादया शहरातील आरक्षणासंबंधीचा नकाशा नगरपालिका अथवा महानगरपालिका ज्यावेळी तयार करते हा विकास आराखडा तयार झाल्यानंतर संबंधित विभागाकडे मंजुरीसाठी येतो त्यावेळी मग खाली काय गोंधळ घातलेला असतो तो वर सुधारला जातो. त्यात आप्तेष्टांचे प्लॉट जर आरक्षणात असतील तर त्यांना मोकळे करण्यात येते आणि नको असलेले प्लॉट आरक्षित केले जातात. मग त्यातून शहरात बगीचा, शाळा इ. साठी आरक्षण दिलेले असते ते देखील कधी कधी काढले जाते. अशा विविध गोष्टी या आराखडयात असतात व प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना मूळ आराखडा बिनदिक्कतपणे पायदळी तुडविला जातो. हे पायदळी तुडविणारे जे कोणी असतील त्यांना आमचे निष्काळजी सरकार उघडया डोळयांनी पाहते व यातूनच बेकायदेशीर बांधकामांना ऊत येतो. प्रश्न असा आहे की, एवढे सर्व होते त्यावेळी महापालिकेचे व शासनाचे अधिकारी काय करतात ? सरकार काय करते ? उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामाबाबत नंदलाल समितीच्या अहवालामध्ये तेथील अनधिकृत बांधकामाबाबत चांगला पंचनामा केलेला आहे. ज्या वर्षात ही बांधकामे झाली त्या कालावधीत असलेल्या त्या त्या खात्याच्या सचिव आणि उप सचिव अथवा महानगरपालिकेचे आयुक्त व उपायुक्तांना हे दिसले नव्हते काय ? त्याबाबतची यादी शासनाकडे पाठविता आली नाही काय ? अशा विधिनिषेधशून्य माणसांची यादी मिळवायला कदाचित आपल्याला वेळ लागेल पण आपण नेमलेले शासनाचे अधिकारी तर तेथे होते की नाही ? या अहवालानुसार जवळपास 60 ते 70 अधिकारी अडकलेले आहेत. माननीय मंत्री महोदय येथे बोलत असतांना थोडयात वेळात ते ब्रिटीश काळापासून बोलत होते आणि 150 वर्षांचा काळ पार करुन ते पुढे आले, मी त्यांना मध्ये मध्ये अडविण्याचा प्रयत्न करीत होतो. माननीय मुख्यमंत्र्यांना मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, ग्रामीण भागातील अशा भागातून मी आलेलो आहे की, त्या ठिकाणचे खासदार आणि मी काम करतो त्या कामावर लोकांचा विश्वास आहे आणि हा विश्वास लक्षात घेता आपण तरी अशा प्रकारे येथे बोलू शकत नाही, माननीय मंत्री महोदय मात्र बिनधास्तपणे बोलून गेले. म्हणून या बिलाच्या संदर्भात बोलू नये अशीच माझी भावना होती. परंतु अशा प्रकारे मंत्री महोदय बिनधस्तपणे विनंती करतात याचे मला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

आश्चर्य वाटत आहे. मला वाटते महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर इतक्या वर्षांमध्ये एवढया नाकर्तेपणामुळे मांडलेले हे पहिलेच बिल असेल. म्हणून या बिलावर बोलावयाचे की नाही असे म्हणत असतांना वास्तविक विचार केला तर नैतिकदृष्टया हे सरकार अशा परिस्थितीत क्षणभरही सत्तेवर राहू शकत नाही म्हणून मला दोन शब्द बोलणे भाग आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी म्हटले ते खरे आहे. राज्यात लाखो कुटुंबे उद्ध्वस्त होत असतांना एखादा सामाजिक कार्यकर्ता पाहू शकत नाही, तशा प्रकारे निर्बंध न घालणारे सरकार सुध्दा आम्ही सहन करु शकत नाही. अशा प्रकारे नियम करतांना त्यांची अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहण्याची तसदी घेतली जात नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, इमारत बांधत असतांना तिची उंची किती असावी ? एखादयाला सवलत किती द्यावयाची ? जोत्याचे बांधकाम 5000 चौ.फूटापर्यंत असेल तर 2000 किंवा 3000 चौ. फूटापर्यंत त्या इमारतीचा घेर असला पाहिजे, त्यावर इमारत बांधतांना त्याच्या प्रत्येक मजल्यावर तेवढेच बांधकाम असते.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

एखाद्याने 5 हजार फुटामध्ये 5 निवासी गाळे केले असतील तर त्याच्यावर पुन्हा 4-4 माळे चढविले जातात. काही ठिकाणी तर व्यवस्थितपणे 500 ते 600 चौरस फूट क्षेत्र असलेल्या 8 मजली इमारती उभ्या राहिल्या आहेत. अशा इमारतींचे काय होणार आहे ? इमारतीच्या अनुज्ञेय उंचीपेक्षा अधिक असणाऱ्या दर अखंड मीटर (रनिंग मीटर) ला दोन हजार रुपये आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. साधारणपणे एक मजला तीन मीटरचा धरला तर सहा हजार रुपये द्यावे लागतील. तसेच वाहने उभी करण्यासाठी सवलत देणार आहात.

सभापती महोदया, या माध्यमातून एक वेगळा विषय मी मंत्रिमहोदयांना सांगणार आहे. मुंबई शहरात वाहने उभी करणे हा अत्यंत गंभीर विषय झाला आहे. त्यामुळेच मुंबईच्या विकास आराखडयामध्ये व्यवस्थितपणे बदल करण्यात आला आहे. मुंबईमध्ये पार्किंग व्यवस्था असल्याशिवाय इमारतीचा आराखडा मंजूर होत नाही. पार्किंगसाठी इमारतीमध्ये जागा सोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. हाच नियम ठाण्यालासुध्दा लागू करण्यात आलेला आहे. तसेच, किती चौरस मीटरमध्ये गॅरेज बांधायचे यासंबंधीचा देखील नियम होता. मुंबई महापालिकेमध्ये श्री.दत्ताजी नलावडे हे सुधार समितीचे अध्यक्ष असताना, मी व श्री.पुष्पकांत म्हात्रे हे स्थायी समितीमध्ये असताना हा विषय उचलून धरला होता. मुंबई शहरामध्ये 8 ते 9 हजार गॅरेजेस् आहेत. ती नियमित करण्याचा विषय होता. पण तो विषय हाताळला जात नाही.

सभापती महोदय, रहिवाशांची कीव मला मान्य आहे. शेवटी उल्हासनगरमधील एवढी कुटुंबे जाणार कुठे ? उल्हासनगर, कल्याण येथे गॅरेजेस्करिता सवलत आहे. 100 फुटाचा रस्ता 50 फुटाचा कसा झाला, 50 फुटाचा रस्ता, 25 फुटाचा कसा झाला ? याचे वास्तववादी वर्णन सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी केले आहे. उल्हासनगर मधील अनेक कुटुंब उद्धस्त होऊ नये म्हणून आपण कायद्यामध्ये बदल करीत आहोत. हे सर्व करीत असताना ज्यांनी 100 फूट रुंदीचा रस्ता अडविला आहे, अशा बेकायदेशीरपणे राहणाऱ्या लोकांना शासन तेथून उठविणार आहे काय ? असा माझा सवाल आहे. FSI साठी सिद्ध गणकानुसार जमिनीच्या बाजारमूल्याच्या 20 टक्के दर चौरस मीटरसाठी घेण्यात येणार आहे. या शहरामध्ये सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपले आयुष्य घालविले आहे. म्हणूनच त्यांनी यावर आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की, भूखंड एकाच्या नावावर असेल, तर इमारत दुसऱ्या नावावर असेल आणि फ्लॅट हा तिसऱ्याच्या नावावर असेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

म्हणजे नक्की धारक कोण आहे हे ठरवावयाचे कसे हा प्रश्न निर्माण होणार आहेच. त्यामुळे या विधेयकावर बोलावे किंवा बोलू नये या संभ्रमात मी होतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार म्हणाले ते खरे आहे. ज्यानी कोणी हे पाप केले आहे, तो सुटणार आहे. पण त्याचा जाच मात्र रहिवाशांना सोसावा लागणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 19:20

श्री.दिवाकर रावते....

दंडाची रक्कम योग्य की अयोग्य याची कितपत खोलवर चर्चा करावी हा प्रश्न निर्माण होत आहे. फीचा जो तक्ता दिलेला आहे त्यामध्ये क्रमांक-8 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, बाब क्रमांक 1 ते 7 वगळून इतर बाबी या अंतर्गत "राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करील अशी फी" असा उल्लेख आहे. म्हणजे हे डिस्क्रीएशन सरकारने स्वत:कडे ठेवले आहे. खात्याकडे, विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांकडे हे ठेवले आहे. त्यात कोणत्या सवलती द्यावयाच्या हे कोण ठरविणार ? मला वाटते ज्याला आपले भवितव्य घडवावयाचे आहे असे प्रभावी मंत्री नक्की ते ठरविणार आहेत.

महोदय, या विधेयकातील काही गोष्टींचा अर्थ स्पष्ट होणे आवश्यक आहे. पृष्ठ क्र.5 मधील खंड 4 मध्ये अनधिकृत विकासकामे कोणत्या परिस्थितीत नियमाधीन करण्यात येतील किंवा करण्यात येणार नाहीत या अंतर्गत खंड 4 (2) मध्ये असे म्हटले आहे की, "अनधिकृत विकासकाम पुढील बाबींशी विसंगत असेल तर ते नियमाधीन केले जाणार नाही :-

(क) संबंधित कायद्याखालील आग सुरक्षा उपाययोजना ; आणि

परंतु जर आग सुरक्षा उपाययोजनाच त्या ठिकाणी नसेल तर काय करणार आहेत ? कारण त्या ठिकाणी मोकळी जागाच नाही. दोन इमारतींमध्ये थोडीशीही जागा रिकामी नाही. दोन इमारतींमधून रस्त्यांवरील बत्तीचे खांब बाहेर आलेले आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत फायर-फाईटचा प्रश्न येतोच कोठे ? तसेच एफ.एस.आय.4.00 पेक्षा अधिक ठेवण्यात आला आहे. याबाबत आपण काय करणार आहात या संदर्भातील खुलासा माननीय मंत्री महोदय आपल्या भाषणामध्ये करतील काय ?

खंड 4 (4) मध्ये असे अंतभूत आहे की, "पोट-कलम (2) च्या खंड (ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास, अनधिकृत विकासकाम नियमाधीन करण्याच्या प्रयोजनासाठी, अनधिकृत विकासकामांमध्ये पुढील तरतुदी करण्याचे निदेश देता येतील :-

(क) पाण्याची साठवण करणाऱ्या टाकीसाठी आणि अग्निशमन पंप बसविण्यासाठी कोणतीही जागा नसणाऱ्या आणि सुटका करुन, घेण्यासाठी पर्यायी मार्गाची कोणतीही तरतूद नसणाऱ्या किंवा स्थिर अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी कोणतीही तरतूद नसणाऱ्या, संपूर्ण 100 टक्के क्षेत्र बांधकाम क्षेत्र (बिल्ट-अप-एरिया) वापरलेल्या इमारतीच्या बाबतीत, पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास...."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

याचा अर्थ 100 टक्के क्षेत्र वापरलेले आणि एफ.एस.आय. क्रॉस केलेले असे म्हटले आहे. पूर्वी आपण चटईक्षेत्र 1.00 देत होतो. परंतु आज त्यांनी तेच क्षेत्र 4, 8, 10 इतके बांधले आहे. परंतु या विधेयकामध्ये मात्र 100 टक्के चटईक्षेत्र बांधकाम वापरलेल्या इमारतींच्या बाबतीत असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच पुढे असाही उल्लेख आहे की, "पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास, उल्हासनगर शहराच्या महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन, त्या व्यक्तीला निदेश देऊन, अशा निदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये, निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा आग सुरक्षाविषयक उपाययोजनांची, तरतूद करण्यास सांगता येईल ;

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना मी विचारु इच्छितो की, खरोखरच निदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीमध्ये हे होईल काय ? कारण असे करण्यास जागाच शिल्लक राहिलेली नाही. तसेच पुढे (ख) मध्ये असाही उल्लेख करण्यात आला आहे की, "ज्या संकुलामधील इमारतींमध्ये पाण्याची साठवण करणाऱ्या जमिनीखालील टाक्यांच्या बांधकामासाठी आणि अग्निशमन पंप बसविण्यासाठी जागा उपलब्ध नाही, परंतु सुटका करुन घेण्याचे पुरेसे पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत, अश इमारतींच्या बाबतीत, पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास, त्या व्यक्तीला निदेश देऊन, अशा संकुलामध्ये उचित ठिकाणी पाण्याची साठवण करणारी सामाईक टाकी आणि अग्निशमन पंप यांची, निदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत तरतूद करण्यास सांगता येईल ;

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदया, तीन महिन्यांत टाकी बांधायची. इमारती वेगवेगळ्या, रहिवाशी वेगवेगळे. सोय नसेल तर कॉमन टाकी बांधावयाची. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, फायर ॲक्ट अंमलात आला आहे. तो ॲक्ट आणण्याचा आग्रह मी धरला होता. सभापती महोदया, मुंबईमधील फायर संदर्भात अनेक लूपहोल्स आहेत. त्यामध्ये अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे देखील झालेली आहेत. 8 किंवा 9 मजले असलेल्या इमारतींमध्ये काही घडल्यास कोणत्याही प्रकारची उपकरणे नाहीत. सभापती महोदया, आज सात मजल्यांच्या इमारती बांधल्या जात आहेत. तरी, त्या इमारती बांधत असताना त्या संदर्भात कोणते निकष असावेत या देखील महत्वाच्या बाबी आहेत, केंद्राने फायर ॲक्ट आणला आहे. आपणही तो कायदा आणत आहोत. आपण एकीकडे आता हा कायदा आणत आहोत आणि दुसरीकडे फायर ॲक्टला छेद देणाऱ्या दुसऱ्या गोष्टी करत आहोत. सभापती महोदया, कोर्टाने आदेश दिल्यावर, त्यावर मात करण्यासाठी या ठिकाणी क्लॉज टाकलेला आहे. सभापती महोदया, विधेयकाच्या कलम 5 मधील पोट कलम 2 मध्ये असे लिहिण्यात आले आहे की, " कलम 3 अन्वये अशाप्रकारे अनधिकृत विकासकाम नियमाधीन केल्यावर, उल्हासनगर शहर महानगरपालिकेने कोणत्याही न्यायालयात दाखल केलली व न्यायालयात प्रलंबित असलेली सर्व न्यायालयीन प्रकरणे किंवा इतर कार्यवाही, जेथवर अनधिकृत विकासकामाशी संबंधित असेल तेथवर, समाप्त होईल. " यामुळे सगळ्या लिटिगेशन्स समाप्त होतील. हा एक भाग यामध्ये आलेला आहे. सभापती महोदया, शंका दूर करण्यासंदर्भातील हा महत्वाचा भाग आहे. विधेयकाच्या कलम 9 मध्ये असे म्हटले आहे की, " शंका दूर करण्यासाठी, याद्वारे, असे घोषित करण्यात येत आहे की, एखादे अनधिकृत विकासकाम या अधिनियमान्वये नियमाधीन करण्यात आल्यामुळे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये एखादी व्यक्ती कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कारवाईस पात्र असेल तर, त्यास बाध येणार नाही. " सभापती महोदया, ब्लॅकमेलिंग चालले आहे. ज्यांनी बेकायदेशीरपणे बांधकाम केलेले आहे, त्या कोणावर कारवाई करावयाची किंवा कोणावर करायची नाही याबाबत यामध्ये तरतूद केलेली आहे. यामध्ये अनेक तरतूदी आहेत. सभापती महोदया, ही कायद्यामधील व्यवस्था होईल, अशातील हा भाग नाही. मी आज आपल्यासमोर धोक्याची घंटा वाजवत आहे. उल्हासनगरमधील न्यायालयीन कारवाईमुळे

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

हजारो कुटुंबे बेघर होत आहेत. या कायद्याविषयी आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी म्हटले होते की, आपला हा पहिला व अंतिम कायदा आहे का ? याचा निर्णय झाला पाहिजे. सभापती महोदया, उल्हासनगरपेक्षा जास्त दाटीवाटीने असलेली, 90 टक्के बेकायदेशीर असलेली आणि कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणारी एक वस्ती आहे आणि त्या वस्तीचे नाव मी जर घेतले तर सरकार म्हशीसारखे पाण्यात बसेल. सभापती महोदया, ती वस्ती मुंब्र्यामधील आहे. मुंब्र्यामध्ये देखील अशीच भयानक परिस्थिती आहे. सभापती महोदया, मंगला समितीप्रमाणे जर आता समिती नेमली तर गंभीर परिस्थिती निर्माण होईल. हा कायदा काही अंतिम राहणार नाही. प्रत्येक वेळी कायदा व सुव्यवस्थेमुळे सरकारच्या नाकर्तेपणाची, पळपुटेपणाची उदाहरणे मिळणार आहेत. सभापती महोदया, या विधेयकातील प्रत्येक कलमावर जेवढे सविस्तर बोलावे तेवढे कमीच होणार आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या बिलावर खूप काही बोलायचे असले तरी वेळेचे भान ठेवून मी माझे भाषण आटोपते घेतो. परंतु या निमित्ताने मी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यांचा शासनाने विचार करावा. ज्यांनी गुन्हा केला त्यालाच शिक्षा झाली पाहिजे, जो गुन्हेगार नाही त्यांना शिक्षा होता कामा नये. माणुसकीच्या दृष्टीकोनातून या बिलाचे स्वागत करीत असतांना भाषणाच्या शेवटी मी जे वाचून दाखविलेले आहे त्यामध्ये कितीही मोठी व्यक्ती असली तरी त्यांनी कायद्याचे पालन करावे, एखाद्या व्यक्तीने कायद्याचे पालन न केल्यास त्यांच्यावर आपण कडक कारवाई करणार आहात काय ? यासंदर्भातील खुलासा माननीय मंत्री महोदय करतील काय ? एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो..

---------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य व माझे सहकारी श्री. रामनाथ मोते यांनी उल्हासनगर शहराची परिस्थिती आपल्यासमोर मांडलेली आहे. ते त्या परिसराचे लोकप्रतिनिधी जरी असले तरी अनेक वर्षापासून उल्हासनगर शहरामध्ये वास्तव्य करीत आहेत. आज उल्हासनगर शहराची काय अवस्था आहे त्याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. या विधेयकाच्या संदर्भात असे म्हणता येईल की, "बैल गेला आणि झोपा केला" म्हणजे सगळे आधी घडून गेलेले आहे व आता कायद्याच्या माध्यमातून इमारती अधिकृत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या बिलाच्या "उद्देश व कारणे" यामध्ये उल्हासनगर शहर हे निर्वासितांचे व विस्थापितांचे शहर आहे असे म्हटलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मुद्दा क्रमांक 3 च्या संदर्भातील उल्लेख केलेला आहे त्याची पुनरावृत्ती मी करु इच्छित नाही. मंत्री महोदयांना माझा प्रश्न असा आहे की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये निर्वासित आणि विस्थापित लोक नाहीत काय ? उल्हासनगर शहराच्या बाबतीत अनधिकृतपणे बांधकामे झाल्यानंतर अनेक नागरिकांनी हरकती व तक्रारी शासनाकडे दाखल केल्या होत्या. त्यावेळी श्री. नंदलाल यांच्या अध्यक्षतेखाली मार्च 1999 मध्ये समिती नियुक्त केली होती. या संपूर्ण शहराचे गांभीर्य लक्षात घेऊन या शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई लवकरात लवकर व्हावी यासाठी समितीला अहवाल देण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. त्यावेळी श्री. नंदलाल हे महसूल व वन विभाग खात्याचे प्रधान सचिव होते. त्यांनी 3 महिन्यात या सर्व बाबींची माहिती घेऊन जवळ जवळ 35 पानांचा अहवाल तयार करुन आपले मत नोंदविलेले आहे. जवळ जवळ 68 प्रकरणांमध्ये दिवाणी खटले दाखल केलेले आहेत असे हे महाराष्ट्रातील एकमेव उल्हासनगर शहर असावे. इतर ठिकाणच्या शहरामध्ये नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन ते आपल्या लक्षात येईल, असे मला वाटते. श्री. नंदलाल यांनी जी चौकशी केली त्यात त्यांनी असा निष्कर्ष नोंदविला आहे की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकामे आहेत, उल्हासनगर येथील शासनाच्या भूमीवर, सार्वजनिक प्रयोजनासाठी असलेल्या जागांवर झालेली अनधिकृत बांधकामे, अतिक्रमित झालेली





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट...

बांधकामे, उल्हासनगर महापालिका अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या संगनमताने झालेली अनधिकृत बांधकामे, उल्हासनगर महानगरपालिका येथील आर्थिक परिस्थितीस जबाबदार असणारे घटक या सर्व माध्यमातून हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे. सदर अहवाल सन 1999 मध्ये शासनास सादर करण्यात आलेला आहे. तो अहवाल शासनाकडे सादर करुन आज जवळजवळ 7 वर्षे होत आहेत. तरी देखील शासनाने या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी का केली नाही हा माझा प्रश्न आहे ? उल्हासनगर येथील सर्व बांधकामे नियमित करावयाची होती म्हणून शासनाने हा अहवाल गुंडाळून ठेवलेला आहे, अशीच मला शंका येते. नंदलाल समितीच्या अहवालामध्ये असे नमूद केलेले आहे की, सार्वजनिक प्रयोजनासाठी एकूण 158 राखीव भूखंड उल्हासनगर शहरामध्ये होती. या 158 भूखंडापैकी जवळपास 140 भूखंडावर अनधिकृत वसाहती वसलेल्या आहेत. त्या वेळी महानगरपालिकेच्या कायद्यातील तरतुदींचा वापर करुन कारवाई का करण्यात आली नाही ? त्यावेळी नगरविकास खाते झोपलेले होते काय ? या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांना आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी लागतील.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ....

अशाप्रकारे मानवतेचा दृष्टीकोन समोर ठेऊन उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामे अधिकृत करीत असताना या महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी शहरे वसलेली आहेत, त्या ठिकाणी सुध्दा मी उपस्थित केलेल्या दोन मुद्दांचा प्रश्न निर्माण होतो. अशाप्रकारचा प्रेसिडंट आपण सर्व ठिकाणी स्वीकारणार आहात काय ? असा माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे. सभापती महोदया, या संदर्भात विकास आराखडा व विकास नियमावली आहे. ही सर्व अनधिकृत बांधकामे काही एका रात्रीत झालेली नाहीत. यावेळी त्या ठिकाणी असलेले महानगर प्रशासन काय करीत होते ? महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी काय करीत होते ? या सर्व गोष्टींवर अंकुश ठेवणारे नगरविकास खाते काय करीत होते ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात, हे एकप्रकारचे संपूर्ण रॅकेट असल्याचा उल्लेख केला होता. उल्हासनगरमधील अनधिकृत इमारती आणि बांधकामावर अत्यंत संथगतीने कारवाई करणा-या उल्हासनगर महापालिकेसह राज्य शासनावर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जबरदस्त ताशेरे ओढले होते. दरम्यान, ही सर्व बांधकामे तातडीने पाडली जावीत या उच्च न्यायालयाने दिलेल्या पहिल्या आदेशावर खंडपीठ ठाम असून आता या कारवाईचे नियमन करण्याची जबाबदारी खंडपीठाने राज्याच्या नगरविकास खात्याच्या प्रधान सचिवांवर सोपवली आहे. यापुढे कारवाईत महापालिकेने हयगय केल्यास प्रधान सचिवांना जबाबदार धरण्यात येईल असे न्यायालयाने आपल्या आदेशात सांगितले आहे. परंतु अशाप्रकारे न्यायालयाने निदेश दिलेले असताना सुध्दा सर्व निदेश धाब्यावर ठेऊन उल्हासनगर येथे अनधिकृत बांधकामे केली जात होती. यावेळी कोणत्याही प्रकारची कारवाई का करण्यात आली नाही ? असा माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अनधिकृत बांधकामे पाडण्याच्या निर्णयावर खंडपीठ ठाम असताना सुध्दा ही अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई कोणी थांबवली ? या संदर्भात नगरविकास खात्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली असताना सुध्दा त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही ? या प्रकरणी दि.24 जानेवारीपर्यंत संपूर्ण अहवाल देण्याचे निदेश झालेले असताना सुध्दा त्याबाबत संबंधिताना निदेश का देण्यात आले नाहीत ? या अनधिकृत बांधकामाच्या संबंधी जबाबदार असणा-यांवर कडक कारवाई करण्यात यावी असे सांगण्यात आलेले असताना सुध्दा संबंधितांवर कोणतीही कारवाई का करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ....

आली नाही ? सभापती महोदया, या संपूर्ण शहरामध्ये नाला वाहतो आणि जमीनही नाही, अशा ठिकाणी स्लॅब उभारुन, रस्त्याला खेटून अनधिकृत इमारती बांधण्यात येऊन एफएसआयला बगल देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशा प्रकारे मोठमोठी बांधकामे झालेली आहेत. सभापती महोदया, कायदा धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकामे झाली असतील तर ती नियमित होण्यासारखी नाहीत. ही अनधिकृत बांधकामे कोणत्या कायद्यात बसवून अधिकृत केली जाणार आहेत ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहाला माहिती सांगण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणी दि.1/1/2005 अशी कट ऑफ डेट दिलेली आहे. ही कट ऑफ डेट देत असताना त्या ठिकाणी काही सर्वेक्षण करण्यात आलेले आहे काय ? सन 1995 पर्यंतच्या झोपड्या नियमित करणार असे सांगण्यात आल्यानंतर सगळीकडे झोपडपट्ट्या झाल्या आहेत. अशाप्रकारची जर परिस्थिती निर्माण होणार असेल तर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितलेली बाब अतिशय गंभीर आहे. सभापती महोदया, एमआरटीपीच्या माध्यमातून काही ठिकाणी असलेल्या अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई केली. परंतु ज्यावेळी ही अनधिकृत बांधकामे करण्यात येत होती, त्यावेळी नगरविकास खाते काय करीत होते ? तेथे नगरपालिका प्रशासन अस्तित्वात होते काय ? हा सर्व महत्वाच्या प्रश्नांच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या भाषणात उल्लेख करणे गरजेचे आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

----------------

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, रामनाथ मोते, अनंत तरे, मधुकर सरपोतदार, गोपीकिसन बजोरिया, दिवाकर रावते आणि विलास अवचट यांनी या विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेतला. त्यांनी काही चांगल्या सूचना निश्चितपणे केलेल्या आहेत तसेच काही प्रश्न देखील उपस्थित केले आहेत. सभापती महोदया, या ठिकाणी बहुतांश चर्चा ही नंदलाल समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने झाली आहे. नंदलाल समितीच्या माध्यमातून जी अनधिकृत बांधकामे समोर आली वा जी काही बेकायदेशीर बांधकामे, अनधिकृत बांधकामे झाली त्यांना उघड्या डोळ्याने कशा पद्धतीने पाहतो आहोत किंवा त्या विरोधात जी कारवाई करणे अपेक्षित होते ती का केली नाही ? नंदलाल समितीने जो अहवाल दिला होत्या त्याबाबतीत आपण काय कारवाई केली ? असे काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आले. सभापती महोदया, मी या ठिकाणी एका एका प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. नंदलाल समितीच्या माध्यमातून एकंदर 97 अधिकारी आणि कर्मचारी यांना समितीने दोषी धरलेले आहे. या 97 पैकी उल्हासनगर नगरपालिका प्रशासनातील 83 अधिकारी आणि कर्मचारी होते आणि प्रतिनियुक्तीवर आलेले 14 अधिकारी आहेत. त्यातील ज्यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे असे एकंदर 38 कर्मचारी आहेत आणि त्यांच्यावर दोष सिद्ध झालेले आहेत आणि त्यांना शिक्षा देखील देण्यात आलेली आहे. 39 कर्मचाऱ्यांविरोधात दोषारोप सिद्ध इ ाालेले नाहीत त्यामुळे त्यांना दोषमुक्त करण्यात आलेले आहे. दोन कर्मचाऱ्यांच्या विरोधात फेरचौकशी सुरू आहे आणि 4 कर्मचारीची विभागीय चौकशी पूर्ण होऊन अंतिम कारवाई होत आहे. असा हा एकंदर 83 कर्मचाऱ्यांबाबतचा अहवाल आहे आणि प्रतिनियुक्तीवर आलेल्यांपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणातील 7 कर्मचारी असून, 6 कर्मचारी हे महसूल विभागाचे आहेत तर एक अधिकारी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत काम करणारा आहे. बहुतांश ठिकाणी चौकशी चालू आहे आणि ती अंतिम टप्प्यामध्ये आहे. सभापती महोदया, मी या ठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की, निश्चितपणे लौकरात लौकर ही कारवाई पूर्ण केली जाईल आणि चौकशी समितीचा जो काही अहवाल असेल त्यानुरूप संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यास शासन कुचराई करणार नाही आणि कोणालाही यामध्ये पाठीशी घातले जाणार नाही. त्याचप्रमाणे बिल्डर्स आणि आर्किटेक्टस्च्या बाबतीत देखील मी सांगू इच्छितो की, या बेकायदा बांधकामांच्या बाबतीत संबंधित

...... 3क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

असलेल्या बिल्डर्स आणि आर्किटेक्टस्ना हुडकून काढून त्यांच्यावर कारवाई करण्याची देखील खबरदारी आपण घेणार आहोत, घेत आहोत. तेथे असलेला 4 एफएसआय आणि त्यावरील एफएसआयचे काय होणार असा अनेकांचा या ठिकाणी प्रश्न आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी 4 एफएसआय च्या वर बऱ्याच इमारती आहेत. जवळपास 88 इमारती या 4 एफएसआयच्या वर आहेत आणि या अधिनियमामध्ये किंवा या विधेयकामध्ये जी तरतूद आहे ती 4 एफएसआय पर्यंतचेच अनधिकृत, बेकायदा बांधकाम नियमाधीन करण्यासाठीची आहे. त्या वरील एफएसआय असलेल्या इमारती या एमआरटीपी आणि बीपीएमसी कायद्याच्या अनुषंगाने कारवाईस पात्र आहेत. त्यामुळे 4 एफएसआयच्या वर असलेल्या इमारती निष्कासनाची कारवाई करण्यास पात्र आहेत. सभापती महोदया, या ठिकाणी रस्त्यांचा उल्लेख करण्यात आला. तेथे असलेला 100 फूटांचा रस्ता आज 35 फूटांचा राहिलला आहे आणि बाकी भागावर अनेक अनधिकृत, बेकायदा बांधकामे झालेली आहेत. आता या विधेयकामध्ये या संबंधात अशी तरतूद आहे की, रस्त्यावरील बांधकाम अनधिकृत असेल तर ते नियमाधीन करता येणार नाही. त्यामुळे ते अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्याचा प्रश्नच येत नाही. रस्त्यावर येणाऱ्या बेकायदा, अनधिकृत बांधकामांवर आपल्याला कायद्याने कारवाई करता येणार आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदय याठिकाणी जे निवेदन करीत आहेत त्यावर या सदनाने विश्वास कां ठेवावा असा प्रश्न निर्माण झाला आहे? शासनाने 14 जानेवारी 2006 रोजी अधिसूचना काढल्यानंतर एप्रिल महिन्यापर्यंत शासनाला यासंबंधी कारवाई करण्याचे अधिकार मिळाले होते. परंतु शासनाने मागील तीन महिन्यात यासंबंधी कोणतीही कारवाई केली नाही हा महत्वाचा भाग आहे. आम्ही आपणास आर्किटेक्टची यादी दिल्यानंतर त्यामधील दहा जणांवर कारवाई केली, त्यांचे परवाने रद्द केले आणि बाकीच्या आर्किटेक्टची छाननी करीत आहोत अशाप्रकारचे उत्तर आपण सांगितले असते तर सरकारचा मनोदय सभागृहामध्ये स्पष्ट झाला असता.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सभागृहामध्ये अतिशय जबाबदारीने सांगत आहे की, याबाबतीत कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणतीही दिरंगाई होणार नाही. आज प्राधान्याने सर्वच अनधिकृत इमारतींना नोटीसेस देण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्याबाबतीत कुचराई करणार नाही हे यामध्ये निश्चितपणे स्पष्ट झाले आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी 100 फूटाच्या रस्त्याबाबत प्रश्न उपस्थित केला, आणि त्याबाबत आपण काय कारवाई करणार आहात असा प्रश्न विचारला होता? आपण त्या ठिकाणी कारवाई करा किंवा करु नका परंतु हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करुन देण्यासाठी किती कालावधी लागणार आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, लवकरात लवकर हा रस्ता निश्चितपणे मोकळा करुन दिला जाईल हे मी या सभागृहामध्ये विश्वासाने सांगतो. माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी राज्याच्या इतर शहरातील अनधिकृत इमारती अधिकृत करण्यासाठी किंवा नियमाधीन करण्यासाठी शासन पुढे विचार करील काय? असे विचारले होते. सभापती महोदया, या विधेयकामध्ये स्पष्ट तरतूद आहे की, अशाप्रकारची तरतूद ही कोणत्याही प्रकारे प्रिसिडंट असू शकणार नाही. उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आपण ही तरतूद केली आहे म्हणजे दुसऱ्या महानगरपालिकेची कार्यक्षेत्रे त्यामध्ये येतील अशाप्रकारची कोणतीही तरतूद या विधेयकात नाही. गुजरात पॅटर्न हा एका ठराविक शहरासाठी नसून संपूर्ण राज्यासाठी लागू केला असला तरी आपण फक्त उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील बांधकामे नियमाधीन करण्यासाठी तरतूद केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी राज्यामध्ये नागपूर, मुंबई व इतर शहरांसाठी तीन प्रकारचे वेगवेगळे ॲक्ट असून त्यापैकी एकच मॉडेल ॲक्ट आपल्याला करता येईल काय? अशी सूचना केली आहे. त्यांची सूचना चांगली असून केंद्र सरकारच्या नगर विकास विभागाने देखील अशाप्रकारची सूचना केली असून त्यांनी एक मॉडेल ॲक्ट पाठविला आहे. त्याबाबत नगर विकास विभागाकडून विचार करण्यात येत असून लवकरात लवकर तीन वेगवेगळया अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा एकच मॉडेल ॲक्ट कसा करता येईल याबाबत निश्चितपणे विचार करीत आहोत.

सभापती महोदया, बहुतांशी माननीय सदस्यांनी या विधेयकावर आपले विचार व्यक्त केले. त्यामध्ये एक कमिटी प्राधिकृत केली असून डेसिग्नेटेड ऑफिसरना नियमाधीन करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या अधिकाऱ्यांकडून मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होऊ शकतो अशाप्रकारचे प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्याचप्रमाणे किती दिवसात ही अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणार असेही विचारण्यात आले. सभापती महोदया, विधेयकातील तरतूद अतिशय स्पष्ट आहे की,डेसिग्नेटेड ॲथॉरिटीने तीन महिन्याच्या आत अनधिकृत इमारतींतील लोकांना नोटीसेस द्यावयाच्या आहेत. त्यानंतर त्यांना 60 दिवसांची मुदत देण्यात आली असून त्या 60 दिवसामध्ये त्यांनी उत्तर देण्याचे किंवा प्रस्ताव सादर करण्याचे, किंवा कंप्लायन्स करण्याची आवश्यकता आहे. जे लोक 60 दिवसाच्या आत हे काम करणार नाही त्यांच्यावर एमआरटीपी, बीपीएमसी ॲक्टमधील तरतुदीच्या अनुषंगाने कारवाई करण्याची तरतूद आहे. त्यामुळे एकंदरीत 90 दिवसाच्या आत नियमाधीन करण्याची तरतूद आहे. हायकोर्टाने जो निर्णय दिला आहे त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, नियमाधीन करण्याची कारवाई 18 महिन्यात पूर्ण केली पाहिजे.

सभापती महोदया, जी डेसिग्नेटेड ॲथॉरिटी आहे तिला मदत करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती देखील आहे.त्या समितीमध्ये फायर ॲडव्हायजर, टाऊन प्लॅनिंग स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व सेवानिवृत्त झालेले तज्ज्ञ असून त्यांना राज्य शासनाच्या माध्यमातून एक्सपर्ट कमिटीवर नेमले जाणार आहे. ही कमिटी प्रत्येक प्रस्तावाची छाननी करुन त्यानंतर प्रस्ताव नियमाधीन करण्याचे काम त्या ठिकाणी होणार आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 19:50

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु..

स्क्रुटीनी करुन त्यानंतर पुन्हा अधिनियमीत करण्याचे काम झाले. त्यामुळे त्यामध्ये भ्रष्टाचार होऊन चुकीच्या पध्दतीने काम होऊ शकेल असे नाही. या विधेयकामध्ये त्याबाबतची काळजी घेण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोते साहेबांनी असे सांगितले की, आजही "कट आऊट "डेटच्या पलीकडे जाऊन उल्हासनगरामध्ये काही अनधिकृत बांधकामे चालू आहेत. सन्माननीय सदस्य, हे त्या ठिकाणी वास्तव्य करतात, त्यामुळे तशी वस्तुस्थिती असू शकेल. परंतु सभापती महोदया, आपण तेथील परिस्थिती लक्षात घेऊन, सहानुभूतीने विचार करुन, हे विधेयक सभागृहात विचारार्थ आणलेले आहे. परंतु ठराविक तारखेच्या नंतर त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे होत असतील तर त्याची अत्यंत गंभीरतेने नोंद घेऊन कडक कारवाई केली जाईल. मी असे नमूद करु इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीमध्ये कट आऊट डेटच्या नंतर अनधिकृत बांधकामामध्ये वाढ होणार नाही, या दृष्टीने अत्यंत गंभीरतेने याबाबतची नोंद घेऊन कारवाई करण्याच्याबाबतीत शासन निश्चितपणे कटिबध्द आहे, एवढेच मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो.

सभापती महोदया, सर्वात कळीचा मुद्दा असा की, आज अनधिकृत इमारती कोणत्या आहेत, याबाबतचेशासन सर्व्हेक्षण करणार आहे काय ? असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.अवचट साहेबांनी उपस्थित केला. हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. रिमोट सेनसिंगचे काम करणे जरुरीचे आहे, ते जी. एस. आय.चे काम आहे. त्या संदर्भात डाटा बेस तयार करणे आवश्यक आहे. आजचे जे स्टेटस आहे, त्या अनुषंगाने पुढे त्यांना कारवाई करण्याच्या दृष्टीने मदत व्हावी, अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदया,या कामासाठी प्राधिकृत अधिकारी कलेक्टर, ठाणे हे आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी आहेत, त्यांची या कामाकरिता डेझिग्नेटेड ऑफीसर म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सभागृहाला माझी विनंती आहे की, हे विधेयक मंजूर करावे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, सनमाननीय राज्य मंत्री महोदयांनी विशिष्ट परिस्थितीमध्ये आणि विशिष्ट शहरासाठी हा कायदा असल्याचे मान्य केलेले आहे. आम्हाला अशी भीती वाटते की, अशा प्रकारचे सर्व महाराष्ट्रासाठी विधेयक शासन लागू करणार आहे की काय ? अशाप्रकारचा कायदा मंजूर झाल्यानंतर, दुसऱ्या शहरातील नागरिक या कायद्याचा संदर्भ देऊन सुप्रीम कोर्टामध्ये गेले तरी देखील त्यांना तेथे न्याय मिळणार नाही, या कायद्याचा आधार इतरत्र मिळणार नाही, अशाप्रकारची काळजी निश्चित स्वरुपामध्ये शासन घेणार आहे काय ?

10-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, हा कायदा फक्त उल्हासनगर शहरापुरता मर्यादित असणार आहे. तशाप्रकारची स्पष्ट तरतूद या कायद्यामध्ये केलेली आहे. त्यामुळे दुसऱ्या कोणत्याच शहराला तो लागू होणार नाही.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदया, मी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहून एक विनंती केलेली आहे. मी त्या पत्रात असे म्हटलेले आहे की, या कामासाठी आय.ए.एस. अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. सन्माननीय मंत्री महोदयांनी ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे ही जबाबदारी सोपविली असल्याचे आता सांगितले. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे, ही जबाबदारी देण्याबाबत माझा विरोध नाही. परंतु प्रश्न असा आहे की, त्यांच्याकडे असलेल्या दैनंदिन कामातून त्यांना या कामासाठी वेळ मिळणार नाही. उल्हासनगर येथे 40 हजार अनधिकृत इमारती आहेत, म्हणजे जवळजवळ 90 टक्के उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकामे आहेत. ती अधिकृत करण्यासाठी खास बाब म्हणून वेगळ्या यंत्रणेची, मी मागणी केलेली आहे. त्या ठिकाणी कॅम्प क्रमांक 1 ते 5 आहेत. म्हणून प्रत्येक वॉर्डवाईज अधिकारी नेमले पाहिजेत. हायकोर्टाने यासाठी वेळ दिलेला आहे, त्या वेळेमध्ये हे काम होऊ शकत नाही. म्हणून यासाठी स्वतंत्र आय.ए.एस.अधिकाऱ्यांची नेमणूक करुन त्यांच्या अखत्यारित वेगळी यंत्रणा निर्माण करावी, अशी माझी सूचना आहे, त्याप्रमाणे शासन विचार करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अत्यंत योग्य आहे. कारण कालावधीमध्येच, या सगळया गोष्टी करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा जरुर विचार केला जाईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 28 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 28 संमत झाले आहे.

--------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचें विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध विधेयक.

**L.C. BILL NO.XV OF 2003.**

**(A BILL TO PROVIDE FOR REGULATION OF TRANSFERS OF GOVERNMENT SERVANTS AND PREVENTION OF DELAY IN DISHCARGE OF OFFICIAL DUTIES.) AS AMENDED BY JOINT COMMITTEE.**

श्री. राजेश टोपे ( सामान्य प्रशासन, राज्यमंत्री ) : सभापती महोदया, संयुक्त समितीच्या प्रतिवृत्तानुसार असलेले सन 2003 चे वि. प. वि. क्रमांक 15 - शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, मी अत्यंत थोडक्यामध्ये या विधेयकाबाबत सांगू इच्छितो. महाराष्ट्र राज्य हे प्रगतिशील राज्य आहे. या विधेयकामध्ये दोनच मुद्दे आहेत. विधेयकाच्या "अ" भागामध्ये बदल्यांच्या दृष्टीकोनातून काही प्रोसीजर ले डाऊन करण्यात आली आहे. बदल्या कोणी करावयात ? बदल्या कशा पध्दतीने व्हावयास पाहिजेत ? बदल्या केव्हा व्हाव्यात ? या सगळ्यांच्या दृष्टीकोनातून या भागात तरतुदी केलेल्या आहेत. आज बदल्यांचा विषय हा शासकीय कर्मचारी असो, निमशासकीय कर्मचारी असो, त्यांच्या दृष्टीने महत्वाचा विषय असतो. यामध्ये भ्रष्टाचार होतो, यामध्ये अनेकांचा हस्तक्षेप होत असतो असे अनेकांचे म्हणणे असते. या गोष्टी लक्षात घेऊन त्याला कायदेशीर फोर्स असावा यादृष्टीने बदल्याचे विनियमन करण्याचा प्रस्ताव या माध्यमातून आणलेला आहे. संयुक्त समितीमध्ये या सभागृहाच्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

सल्लामसलतीच्या माध्यमातून हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. या विधेयकातील दुसरा जो भाग आहे त्यामध्ये ॲडमिनिस्ट्रेटीव रिफॉर्मचा विषय आहे. ज्याला आपण सिटीझन्स फोरम म्हणतो त्यापध्दतीने यामध्ये नागरिकांची सनद तयार करणे हा महत्वाचा विषय आहे. प्रत्येक कार्यालयामध्ये जे अधिकारी असतात त्यांचे काम काय असेल ? ज्यांच्या जबाबदाऱ्या काय असणार ? या सगळ्या गोष्टी त्यामध्ये आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 20:00

(श्री. राजेश टोपे पुढे सुरु...)

या सगळया गोष्टी त्यामध्ये ससमाविष्ट केल्या जाणार आहेत. एक रिस्पॉन्सिव्ह, अकौण्टेबल आणि पारदर्शक ॲडमिनिस्ट्रेशन निर्माण करण्याच्यादृष्टीने ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्म्सचा "ब" पार्टमध्ये समावेश केलेला आहे. तेव्हा हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 16 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2003चे वि.प.वि.क्रमांक 15 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2003चे वि.प.वि.क्रमांक 15 संमत झाले आहे.

----

**<u>नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत</u>**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 20:00

**अर्धातास चर्चा**

**पृ.शी.**: महाराष्ट्रातील पूरग्रस्त परिस्थितीत शासनाचे आपत्कालीन व्यवस्थापन अपयशी ठरल्याबाबत

**मु.शी.**: "महाराष्ट्रातील पूरग्रस्त परिस्थितीत शासनाचे आपत्कालीन व्यवस्थापन अपयशी ठरल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9523ला दिनांक 21 डिसेंबर 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, "महाराष्ट्रातील पूरग्रस्त परिस्थितीत शासनाचे आपत्कालीन व्यवस्थापन अपयशी ठरल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9523ला दिनांक 21 डिसेंबर 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये चर्चा उपस्थित करीत आहे.

दिनांक 26 जुलै, 2005 रोजी मुंबईमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुराने हाहाकार माजला, शासनाने मुंबई शहराकरिता तयार केलेला आपत्ती व्यवस्थापन आराखडा कोलमडून पडला, त्यामुळे मुंबई पूर्णपणे जलमय झाली, प्राण व वित्त हानी झाली. शासन या गंभीर परिस्थितीवर कोणताही काबू ठेऊ शकले नाही. या सर्व गोष्टींना कारणीभूत म्हणजे मिठी नदी. पवसा अगोदर शासनाने मिठी नदीवर असणा-या अनधिकृत बांधकामांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्यामुळे मिठी नदीच्या पात्राची रुंदी कमी झाली. शासनाने ही बांधकामे अद्यापपर्यन्त पाडलेली नाहीत. तसेच चितळे समितीच्या अहवालांचे पालन न करता मनमानी करुन कामाची कंत्राटे देण्यात आली, मिठी नदीच्या सफाईचे व रुंदीकरणाचे काम युध्द पातळीवर करण्याची गरज आहे. पावसाळा सुरु होण्याला आता फक्त पासष्ठ दिवसच राहिलेले आहेत. हा प्रश्न गांभिर्याने सोडविण्याची गरज आहे. अन्यथा 26 जुलै 2005 ची पुनरावृत्ती होऊ शकते. हा विषय सार्वजनिकदृष्टया महत्वाचा असल्याने मी यावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदया, मी फक्त एक-दोन गोष्टींकडेच माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधीत आहे. मिठी नदी प्राधिकरणाच्या कामाला माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते सुरुवात झाली.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 20:00

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु.....)

1200 कोटी रु.ची कामे असताना केवळ 60 कोटींची कंत्राटे देण्यात आली. माझ्याकडे असलेले पुस्तक मी माननीय मंत्री महोदयांकडे देणार आहे. मिठी नदी प्राधिकरणाच्या कामाला जेव्हा सुरुवात करण्यात आली त्यावेळी 1995 पूर्वीची तसेच 2002 सालापर्यन्तची जी बांधकामे आहेत त्यांना पर्यायी जागा देण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले होते. त्या दिवसापासून आपल्याला मोफत जागा मिळणार अशी काही लोकांची भावना झाली. मी 8मार्चला माहिती घेतलेली असून त्यासंदर्भातील फोटो देखील माझ्याकडे आहेत. लॅण्ड ग्रॅबींग ऑपरेशन - प्रायव्हेट पार्टी स्टील पाईप बाऊण्ड्री इन्स्टॉलेशन -1 डेब्रीस डम्पींग बाय कॉन्ट्रॅक्टर इन मिठी नदी- याठिकाणी असे लक्षात येते की, ज्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी या कामाला सुरुवात केली त्या दिवसापासून मिठी नदीच्या दोन्ही बाजूला माहीम खाडीपासून, सी.एस.टी.रोड आणि पुढे कलिना पर्यन्त भराव टाकून जमिनी बळकावण्याचे प्रकार सुरु झालेले आहेत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 20:05

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदया, त्याचप्रमाणे एमएमआरडीए या कंपनीचे ठेकेदार जे अन्य ठिकाणी सुध्दा काम करीत आहेत. Debris dumped by M.R.D.A. contractors on Mithi river. साकीनाका येथे कोटयवधी रुपये खर्च करुन गाळ काढून टाकण्याचे काम सुरु केले आहे. हे काम 31 मे पर्यंत पूर्ण करण्याचा निर्णय झालेला आहे. मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीए दोन्ही यंत्रणा युध्द पातळीवर हे काम करीत आहेत. मिठी नदीला खोल करुन गाळ बाहेर काढला जात आहे. एमएमआरडीची यंत्रणा हा गाळ बाहेर टाकतात." परंतु आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय " अशी या कामाची अवस्था झालेली आहे. दुसरा एक प्रकार याठिकाणी लक्षात येत आहे आणि तो म्हणजे अनधिकृत बांधकामे सुरु झालेली आहेत. Debris and dumping and construction work going on at Mithi river bank - In spite of

" Stop work" Order of B.M.C.मुंबई महानगरपालिकेने फक्त नोटीस दिलेली आहे. परंतु अजून काम थांबलेले नाही. माझ्याकडे यासंदर्भातील जे फोटो आहेत ते सर्व 8 मार्च आणि 10 मार्च या तारखांचे आहेत. म्हणजे मार्च महिन्यातील हे सर्व प्रकार आहेत. एकीकडे शासनाकडून सांगण्यात येते की पुन्हा अशा प्रकारचा हाहा:कार उडणार नाही. 26 जुलै, 2005 रोजी केवढी भयानक परिस्थिती निर्माण झाली होती याची सर्वांना कल्पना आहे. मिठी नदीच्या दोन्ही काठावर अनधिकृत बांधकामे निर्माण झाल्यामुळे अंगाचा थरकाप उडविणारी स्थिती मुंबईकरांनी अनुभवली होती. असा प्रसंग गेल्या 100 वर्षांमध्ये कधीही आला नव्हता. शासनाने यापुढे अनधिकृत बांधकामे होणार नाहीत असे सांगितले. मुख्यमंत्री महोदयांनी गेल्या वर्षी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आम्हांला बांधकामांची यादी दिली होती. महापालिकेचे अति.आयुक्त श्री. पाटणकर यांच्या सहीने आम्हांला बांधकामांची यादी मिळाली होती. परंतु यातील अनधिकृत बांधकामे अजून पाडण्यात आलेली नाही तसेच जमीनदोस्त करण्यात आलेली नाहीत. मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. हे काम गेल्या 10-12 दिवसांपासून सुरु आहे. मिठी नदीच्या दोन्ही बाजूला असलेल्या निवासी आणि इतर बांधकामांना पर्यायी जागा देण्यात येणार आहेत अशा बातमीमुळे नदीच्या दोन्ही काठावर अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणावर सुरु आहेत. या सगळया बांधकामांना एमएमआरडीने नंबर सुध्दा दिलेले आहेत. 5032,5033 असे नंबर दिलेले आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी मिठी नदीतील गाळ काढून तिचा विकास करण्याबाबत सांगितले आहे. मिठी नदी जेथून उगम पावते तेथे

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 20:05

श्री. मधुकर चव्हाण ...

खोली वाढविण्याचे आश्वासन दिल्यानंतर अजूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. आपणा सर्वांच्या डोळयादेखत सर्व कायदे धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. कांजूरमार्ग आणि विक्रोळी या भागात सगळा गाळ टाकण्यात येत आहे. जो गाळ नदीच्या पात्रामध्ये आहे तो कोठे टाकावयाचा याचा निर्णय झालेला नाही. या चर्चेच्या निमित्ताने मी 2/3 प्रश्न उपस्थित करणार आहे. अजूनही अनधिकृत बांधकामे सुरु आहेत आणि नाले जोडण्याचे प्रकार चालू आहेत त्याबाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ? मुख्यमंत्री महोदयांनी मिठी नदीचा विकास करताना पात्र रुंद केले जाईल असा निर्णय घेतलेला आहे. कामाला सुरुवात झाल्यानंतर दोन्ही काठावर झोपडया बांधण्याचे काम सुरु आहे. 1200 कोटी रुपयांचे काम असताना फक्त 60 कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले याची कारणे काय ? सर्व कामे 31 मे पर्यंत पूर्ण होतील काय ? पहिल्यांदा नदीची रुंदी पूर्ववत करणे आणि गाळ काढणे तसेच अनधिकृत बांधकामे तोडणे या कामांचा समावेश आहे. ही सर्व कामे 31 मे,2006 पर्यंत पूर्ण होणार आहेत काय ?

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .........

अशा प्रकारे जे होऊ शकणार नाही ते करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तो म्हणजे मिठी नदीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये नदीची रुंदी वाढविणे, पात्राचे खोलीकरण करणे, पात्रातील अतिक्रमणे हटविणे, संरक्षक भिंत बांधणे, जोड रस्ते बांधणे, नदीच्या किनाऱ्याचे सुशोभीकरण करणे आणि नदीच्या काठावर झाडे-झुडपे लावणे इत्यादि कामांचा समावेश असून या टप्प्याचे काम सप्टेंबर, 2006 पासून सुरु करण्यात येणार आहे. परंतु प्रत्यक्षात 1200 कोटीचे काम असतांना 60 कोटीच्या कामाचे कंत्राट का दिले ? चितळे समितीने ज्या शिफारशी केल्या होत्या त्या सर्व बाजूला करण्यात आल्या आणि कंत्राटे देण्यात आली आणि 31 मे च्या आत एवढया मोठया पात्रातील लाखो टन गाळ काढण्यात येणार काय ? तसेच हे सर्व करीत असतांना पर्यावरणाची काळजी घेतली आहे काय ? तसेच कांजुरमार्ग ते विक्रोळी या भागातील मच्छिमारांनी फार मोठया प्रमाणात तक्रारी केल्या म्हणून या नदीच्या संदर्भात शासनाने जे धोरण स्वीकारले आहे त्याच्या विपरित काम चालले आहे त्यासंबंधी शासनाने स्पष्टीकरण करावे आणि मुंबईतील जनतेला पुन्हा 26 आणि 27 जुलैसारख्या प्रसंगाला तोंड देण्याची पाळी येऊ नये म्हणून कुठल्या प्रकारचे प्रयत्न करण्यात येत आहेत ? याचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ? एवढे बोलून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, एका महत्वाच्या व गंभीर विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून चर्चा उपस्थित केलेली आहे. महोदया, आम्ही त्या भागात राहतो. मला माहिती नाही प्रत्यक्षात या भागात काय चालले आहे याची शासनाला कितपत कल्पना असेल ? सन्माननीय सदस्यांनी जी माहिती यासंबंधी दिलेली आहे ती मी सुधारत नाही पण माझ्यासमोर जे प्रश्न आहेत ते म्हणजे या भागात मोठया प्रमाणात बोगस फोटो पास वाटप करण्याची पध्दत सुरु झाली आहे. या लोकांनी एका बाजूला छोटेसे कार्यालय थाटून पैसे घेऊन फोटो पास देण्याचे काम सुरु केलेले आहे. प्रत्यक्षात शासनाने हाती घेतलेले काम होणार की नाही हे माहिती नाही परंतु तोपर्यंत भ्रष्टाचाराचे प्रचंड पर्वत मात्र तेथे उभे राहणार आहेत. या नदीच्या दोन्ही बाजूला मोठया प्रमाणात झोपडया वाढत आहेत, अनधिकृत बांधकामांनाऊत येत आहे व त्यांचे फोटो काढून त्यांना पासही दिले जात आहेत. सन्माननीय सदस्यांनी या नदीतील गाळ काढण्याबाबत उल्लेख केला. परंतु तेथील लोकांनी तक्रारी केल्या की, हा गाळ काढून दुसरीकडे तो रोग नेऊन टाकण्याचे प्रकार होत आहेत या दृष्टीने मिठी नदीसंबंधी शासनाने जो निर्णय घेतला आहे त्याचे काम सुरु आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी एक मोठा कार्यक्रम घेऊन हा कार्यक्रम सादर केला त्योवळी तेथील जनतेला वाटले होते की, खरोखरच हे शासन दिलासा देणारे आहे की कायमचा मोक्ष देऊन टाकणार आहे? हे समजत नाही. एमएमआरडीएच्या माध्यमातून स्पार्क नांवाच्या संघटनेच्या माध्यमातून या भागात जे काम चालू आहे ती संघटना एमएमआरडीएला कुरतडून राहिली आहे. त्या संघटनेचेच लोक फोटो पास देण्याचे काम करतात, सर्वेक्षण देखील करतात आणि हे सर्व झोपडया निर्माण करणारे लोक आपल्या देशावर प्रेम करणारे नाहीत हे प्रामुख्याने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. म्हणून केवळ मतदानाकरिता तिकडे बघू नये ते देशाला घातक आहे. यादृष्टीने प्रथम अशा प्रकारचे बोगस फोटो पास देणे बंद करा अन्यथा हे आपल्याला धक्कादायक झाल्याशिवाय राहणार नाही, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, मिठी नपदीच्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अर्धा-तास चर्चेच्य माध्यमातून काही महत्वाच्या सूचना दिल्या आहेत आणि काही माहिती विचारलेली आहे. हे निश्चितच आहे की, मुंबईकरांच्या आणि राज्याच्याही कायम लक्षात राहील अशा प्रकारची प्रलयंकारी अतिवृष्टी 26 आणि 27 जुलैला झाली होती व या दोन दिवसात मुंबईत 950 एम.एम. एवढा पाऊस पडला होता व त्या पावसामुळे मध्यमवर्गीयांनी ज्या हालअपेष्टा सहन केल्या या सर्व गोष्टी आपल्याला माहितीच आहेत. या आपत्तीनंतर तातडीने शासनाच्या वतीने या मिठी नदीच्या विकासासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली हे प्राधिकरण गठित करुन त्यावर अनेक तज्ञांची नेमणूक करण्यात आली. साधारणपणे ही जी मिठी नदी आहे या नदीच्या माध्यमातून जवळजवळ पवई तलावापासून सी.एस.टी. ब्रिजपर्यंतचा एक टप्पा आणि सी.एस.टी. ब्रिजपासून माहिमपर्यंतचा दुसरा टप्पा. या दोन टप्प्यामध्ये या नदीचा विकास करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

पहिला टप्पा हा साधारणपणे 11.5 कि.मी.चा असून त्याचा विकास मुंबई महानगर पालिकेच्यावतीने करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुढील 6 कि.मी.चा विकास एम.एम.आर.डी.ए.मार्फत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचे म्हणणे आहे की, किती प्रमाणात आतापर्यंत काम झाले आहे ? 1200 कोटी रुपयांचा प्रकल्प 60 कोटीवर का करण्यात आला आहे ? यासंबंधी सांगू इच्छितो की, प्राधान्याने टप्प्याटप्प्याने 31 मेच्या अगोदर काम हाती घेण्यात येणार आहे. 26 जुलैची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये म्हणून हा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. त्या दृष्टिकोनातून फेजवाईज काम करणे महत्त्वाचे आहे. असलेला प्रवाह मेंटेन करणे, नदीच्या पात्राची रुंदी वाढविणे, पात्र खोल करून नैसर्गिक प्रवाह कसा वाहत जाईल ही त्यात प्रमुख बाब आहे. CWPRS च्या अहवालाप्रमाणे 1.5 मीटर ते 2 मीटर मिठी नदीची प्रस्तावित खोली आहे. मिठी नदीसंबंधी हायड्रोलिक आणि इन्व्हॉयरमेंटल स्टडी करण्यात आला आहे. यासाठी 51.14 कोटी रुपये प्रस्तावित खर्च येणार आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिकेचा रुपये 21.14 कोटी आणि एम.एम.आर.डी.ए.चा रुपये 30.00 कोटी इतका हिस्सा राहणार आहे. मिठी नदीचा नॅचरल फ्लो मेंटेन करण्यासाठी 25 मीटर ते 60 मीटर पर्यंतचे काम मुंबई महानगरपालिकेतर्फे आणि 60 मीटर ते 300 मीटर पर्यंतचे काम एम.एम.आर.डी.ए.मार्फत करण्यात येणार आहे. सदर काम 8 मार्च पासून सुरू करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. त्यासाठी आता या कामावर मशिनरी देखील लावण्यात आली आहे. आतापर्यंत मुंबई महानगरपालिकेच्यावतीने 24 पोकलेन, एमएमआरडीच्यावतीने 21 पोकलेन असू मिळून एकूण 45 पोकलेन मशिन्स लावण्यात आली आहेत. मुंबई महानगरपालिकेच्यावतीने 8 जेसीबी लावण्यात आली आहेत. मात्र, एमएमआरडीतर्फे जेसीबी लावण्यात आलेली नाहीत. मुंबई महानगरपालिकेच्यावतीने 160 डंपर्स लावण्यात आले आहेत, तर एमएमआरडीएतर्फे 40 डंपर्स असे मिळून एकूण 200 डंपर्स लावण्यात आले आहेत. दिनांक 9 एप्रिल 2006 पर्यंत म्हणजे काल पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने 1.29 लक्ष घनमीटर व एमएमआरडीमार्फत 1.36 लक्ष घनमीटर गाळ असा मिळून एकूण 2.65 लक्ष घनमीटर गाळ उचलण्यात आलेला आहे. म्हणजे अंदाजे 25 टक्के गाळ काढण्याचे काम झालेले आहे. उर्वरित 75 टक्के गाळ काढण्याचे काम नेमून दिल्याप्रमाणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीच्यावतीने करण्यात येईल. सदर काढलेला गाळ हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने कांजूरमार्ग व मुलुंड येथील डंपीग ग्राऊंडवर, तर एमएमआरडीच्यावतीने काढण्यात आलेला गाळ बीकेसी व देवनार येथे तात्पुरत्या स्वरूपात ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका व एमएमआरडीएसाठी स्पेशल फोर्स तयार करण्यात आला आहे. यासाठी विशेष अधिकारी नेमण्यात आले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 20:20

श्री.राजेश टोपे....

मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून 1 उप अभियंता, 2 कार्यकारी अभियंता, 4 सहाय्यक अभियंता, 24 दुय्यम अभियंता अशा एकूण 31 व्यक्ती या प्रकल्पावर काम करीत आहेत. तसेच एमएमआरडीए च्या वतीने 1 प्रकल्प संचालक, 1 मुख्य अभियंता, 6 उप अभियंता, 3 कार्यकारी अभियंता, 6 सहाय्यक अभियंता आणि इतर 29 अशा एकूण 41 व्यक्ती या प्रकल्पावर काम करीत आहेत. हे काम निश्चितप्रकारे दिनांक 31 मे, 2006 पूर्वी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार पूर्ण करण्यात येईल. 26 जुलै, 2005 रोजीच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ज्या काही उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यात येतील.

महोदया, दुसरा मुद्दा अतिक्रमणाबाबत उपस्थित करण्यात आला होता. मी आपणांस सांगू इच्छितो की, यामध्ये 1396 बाधित गाळे आणि निवासी गाळयांची संख्या 194 इतकी आहे. याबाबतचा सर्व्हे 6 महिन्यांपूर्वी झाला आहे. यामध्ये 2000 नंतरच्या कोणाचाही समावेश असणार नाही याची खबरदारी दोन्ही यंत्रणांच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. मोफत घरे मिळणार म्हणून अलिकडच्या काळात त्या परिसरामध्ये झोपडया उभारल्या जात आहेत, अशी चर्चा होत आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, ही चर्चा निराधार आहे. जर अशा प्रकारे झोपडया उभ्या राहत असतील तर शासनाकडून जी काही कठोर पावले उचलणे आवश्यक आहे ती उचलण्यात येतील. त्या ठिकाणी 2000 नंतरची कोणतीही व्यक्ती खपवून घेतली जाणार नाही. एखादा गाळा ट्रान्सफर झाला असेल तर, दुसऱ्या व्यक्तीला अंतर्भूत करण्याचा प्रकार होणार नाही. कारण एस.आर.ए.मध्ये तशी तरतूद नाही. त्यामुळे ज्या ज्या गाळयांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे त्या गाळयांचे पुनर्वसन केले जाणार आहे. तसेच त्या गाळयांचे निष्कासन केव्हा करणार आहात असाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी सांगू इच्छितो की, दिनांक 12 एप्रिल ते 30 एप्रिल, 2006 या कालावधीत गाळयाचे निष्कासन करण्याचे काम महानगरपालिकेच्या वतीने निश्चितप्रकारे पूर्ण करण्यात येणार आहे. प्रकल्पबाधितांना निवासी गाळे तुंगा व्हीलेज एलएनटी समोर 225 चौ.फूट इतक्या क्षेत्रफळाचे देण्यात येणार आहेत. तसेच मानखुर्द येथे 225 चौ.फूट क्षेत्रफळाचे व्यापारी गाळे दिले जाणार आहेत. मिठी नदी विकासाच्या दृष्टीकोनातून कालबध्द आराखडा तयार करण्यात आला आहे. त्या ठिकाणी मशिनरी यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दोन्ही यंत्रणांकडून अधिकाऱ्यांची टीम उभी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे निधीची सुध्दा व्यवस्था

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

करण्यात आली आहे. मुंबई महानगपालिकेकडून 5 लाख 57 हजार घनमीटर आणि एमएमआरडीए कडून 7 लाख घनमीटर असा एकूण 12 लाख 57 हजार घनमीटर गाळ काढण्याचे काम दिनांक 31 मे, 2006 पर्यंत करण्यात येणार आहे. हे काम करण्यासाठी शासन निश्चितप्रकारे कटीबध्द आहे एवढेच या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक बुधवार, दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून, 24 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही